साप्ताहिक ११ जानेवारी ८६ / २ रुपये

# माणूस

## आसाम... नवी आशा नवे नेतृत्व!





साप्ताहिक

**माणूस**

¤

वर्ष : पंचविसावे

अंक : तेहतिसावा

¤

११ जानेवारी १९८६

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

छायाचित्र-गोहाटीतली एक सभा—विसर्जित होण्यापूर्वीची 'गणसंग्राम परिषदे'ची कार्यकारिणी

डावीकडून बसलेले — १. प्रफुल्लकुमार महंत ३ नगेन शर्मा ४. अतुल बोरा ५. ललित राजखोवा.

बोलणारा — भ्रिगु फुकन.

¤

मुखपृष्ठ—श्याम देशपांडे

# मुंबई वाचवण्यासाठी लोकवस्ती कमी करणे हे एकच कलम

फिरोझ रानडे

**श्री.** रामदास टेमगिरे ह्यांचा 'माणूस'च्या दिनांक १४ डिसेंबरच्या अंकातला 'आठ कलमे : मुंबई वाचवण्यासाठी' हा लेख वाचला. लेख अत्यंत कळकळीने लिहिला आहे तो वाचून मनात जे विचार आले ते मांडत आहे. हा लेख श्री. टेमगिरे ह्यांच्या लेखाला प्रति—उत्तर म्हणून नाही.

श्री. टेमगिरे ह्यांच्या लेखाप्रमाणे त्याच अंकातील श्री. शरद जोशी ह्यांचे विचारपण वाचले त्यांनी जास्त खोलात जाऊन प्रश्न मांडला नाही किंवा तो सोडवता कसा येईल ह्याबद्दलही काही जास्त लिहिले नाही. तरीसुद्धा श्री. जोशी ह्यांचे विचार मला जास्त ग्राह्य वाटतात.

मुंबईसंबंधी उभा राहिलेला हा प्रश्न हे जगातले काही पहिले उदाहरण नाही. जवळ जवळ सगळ्या मोठ्या शहरांना म्हणजे लंडन, टोकियो, पॅरिस वगैरे सर्व शहरांना हा प्रश्न पडला होता. त्यांनी तो सोडवावयाचा प्रयत्न केला, पण त्यांचेही प्रश्न अजूनी संपूर्णपणे सुटलेले नाहीत.

हिंदुस्थानातसुद्धा हा प्रश्न फक्त मुंबई-पुरता नाही. तसा प्रश्न दिल्ली, कलकत्ता, मद्रास, बंगलोर वगैरे शहरांबद्दलही आहे. अगदी महाराष्ट्रापुरतं बोलायचं झालं तर हा प्रश्न पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर ह्या शहरांबाबतही निर्माण झाला आहे. तो अजूनही मुंबई इतका तीव्र झाला नसला तरी आणखी पाच—दहा वर्षांत होईल—असे वाटते.

तेव्हा मुंबई शहराच्या 'लोक—गर्दी' च्या प्रश्नाला आपण जे उत्तर शोधून काढू त्याला फार महत्त्व आहे मुंबईच्यादृष्टीने व महाराष्ट्राच्या इतर शहरांच्या दृष्टीनेसुद्धा.

प्रथम मात्र असे वाटते की, हा प्रश्न भावनिक अभिनिवेशाने चर्चा करायचा नसून तो शांत चित्ताने व मोठ्या समजूतदारपणे विचार करून सोडवावयाचा आहे. ह्यात गगनचुंबी इमारतींच्या मालकांबद्दल फक्त राग आणि जुग्गी—झोपड्यांबाबत खूप कणव ठेवून हा प्रश्न सोडवण्याचा विचार करता येणार नाही.

मुंबईत अति—श्रीमंत, श्रीमंत, उच्च—मध्यम वर्ग, मध्यम वर्ग, कामगार वर्ग, झोपड्यांतून रहाणारा वर्ग असे वेगवेगळ्या तऱ्हेचे लोक आहेत. दररोज ह्या सर्व तऱ्हेच्या लोकांची मुंबईत भर पडत आहे. फक्त जुग्गी—झोपडीवाल्यांची नाही.

मला एकदा ग्वालियार—रेयॉनचा जन-रल मॅनेजर विमानात भेटला होता तो त्यावेळी ग्वाल्हेरला होता आता एवढ्या मोठ्या कंपनीचा जनरल मॅनेजर, त्याला ग्वाल्हेरमध्ये काय कमी होते ? पण त्याची इच्छा मुंबईला यायची होती. नुसती इच्छाच नव्हती तर त्याची त्यादृष्टीने खटपट चालली होती तो मुंबईच्या एका कंपनीत इन्टरव्ह्यु-करता आला होता. मुंबईचे लोक त्याला नोकरी देत होते, पण रहायला जागा देत नव्हते. जागा त्याची त्यांनी पहावी असे त्यांचे मत होते. तेव्हा काही लाख रुपये खर्च करून तो मुंबईत, त्याचा ग्वाल्हेरला होता त्या बंगल्याच्या निम्मी जागा घेणार होता. मी त्याला विचारले, हा सगळा उपद्व्याप कशासाठी ? ग्वाल्हेरची इतकी चांगली नोकरी, रहाण्याची जागा सोडून मुंबईलाच का ?

'मुंबई ही एकच अशी जागा आहे की, तुमच्या बुद्धिमत्तेच, कर्तृत्वाचं आणि श्रमाचं येथे कौतुक होतं तुमच्या लायकीच्या प्रमाणात तुम्ही पुढे जाऊ शकता !'

माझी मुंबईच्या कोर्टात काही केस चालली होती. काही महिने केस चालली. त्यामुळे वकीलसाहेब माझे मित्र झाले होते. त्यांची प्रॅक्टिस चांगली चालली होती. काही दहा—

बारा हजार ते महिन्याला कमवत होते. पण रहात होते परळच्या एका बेडरूमच्या जागेत! त्याची जागा चागली असली तरी सभोवतालची वस्ती फार गलिच्छ होती

'तुम्ही नाशिक-पुण्याला का जात नाही. तेथे चार-पाच हजार मिळाले तरी तुम्हाला चागल्या जागेत रहाता येईल. तुमचे आणि तुमच्या मुला-बाळाचे जीवन सुखाचे जाईल!' मी त्याना एकदा म्हणालो.

'ठेवलय काय नाशिक आणि पुण्याला? मुबईच्या कोर्टात काम करण्यात जी शान आहे ती बाकी कोठेही नाही आणि हे विसरू नका. आज मी 'हजारा' त कमवत असलो तरी ह्या मुबईत ते 'लाखा' त व्हायला वेळ लागणार नाही अक्कल आहे आणि मरमरून काम करण्याची तयारी आहे त्याला मुबई हेच शहर योग्य आहे.'

हे किंवा असे उत्तर फक्त मोठ्या मॅनेजरकडून वा वकिलाकडून मिळते असे नाही. हेच उत्तर दुकानदार, गवडी, सुतार वगैरे लोकाकडून मिळते; पण अगदी झोपडीत रहाणाऱ्याकडून हेच उत्तर येईल. एखादा वकील-इंजिनिअर – आर्किटेक्ट लाखाच्या गोष्टी करेल. मध्यम वर्गातला हजारात करेल तर जुग्गी-झोपडीवाला दहा-पंधरा रुपयात करेल; पण सगळ्याचे म्हणणे एकच 'तुमच्या कामाला, कर्तृत्वाला फक्त मुबईत अवसर मिळतो.'

आणि ह्याच विचाराने मुबईत दररोज तीनशे ते चारशे लोक येत असतात. आणि हेही बघण्यासारखे आहे, ह्या सगळ्याना मुबईत काहीतरी काम मिळते. ओली-सुकी भाकरी मिळते, प्यायला पाणी मिळतं. आपण मोठ्या शहरात रहातो म्हणून पिण्याचं पाणी मिळण, हीही किती मोठ्या सुखाची गोष्ट आहे, हे आपल्याला कळणार नाही त्याच्याकरता खानदेश वा नगर जिल्ह्यात खेडेगावात जायला पाहिजे.

आता तुम्ही म्हणाल ह्यात तुम्ही विशेष असे ते काय सागितलेत. मुबईत लोक का येतात हे तर सगळ्याना माहीत आहे मुबईत लोक का येतात वा आल्यानंतर परत का जात नाहीत हे एकदा कळले की, प्रश्नाचे उत्तर आपोआप सापडेल. श्री. शरद जोशीनी त्याचे सूतोवाच आपल्या लेखात केले आहे; पण त्याचा विचार करण्याआधी श्री. टेमगिरे ह्यानी सुचवलेल्या कलमांचा विचार करू.

## अशक्य कोटीतली गोष्ट

मुबईत येणारा लोकांचा लोढा कायद्याने वा ओळखपत्रे वगैरे गोष्टीनी थाबवणे अगदी अशक्य कोटीतील गोष्ट आहे हे आपण मनाशी पक्के केले पाहिजे.

मुबईत येण्यावर बदी घालणारा पार्लमेंट मध्ये कायदा पास होणे शक्य नाही. महाराष्ट्राचे जेमतेम पन्नास-पचावन्न खासदार आहेत त्या सगळ्यानी जरी अशा कायद्याच्या बाजूने मते दिली तरी इतर साडे तीनशे-चारशे खासदार त्याच्या विरुद्ध मते देतील, कारण भारतातल्या सगळ्या प्रातातून मुबईत लोक येतात व येत रहाणार आहेत. तेव्हा तो मार्ग बाद झाला

समजा कायद्यातून काही मार्ग निघाला तरी ओळख-पत्रे योजना अमलात आणणे शक्य नाही.

मुबईत आज काही तरी नव्वद लाख लोक रहातात प्रत्येक कुटुबात साधारणतः पाच माणसे हिशोबाकरता धरतात. म्हणजे जवळ जवळ वीस लाख कुटुबे झाली. प्रत्येक कुटुबात दोन ओळखपत्रे द्यावयाची म्हटली तरी चाळीस लाख ओळखपत्रे होतील. अशी ओळखपत्रे छापण्याचा खर्च, ती योग्य लोकाना देण्याच्या यत्रणेचा खर्च किती तरी कोटी रुपयात जाईल. ह्या सगळ्याला काही वर्षे लागतील.

समजा असा खर्च केला, यत्रणा उभारली तरी ती शेवटी पोलिसाच्या वा नगरपालिकेच्या अधिकाऱ्याच्या हाती गेली तर लाचलुचपतीला आणखी एक नवे क्षेत्र मिळेल. लोक खोटे बनावटी पासपोर्ट बनवतात, तेव्हा बनावटी ओळखपत्रे बनवणे त्याना अशक्य नाही.

ह्यावरही काही मार्ग काढला तरी मुबईत फक्त कामाकरता म्हणजे दिवसाचे वेळी ठाणे, कसारा, कल्याण, कर्जतपासून हजारो लोक मुबईला येतात. त्याना ओळखपत्रे दिली तर गोंधळात आणखी भर पडेल. नाही दिली तर त्यानी मुबईत यावे कसे? बाकी गावातून येणारे ह्यात धरले नाही आहेत

ओळख-पत्रातली कल्पनाच मला अशक्य कोटीतली वाटते. तेव्हा त्या योजनेच्या फायद्याचा विचार करणे फारसे लाभदायक नाही हे कोणालाही पटावे.

सर्व नवीन खाजगी बाधकामे बंद करून ती सरकारने करावी ही कल्पनाही प्रत्यक्षात उतरवायला अति कठीण आहे. सध्या सरकार स्वत: फारच थोडे बांधकाम करते. त्यात हयगय, लाचलुचपत, कमी प्रतीचे काम, वेळेवर काम न होणे वगैरे सगळे प्रकार होतात हे सर्वांना माहित आहे.

तेव्हा सरकारकडे मुबईचे सगळे बांधकाम दिले तर काय स्थिती होईल ह्याचा नुसता विचार करणे सुद्धा शक्य नाही.

तसेच जमिनीचे राष्ट्रीकरण करणे घटनेने अशक्य आहे. मग फक्त जमिनीचे राष्ट्रीकरण का? सगळ्याच मालमत्तेचे करायला लागेल. तसे फक्त कम्युनिस्ट राज्य व्यवस्थेतच होऊ शकते दुर्दैवाने किंवा सुदैवाने आपल्या येथे तशी राजवट नाही.

## एक कलमी उपाय

ह्या मुंबईच्या प्रश्नावर फक्त एक कलमी उपाय म्हणजे मुबईतली लोकवस्ती कमी करणे व मुबईबद्दलचे आकर्षण कमी करणे हा होय.

मुबईतली लोकवस्ती कमी करण्याचे अनेक मार्ग आहेत व ते सरकारच्या हाती आहेत. पहिला म्हणजे मुबईत असलेली अनावश्यक सरकारी दप्तरे मुबईच्या बाहेर हलवावयाची. महाराष्ट्राचा कमिशनर ऑफ पोलीस हा आता आत्तापर्यंत पुण्याला होता. त्याला सरकारने मुबईत आणले का? तेही मुबईला स्वतत्र कमिशनर असताना हे फक्त एक उदाहरण दिले. अशी किती तरी ऑफिसेस आहेत की ज्याना मुबईत राहण्याची गरज नाही शिक्षण खाते, बाधकाम खाते, शेतकी खाते, आरोग्य खाते अशी किती तरी खाती मुबईत आहेत.

तसेच भारत सरकारची कितीतरी खाती मुबईतच आहेत. हिशोब खाते, बाधकाम खाते, आयकर खाते. रेल्वेच्या जनरल मॅनेजरचे दफ्तर मुबईत असायची गरज नाही. आता सेंट्रल रेल्वे मुबईपासून दिल्लीपर्यंत आहे. मग त्याचे ऑफिस मुबईला कशाला? ते मध्यवर्ती ठिकाणी म्हणजे भुसावळ, खांडवा वगैरे ठिकाणी नाही का नेता येणार?

आता प्रश्न येतो की ह्या लोकाना काय म्हणून हलवावयाचे ? व ते जातील का ?

ह्या सगळ्याना अशा करता हलवावयाचे कारण त्यांच्या जीवावर जगणारी शेकडो कुटुंबे झोपडयातून राहतात. तेव्हा अशा मोठाल्या कचेऱ्या मुबईबाहेर गेल्या की झोपडपट्टीवाले पण बाहेर जातील.

हल्ली सरकार काय करते की मुबईत राहाणाऱ्याना महागाई भत्ता जास्त व महाराष्ट्रात इतर ठिकाणी राहाणाऱ्याना कमी भत्ता देते. खर म्हणजे त्याच्या उलट करायला हवे. किंबहुना मुबईबाहेर जो जाईल त्याला जास्त पगार व जास्त महागाई भत्ता दिला गेला तर पुष्कळ लोक बाहेर जायला तयार होतील. नवीन नेमणूका मुबईत करायच्याच नाहीत, महाराष्ट्रातच करावयाच्या, असे धोरण हवे.

साधे पेन्शनर लोकाचं उदाहरण घ्या. आज मुंबईत सगळ्या थरावरचे मिळून दोन ते तीन लाख निवृत्त लोक आहेत. त्याना मुबईत मिळते त्यापेक्षा जास्त निवृत्ती वेतन बाहेरच्या गावात दिलं व त्याच्याकरता राहाण्याची घरं बांधली तर पुष्कळ लोक मुबईबाहेर जातील.

खरं म्हणजे माझी तर सूचना अशी आहे की, महाराष्ट्राचे सरकारच मुबईहून हलवून पार मराठवाडयात न्यावे. मुबईत राहिल्यामुळे मंत्री व नोकरशाही सामान्य मराठी जनतेपासून फार दूर व 'कट्-ऑफ' म्हणतात तशी झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे प्रश्न, दुष्काळ वगैरे गोष्टी त्यांना उमजतच नाहीत.

लाच-लुचपत, दिरंगाई, व्यापारी वर्गाचे दडपण ह्या सर्व दृष्टीनी महाराष्ट्राचे सरकार मुंबईच्या बाहेर असणे आवश्यक आहे.

पण मराठी माणसाचा मुबईशी इतका भावनिक संबंध आहे की माझी ही सूचना कोणी विचारातही घेणार नाही, ह्याची मला कल्पना आहे. पण मुबई वाचवावयाची असेल तर असा जालिम उपाय करावाच लागेल. असो.

मुबईचे आकर्षण कमी करण्याचे बरेच मार्ग आहेत.

त्यातला पहिला म्हणजे श्री. शरद जोशीनी सुचविलेला : शेती किफायतशीर करणे व गावातले जीवन आकर्षक करणे हा होय. आणि हे नुसते महाराष्ट्रापुरते नव्हे तर सगळ्या भारतालाच ते लागू आहे सगळ्या भारतातून शेतकरी वर्ग मुबईला येतो. शेती किफायतशीर झाली वा कामाची इतर व्यवस्था झाली तर पुष्कळ लोक मुबईला येणार नाहीत. मागास भागात सरकारने उद्योग-धदे काढून त्या दृष्टीने योग्य पाऊल टाकले आहे. त्याला आणखी गती यायला पाहिजे.

## नकारात्मक भूमिका नको

पण ह्या सर्वांपेक्षा काही लोक जी नकारात्मक भूमिका घेतात त्याने प्रश्न तर सुटत नाहीतच, उलट कडवटपणा वाढतो कित्येक संस्था व मान्यवर व्यक्ती म्हणतात की बाहेरून बिगर मराठी लोकाचा लोढा थांबला पाहिजे, बिगर-मराठी लोकाना मुबईत यायला बदी केली पाहिजे त्यामुळे मराठी माणूस फुकाच बदनाम होतो तो होतोच, पण मुबईत येणाऱ्यात एका टक्क्यानेही फरक पडत नाही

उलट ज्याना आवश्यक असेल त्या सर्वांनी मुबईत यावे असे आपले म्हणणे असले पाहिजे. म्हणजे मुबईतली लोकसख्या कमी करायचे प्रयत्न तर करावयाचे व लोकाचे मुबईबद्दलचे आकर्षण तर कमी करायचे पण त्यातूनही लोक येतील त्यांना नाही म्हणायचे नाही आणि जे मुबईत राहतील त्यांची योग्य ती रहाण्याची व्यवस्था करावयाची.

ह्याकरता दोन गोष्टी लागतील. एक जमीन व दुसरे पैसा.

मुबईत जमीन कमी आहे हा खोटा बोभाटा मुबईतल्या बिल्डर्सनी केला आहे व करत आहेत. मुबईत जमीन कमी आहे म्हटले म्हणजे जमिनीचे भाव वाढतात व बिल्डर्सचा फायदा होतो. खाजगी जमिनी आहेत. सरकारी जमिनी आहेत. शेकडो एकर जमीन मिठागराखाली आहे. ती घरबाधणी करता वापरता येईल.

नव्या मुबईत किती तरी जमीन आहे. पण मुबईच्या बिल्डर्सना नवी-मुबई होऊ नये असे वाटते. कारण नवी-मुबई झाली की, मुबईतल्या जमिनीचे भाव घटतील, ते त्याना नको आहे. नवी मुबई रेल्वेने जोडली जाऊ नये असा त्यानी पद्धतशीर प्रयत्न चालवला आहे व त्यात ते यशस्वी झाले आहेत.

तेव्हा मध्यवर्ती सरकारवर दडपण आणून ही रेल्वे-योजना लवकरात लवकर होईल हे मराठी खासदार, आमदार व जनतेने पहायला हवे. कॉंग्रेसचे शभरावे अधिवेशन नव्या मुबईत भरावयाचे आधी ठरवले असते तर ही रेल्वे वर्षात तयार झाली असती !

उरण वगैरे भाग मुबईला जोडण्याचा प्रकल्प काही खाजगी कपन्यांनी घेतला आहे. तशा प्रकल्पाना उत्तेजन दिले पाहिजे. ज्या ठिकाणी समुद्र आहे तेथे भर घालून नवी जादा जमीन तयार केली पाहिजे. ह्याला पुष्कळ बिल्डर्स तयार आहेत असे माझ्या पाहाण्यात आले आहे.

आणखी एक पैसा उभा करण्याचा मार्ग म्हणजे भारतातल्या इतर प्रात सरकाराना मुबईच्या सुधारणेकरता पैसा देण्याची विनती करावयाची. उत्तर प्रदेशाचे उदाहरण घेऊ. कांही तरी वीस ते पचवीस लाख लोक उत्तर प्रदेशातून आलेले आहेत. बहुतेक मजूर व छोटे-मोठे उद्योग करणारे आहेत. ते आपल्या मिळकतीचा जवळ जवळ पाऊण हिस्सा आपल्या उत्तर प्रदेशातल्या गावी पाठवतात म्हणजे उत्तर प्रदेशातल्या जनतेला काही कोटी रुपये दरमहा मिळतात. तेव्हा काही पैसे उत्तर प्रदेशाने मुबईला द्यायला काय हरकत आहे ? आता हे कायद्याने करता येईल की नाही ह्याची मला कल्पना नाही. पण वाटाघाटीनी हा प्रश्न सोडवता येईल.

श्री. टेमगिरे ह्यानी चागल्या विषयाला हात घातला आहे. ह्या विषयावर व्हावी तेवढी चर्चा व विचाराचे आदान-प्रदान होत नाही. ते मात्र व्हायला पाहिजे. सरकारकडे धरणे धरून बसायला हवे, त्याबद्दल मोठी चळवळ व्हायला हवी.

मुबईचा प्रश्न फार बाका आहेच पण फार गुतागुतीचा पण आहे त्यावर जितके वेगवेगळे विचार मांडले जातील तेवढे चागले.

# एका नव्या विधायक शक्तीचा उदय

_ अविनाश धर्माधिकारी

आसाममध्ये निवडणुका नव्हत्या, इतिहास घडत होता. तशी घटनांची एक सतत गुफली जाणारी साखळी या अर्थानं इतिहास घडत असतो तो कधी थाबत नाही. पण फार थोड्या घटनाना इतिहासाला रग, रूप, आकार देण्याएवढं महत्त्व प्राप्त होतं. आसाममध्ये गेली सहा वर्षे घडत गेलेल्या घटनांच्या साखळीला अस महत्त्व आहे. स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासातली महत्त्वाची आंदोलन सागायची झाली तर आसाममधल्या परकी घुसखोरविरोधी आदोलनाचा क्रम फारच वरचा लागेल. ऑगस्टमध्ये 'आसाम करार' झाला तोही ऐतिहासिक. लवकरच निवडणुका होणार हे त्याच वेळी निश्चित होत. त्यामुळे कॉंग्रेस आणि असमिया आंदोलक दोघानीही आपापल्या तंबूच्या खुटया ठोकायला सुरुवात केली होती. सात नोव्हेंबरला निवडणुकांची अधिकृत घोषणा झाली तेव्हा हे सांगायला कोणत्याही राजकीय पंडिताची किंवा इतिहासतज्ज्ञाची गरज नव्हती की या निवडणुकांना ऐतिहासिक महत्त्व असणार आहे. सामान्यातल्या सामान्य मतदारालाही हे कळलं होतं हे मतदानाच्या टक्केवारीत दिसलच आहे. त्याच सामान्य मतदारान गेली सहा वर्षे इतिहास घडवताना आपली कल्पकता आणि सहनशक्ती पणाला लावली होती. आसाम गणपरिषदेला विजय मिळाल्यावर या सहा वर्षातल्या जनआदोलनाचा प्रवास असा ऐतिहासिक पानावर येऊन थबकला आहे त्या पानाच्या शवटी कंसात लिहिलेले आहे–( पुढील भाग पुढील अकी) पण पुढला भाग काय असू शकेल, पुढल्या अकात काय नोदवल जाईल हे सांगू शकेल असा लेखकच अस्तित्वात नाही. मागील अंक गेली सहा वर्षे लिहिणारे हजारो, लाखो असमिया गोहाटीच्या रस्त्यावर आनदानं जल्लोष करण्यात निमग्न आहेत.

उण्यापुऱ्या अर्ध्या तपाचा एक प्रवास परकी घुसखोरीचा प्रश्न आसामला १९५० पासूनच भेडसावत होता. पण त्यावर सरकारकडून आज उपाययोजना होईल, उद्या होईल अशी वाट पहात आसाम एक पिढीभर वाट पहात होता त्याच वेळी परकी घुसखोरी वाढतच होती अन् असमिया मनाच कोठार डायनामाईटनं ठासून भरलं जात होतं. १९७१ मधे मंगलदोई मतदारसघातल्या प्रतिनिधीचं अकालीच निधन झाल्यामुळे तिथं पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली तेव्हा मतदारयाद्यात काही लाख विदेशी नागरिक असल्याच स्पष्ट झालं ठिणगीनं आपलं काम केलं. असामिया जनतेला समस्येचं आधीपासून भान असूनही केवळ एका मतदारसघातल्या घुसखोरीचं एवढं प्रमाण सापडण हा खडबडून जाग करणारा अनुभव होता. पहाता पहाता उभ्या आसामन पेट घेतला. चर्चेच्या अनेक फेऱ्या, ब्रह्मपुत्रेचे वार्षिक तांडव, आंदोलनाचा चढता उतरता टेंपो, बहिष्कार टाकलेल्या दोन निवडणुका, त्यातली एक हिंसा आणि रक्तपातान बरबटलेली अन् लाखोच्या मनांचा उत्स्फूर्त उद्रेक असे सर्व यज्ञयाग पुरे करत अखेर १५ ऑगस्टला 'आसाम करार' झाला तेव्हा एका मर्यादित अर्थानं का होईना, एक यशस्वी सांगता समारंभ पार पडला. एक शेवट आणि एक प्रारभ. आसाम गणपरिषदेच्या रूपानं आता परत एक शेवट. निवडणुकातला विषय. एक नवा आरभ : सत्तेच्या साधनातून समाजपरिवर्तन घडवण्याचा. तो अजून दृगोचार व्हायचा आहे. पण आसामची सूत्र आता युवकांच्या हातात असणार आहेत आणि हे युवक सहा वर्षाच्या आदोलनाच्या भट्टीतून तयार होऊन बाहेर पडलेले, अजून तरी ताजे, शुद्ध आहेत हा 'युवक वर्षा'चा उचित समारोप मानायला हवा. आसामच्या या युवाशक्तीच प्रातिनिधिक रूप प्रफुल्ल महंत आणि भ्रिगुकुमार फुकन यांच्यात पहायला मिळतं.

मुळात आदोलनाच नेतृत्व त्यांच्या हातात योगायोगानं आल. अखिल आसाम छात्र परिषद 'आसु' ही आसाममधल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची अधिकृत संघटना, विद्यापीठात स्टुडंटस् कौन्सिल असत तशी. गोहाटी विद्यापीठांतर्गत निवडणुका होऊन 'आसु'ची कार्यकारिणी निवडली जाते. पण 'आसु'ला विद्यार्थ्यांची एक केवळ संघटना एवढंच स्थान नाही. वेळोवेळी आसामचे प्रश्न हाती घेऊन 'आसु'न ७९ पूर्वीसुद्धा छोटया मोठया चळवळी केल्या होत्या. गोहाटीजवळ ब्रह्मपुत्रेवरचा पूल, नारिंगी इथलं ऑईल पंपिंग-स्टेशन हे आसुच्या आंदोलनातून लाभले होते. त्यामुळे ७९ मध्ये उत्स्फूर्त जनउद्रेक झाला तेव्हा त्याच नेतृत्व आपोआपच 'आसु'कडे आलं. नव्हे, तो जनउद्रेक घडविण्यात 'आसु'चाच वाटा मोठा होता. त्यावेळी 'आसु'चे अध्यक्ष आणि सरचिटणीस प्रफुल्ल महंत आणि भ्रिगु फुकन होते. म्हणून ते आंदोलनाचे नेते–प्रवक्ते झाले. असमिया समाजात इतर संघटित घटक फारसे नाहीतच. चहाच्या मळयातल्या कामगारांच्या सघटना आहेत; पण सुशिक्षित, मध्यमवर्गीय असमिया समाजाला 'आसु'च्या रूपात आपला प्रवक्ता सापडला होता आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व घटकांचा एक सयुक्त आघाडी बनविण्यात आली ती 'ऑल आसाम गणसग्राम परिषद' ( AAGSP ) त्यात दोन प्रादेशिक पक्ष होते, पूर्वांचलीय लोकपरिषद आणि आसाम जातीयतावादी ( म्हणजे

राष्ट्रवादी ) दल पण हे दोन पक्ष अगदीच चिल्र होते. आसाम साहित्य सभासुद्धा गणसग्राम परिषदेची घटक सदस्य बनली होती. असमिया समाजात, विशेषत सुशिक्षित मध्यमवर्गीयात आसाम साहित्य सभेला एक प्रकारची खास नैतिक मान्यता आहे. पण प्रत्यक्ष मनुष्यशक्ती उभी करणं आणि आसाम हलवून सोडणं ही काम 'आसु'च करू शकते. त्यामुळे गणसग्राम परिषदेच नेतृत्वही महत-फुकन द्वयोकडेच आल.

## नेतृत्वाला मान्यता

विद्यापीठाच्या घटनेनुसार 'आसु' ची कार्यकारिणी १ वर्षासाठी निवडली जाते. त्याप्रमाणे प्रफुल्ल महत आणि भ्रिगु फुकन हे १९७९-८० या वर्षासाठी अध्यक्ष, सेक्रेटरी म्हणून निवडले गेले त्याच्याबरोबर इतर कार्यकारिणीही निवडली गेली होती. त्यात भरत नारा, ललित राजखोवा, नुरुल हुसन इ महत्त्वाचे विद्यार्थी नेते होते. १९८० मध्येही आदोलन चालूच होतं. म्हणून या कार्यकारिणीला दोन वर्षे मुदतवाढ देण्यात आली. दोन वर्षानतरही आदोलन चालूच होत. त्यावेळी १९८२ मध्ये मात्र अस ठरलं की, बाकीची कार्यकारिणी नव्यानं निवडावी पण महत फुकन याच स्थान तसच ठेवाव. म्हणजे मूळ नेतृत्व योगायोगान त्यांच्याकडे आल हे ठीक पण ८२ मध्ये त्याचंच नेतृत्व पुढे चालू रहाव यात त्यांच्या नेतृत्वाला लाभलेली मान्यता उघडच आहे. या दोघानीही या काळात विद्यापीठातलं आपलं नाव नोदवलेल ठेवल नाहीतर ते 'आसु' चे पदाधिकारी राहू शकले नसते. दरम्यान, विशेषत ८२-८३ नतर आंदोलन फोडण्याचे प्रयत्न जारी होते गणसग्राम परिषदेतच परस्परात मतभेद आहेत, 'आसु' फुटणार आहे, बहुसख्याक विरुद्ध अल्पसख्याक किंवा मवाळ विरुद्ध दहशतवादी असा वाद 'आसु' मध्ये माजला आहे, त्यामुळे 'आसु' फुटणार आणि मग हे आदोलन बारगळणार अशी हवा पद्धतशीरपणे जोपासण्यात आली होती. बहुसख्याक विरुद्ध अल्पसख्याक असा काहीसा चर्चेचा-वादाचा नव्हे-मुद्दा 'आसु' च्या अतर्गत होता हे खरं. त्याचा फायदा आसाम सरकारन उठवायचा प्रयत्न केला नुरुल हुसन आणि इतर विद्यार्थी नेत्यांनी 'आसु' पासून फुटून 'आम्सु' (All Assam Miniority Students Union) स्थापन केली तेव्हा हे उघड होत की, या सघटनेला सरकारी आश्रय नाहीतर निदान सरकारी आशीर्वाद तर खचितच आहेत. तसंच पंजाबमधली अतिरेकी चळवळ वाढू लागली. आसामच्या शाततापूर्ण आदोलनाला दाद मिळेना, तेव्हा आपणही दहशतवादी मार्ग स्वीकारायला हवा असा प्रवाद 'आसु' त काही काळ होता. आदोलनाची गाडी या वेगळ्याच रूळांवर सरकण्यापासून किंवा रूळावरून घसरण्यापासून रोखण्यात नेतृत्वाला यश आल असं गेल्या ३ वर्षातला इतिहास सागतो. आदोलनाच मूळ स्वरूप शाततावादी, राष्ट्रवादी ठेवल तरच आपल्याला यश लाभू शकत, असा आग्रह या नेतृत्वान कायम ठेवला होता. त्याना यश लाभल ही भारताच्या लोकशाहीच आणि राष्ट्रीयतेच बळ वाढवणारी बाब आहे. 'आसाम करार' घडवून आणण्यात राजीव गाधीनी घेतलेल्या पुढाकारालाही श्रेय द्यायला हव.

'आसाम करार' झाल्यावर आसाममधल्या परिस्थितीच, घडामोडीच स्वरूप बदलल. कराराविषयी आदोलनाच नेतृत्व पूर्ण समाधानी होतं असं नाही त्यातलो नागरिकत्वाविषयीची कलमं आणि कार्यवाहीची तरतूद अस्पष्ट, अनिश्चित होती. नतर ज्या मतदारयाद्या तयार करण्यात आल्या, त्या चुकीच्या होत्या. (सैकियाचं काळजीवाहू सरकार रहाण्याला आदोलकाचा विरोध होता.) अजूनही त्यात अनेक विदेशी नागरिकाची नावं होती; पण आता आधीच्या सहा वर्षातल्यासारख जन आदोलन अस्थानी, अनुचित ठरलं असतं. त्याऐवजी पुढच्याच वळणावर निवडणूक होती. ८३ च्या पद्धतीचा निवडणूक बहिष्कारही आत्मघातकी ठरला असता अन् या पद्धतीनं हे गाडं असं अनिश्चित काळपर्यंत घरगळत राहिलं असतं. म्हणजे समोर वेगवेगळे पर्याय होते म्हणून नव्हे तर निवडणूक एवढा एकच सूज्ञ व्यावहारिक पर्याय डोळ्यासमोर होता म्हणून आदोलनाच्या नेतृत्वान तो स्वीकारला. निवडणूक जिंकून सत्ता हाती आली की, आसाम करार अंमलात आणण्याची सूत्रं आपल्या हातात येतील अस गणित या निर्णयामागे होत. सहा वर्षाच्या आदोलनामुळे झालेल्या जनसपर्क आणि जनजागृतीमुळे सत्ता आपल्या हातात येऊ शकेल, असा विश्वास होता. त्याचा विश्वास सार्थ ठरला आहे.

## निवडणुकांचे आव्हान

या विश्वासातूनच निवडणुकीचे आव्हान स्वीकारत आदोलकांनी आसाम गण परिषदेची निर्मिती केली. एका जनआदोलनाचं रूपातर राजकीय पक्षात झाल. परिणामी आसाममध्ये एक नव्या शक्तीचा उदय आणि आता सत्ता त्या शक्तीच्या हातात असं या मागच्या ६-६॥ वर्षाच्या प्रक्रियेच रूप आहे. गाधीजीना गुरू मानणाऱ्या आदोलकानी २ ऑक्टोबर ८५ ला जोरहाट इथे एक समेलन भरवल. त्यात झालेल्या विचार-विनिमयातून गोलघाट इथे १२-१३ ऑगस्टला आसाम गणपरिषद या राजकीय पक्षाची अधिकृत घोषणा केली. हे करताना महत-फुकन द्वयीन 'आसु' च्या पदावरून राजीनामा दिला. त्यानंतर यावर्षी 'आसु' च्या निवडणूका होऊन अध्यक्षपदी कार्तिक हजारीकाची निवड झाली आहे. राजकारण बाह्य विद्यार्थी सघटना हेच 'आसु' च रूप कायम राहील आणि ही सघटना आसाम गणपरिषदेची विद्यार्थी-शाखा बनणार नाही, अस धोरण कार्तिक हजारिका यानी प्रथम जाहीर केल आणि नतर ९-१० नोव्हेंबरला गोहाटीतल्या जजेस् फील्डवरच्या प्रचड सभेत 'लोकानी गणपरिषदेला निवडून द्यावे' हे स्पष्टपणे सागताना म्हटल की, या गेल्या निवडणुका म्हणजे केवळ सत्तेच राजकारण नाही, तो आसामच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे, म्हणून 'आसु' आपल्या पूर्ण शक्तिनिशी आसाम गणपरिषदेच्या मागे उभी राहील. व्यवहारत: AGP ची मनुष्यशक्ती म्हणजे 'आसु'. अजूनही महंत-फुकन हेच 'आसु' चे गॉडफादर आहेत.

म्हणजे योगायोगान उठलेल्या लाटेचं नेतृत्वस्थान लाभणं आणि त्यातून त्या लाटेला नीट दिशा, आकार देत, खडबडीत-सुरळीत वळणावरून पार करत यशाकडे घेऊन जाणं ही कामं महत-फुकन यांनी केली. सहज जाता जाता एक बोलका प्रसग आसाममध्ये सागितला जातो तो आठवतोय.

आंदोलनातली हवा काढून घेण्याचे, फेडण्याचे नेतृत्व विकत घेण्याचे किंवा भ्रष्ट करण्याचे सर्व प्रयत्न करून अपयशी झाल्यावर म्हणे एका उच्चपदस्थ अधिकाऱ्यानं प्रफुल्ल महतना विचारलं की, तुमच्या या अशरण तन्मयतेच रहस्य काय. तेव्हा महतनी त्या अधिकाऱ्याच्यामागे भिंतीवर लटकवलेल्या तस्वीरीकडे बोट दाखवलं. तस्वीर गांधीजीची होती. अर्थात मिळालं आहे ते यश केवळ व्यक्ती म्हणून महत–फुकन आणि क. चं नाही हे उघडच आहे. सघटित, बोलक्या जनमताचा रेटा आणि आधार याच मुख्य भाडवलावर आदोलन आणि AGP उभे राहिले, यशस्वी झाले. किंबहुना आजतरी AGP हा केवळ इतर प्रादेशिक पक्षासारखा एक प्रादेशिक पक्ष नाही तर बदललेल्या परिभाषेतल ते आसाममधलं जनआदोलनच आहे.

संपूर्ण आदोलनाच मूलभूत शाततामय रूप आणि निवडणूक प्रचारात पूर्ण जल्लोष असूनही अत्यंत सूज्ञ सयम हे आसामन भारतीय लोकशाहीला दिलेल योगदान मानायला हव– ते स्वीकारण्याएवढे आपण शहाणे असलो तर. ज्या एकाच वेळी आदोलनाची गाडी रूळावरून घसरून हिंसक दलदलीवरून धावत सुटली तेव्हा महत–फुकनसहित आदोलनाचे सूत्रधार नेते अटकेत होते फेब्रुवारी ८३ मधली चर्चेची फेरी फसल्यावर दिल्लीहून परतताना गोहाटी विमानतळावरूनच या सर्वांना सरकारी पाहुणचारासाठी नेण्यात आलं होतं त्यामुळे अचानक आदोलनाची अवस्था निर्नायकी झाली. जनतेनं तर निवडणुकांवर बहिष्कार टाकलेला आणि सरकार तर पडेल ती किंमत मोजून निवडणुका पार पाडायला कटिबद्ध. अशा जबरदस्त ताणाच्या आणि आधीच नाजूक असलेल्या स्थितीत निर्नायकी अवस्था झाल्यावर आदोलन असं सैरावैरा सुटण हे अगदी अटळ होतं. गणसग्राम परिषदेची सूत्र दहशतवादी, अतिरेकी व्यक्तीकडे गेली एक प्रकारच्या चिडलेल्या विवशतेतून हताशपणातून त्यानी हिंसक तंत्र आजमावून पहायचा प्रयत्न केला. पूल उडविणे, रस्ते खणून काढणे, छुपे हल्ले, रेल्वे वॅगन्स् लुटणे, राजकीय खुनाचे प्रयत्न असे प्रकार झाले. असमिया समाज जीवनातले सर्व ताणतणाव अचानक पृष्ठभागावर आले. हिंदू विरुद्ध मुसलमान, असमियाविरुद्ध बगाली, वन्य जमाती विरुद्ध इतर जमाती असे शत्रुत्वाचे सर्व घटक आणि त्याच्या विविध बेरजा वजाबाक्या अशा सर्वांनी आपापले हिशोब चुकते करायला हाच काळ योग्य मानला. 'नेल्ली' हे या परिस्थितीच सकलित अपत्य आहे आसाममध्ये सरकार, कायदा आणि सुव्यवस्था या वस्तू त्यावेळी अस्तित्वातच नव्हत्या. नतर अडीच पावणेतीन वर्षात हे परत घडलेल नाही. यात आदोलनाच्या नेतृत्वाचा जागरूक वाटा आहे आणि हितेश्वर सैकिया याच्या सरकारचासुद्धा आत्ता झालेल्या निवडणुकामध्येसुद्धा हिंसाचाराची शक्यता शून्यवत करून टाकण्यातही AGP चं नेतृत्व सावध होतं. निवडणुकांनतर निकालाच्या वेळी काही निवडक पॉकेटस्‌मध्ये हिंसक स्फोट व्हायची शक्यता बोलली जात होती AGP च्या नेतृत्वान आपल्या मतदाराना कटाक्षपूर्वक बजावल होत की, निवडणूक निकालाच्या वेळी जल्लोष करू नका, आनद सयमानं, दुसऱ्या बाधवाच्या भावना दुखावणार नाहीत अशा पद्धतीन व्यक्त करा. आसाम निवडणुका हे शाततापूर्ण सत्ता परिवर्तनाच्या लोकशाही प्रक्रियेचं उत्तम उदाहरण ठरेल. आसाम करार घडवून आणणं, निवडणुका घेण आणि AGP च्या हातात सत्ता जाऊ देणं इतकच नव्हे तर, आसामच्या स्थैर्य आणि विकासासाठी AGP सरकारला पाठिंबा देणं अशी धोरण स्वीकारून राजीव गाधीनीसुद्धा देशाला हितकारक, दिलदार राजकारण असू शकतं याची प्रचीती आणून दिली आहे.

## पंजाब आणि आसाम

आसाममधल आदोलन पजाबच्या आधी सुरू झाल आणि पजाबच्या नंतर सुरळित मुक्कामावर पोचलं. पजाबच्या आदोलनाला स्पष्ट फुटीरतावादी रंग होता. आसाम ज्या मुद्यावर लढत होता तो राष्ट्रीय हिताचा होता. पंजाबमधलं आंदोलन राजकारणात मुरलेल्या नेतृत्वाच्या हातातून निसटल आणि अतिरेकी गटाच्या ताब्यात गेलं. हे लक्षात घेतल की, आसाम आदोलनाचं आणि नेतृत्वाचं यश जास्तच खुलून दिसतं. या फरकाचं एक विश्लेषण पजाबी आणि असामिया कॅरेक्टरमध्ये सापडेल. सीमेवरचा एक प्रात, सतत युद्ध आणि अनिश्चित परिस्थितीला तोड देण, रक्त आणि बलिदानान रंगून गेलेली शीख इतिहासाची गेली पाचशे वर्षे यानी पजाबी कॅरॅक्टर घडवलय. त्यात युद्धाची एक आस. शौर्य, पराक्रम, आक्रमकता या गुणाची पूजा आहे त्याला हिंसा, रक्तपात याच वावड तर नाहीच उलट बलिदान, हौतात्म्य, जीव घेणं आणि देणं याची ओढ आहे तशी शौर्य आणि पराक्रमानं भरलेली पान आसामच्या इतिहासातही आहेत, पण असामिया कॅरॅक्टर घडवलय ते इथली हवा, विस्तीर्ण जगल, आहाराच्या मवाळ सवयी, वैष्णव संप्रदायाचे सस्कार आणि खास भारतीय स्वभावातली शातताप्रियता यानी. स्वभावरचनेच्या या फरकाचा प्रत्यक्ष आविष्कार भिंद्रावाले–लोंगोवाल व महत–फुकन याच्या स्वभावभेदात दिसतो. भिंद्रावाले–लोंगोवाल यांची विधान अत्यंत भडक असत महंत–फुकन याची भाषा आणि मुद्दे माडायची पद्धत कमालीची मऊ, संयमी असे त्याची वक्तव्य दोनाच्या पाढ्यासारखी सोप्या भाषेत वस्तुनिष्ठ आणि पुरेसा अभ्यास करून माडलेली असत. बेजबाबदार, निराधार वक्तव्य करण्याची सवय असलेल्या छदेवाईक राजकारण्याची सालडी सोलताना अरुण शौरीनी एका लेखात त्याना आसामच्या विद्यार्थी नेत्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवायला सागितल आहे. परकी घुसखोरीचा प्रश्न आणि आसामकडे होत असलेल्या आर्थिक दुर्लक्षाचा प्रश्न या आदोलकानी अभ्यासपूर्ण, तपशीलवार, पुरेशा विश्वासार्ह आकड्याचा आधार देत माडला होता त्यामुळे त्यातल मूलभूत तथ्य नाकारण कोणालाच शक्य झालं नाही आंदोलन फार वेडबाकड घरंगळत गेलं नाही याच हेही एक कारण असू शकेल

## बहिरागत–विदेशी

आदोलनाला दुधारी ताणाना तोंड द्यावं लागल होत. खर तर ज्या मूळ मुद्यासाठी ते लढत होते तो राष्ट्रीय हिताचा आणि महत्त्वाचा म्हणजे परकी घुसखोरांचा प्रश्न, त्यामुळे आसाममध्ये निर्माण झालेला अस्मितेचा संघर्ष, Crisis of Identity आसामचा आर्थिक विकास, असामिया भाषेचा विकास

इ....मुद्दे पूरक होते, पण त्यासाठी एका बाजूला केंद्र सरकारशी त्याना लढाव लागल आणि दुसऱ्या बाजूला ईशान्य भारतातल्या विघटनवादी शक्तीनाही उबरठ्याबाहेर थोपवून धरण्याच काम कराव लागल आदोलनावर प्रादेशिक, बगाली विरोधी, मुसलमान विरोधी, विघटनवादी असे शिक्के प्रारंभापासून मारण्यात आले होते एका मोठ्या, प्रतिष्ठेच्या पाक्षिकान पहिलाच रिपोर्ट दिला होता त्यात आंदोलनाला विघटनवादी म्हटल होतं आणि मुखपृष्ठावर आदोलक विद्यार्थ्यांचा एक ग्रुप-फोटो छापला होता. त्यात पाटया होत्या Indian dogs go out (फोटोतले विद्यार्थी फुटबॉलची टूर्नामेंट जिंकून आलेल्या टीमसारखे पोज घेऊन बसले होते) त्यानतर लगेचच १९८० मध्ये गोहाटीत आलो होतो तेव्हा हे कुठेही दिसल नव्हत. उल्ट प्रारंभीच्या 'बहिरागत हटाव' या घोषणेची जागा आता 'विदेशी हटाव' या अधिक सुस्पष्ट घोषणेन घेतली होती. ('विघटनवादी' या आरोपाच्या बाणान सामान्य असामियाही विद्ध झालेला जाणवला होता.) बहिरागत—बाहेरून आलेले या शब्दात प्रातिकतेचा वास होता बंगाली, भारतीय, मुसलमान, मारवाडी आणि सर्वच नॉन-असामिया भारतीयाच्या मनात भयगड निर्माण करू शकेल असा हा शब्द होता. त्यामुळे त्याच्या जागी अधिक नेमका अर्थ व्यक्त करेल असा 'विदेशी' हा शब्द घालण्यात आला. हा बदल घडवण्यात गोहाटीतले ज्येष्ठ प्राध्यापक, भारतातले महत्त्वाचे पत्रकार आणि रा. स्व. सघ याच योगदान होत असं म्हणतात एवढी शब्दातल्या फरकाची सूक्ष्म छटा सोडली तर आंदोलनाला अधिकृत विघटनवादी रग कधीच नव्हता.

## राष्ट्रीय संदर्भ

प्रारंभी ८० मध्ये सत्तेवर आल्या आल्या इंदिराजींनी आदोलकाच्या आठपैकी पाच मागण्या मान्य केल्या. नतर मात्र चर्चेचं गाडं '६१ की ७१' च्या चिखलात रुतून बसल. बोलणी त्याच त्याच वर्तुळात फिरून फिसकटू लागली. फेब्रुवारी ८३ पूर्वी एकदा तर जवळजवळ संपूर्ण मतैक्य होऊन कोणत्या तरी अज्ञात कारणामुळे प्यादं सापाच्या तोडातून परत शून्यावर येऊन पडले. हे होत गेलं तसा 'आसु'च्या कॅपमध्ये वैताग वाढू लागला. त्यातून दहशतवादी मार्ग स्वीकारायचा दबाव वाढू लागला. त्याच वेळी दुसरीकडे पजाब पेटला आणि दहशतवादी मार्गाचे समर्थन करणाऱ्या घटकाना एक मॉडेल लाभल. आसाम आंदोलन विघटनवादी रस्त्यावर खेचायला ईशान्य भारतातल्या शक्ती आधीच कार्यरत होत्या. त्यानी ख्रिसमसच्या मुहूर्तावर 'Complete Separation is our god.' अशी पत्रक घेऊन सँटाक्लॉज पाठवले होते आदोलनात आपले प्रतिनिधी घुसवले होते. गणसग्राम परिषदेतही फुटीरतेचे प्रवक्ते होतेच पूर्वांचलीय लोक परिषदेचे अध्यक्ष श्री. निवारण बोरा हे याचे सर्वात बोलके उदाहरण. या सर्वांना पजाबमधल्या विघटनकारी दहशतवादाच्या रूपानं नैतिक आधार सापडला. पण या सर्व ताणाना दबावाना तोड देत आदोलनाच्या नेतृत्वान त्याचं शाततावादी, घटनात्मक आणि राष्ट्रवादी स्वरूप डागाळू दिलं नाही. आदोलनाच्या एका टप्प्याला गणसग्राम परिषदेचे दोन घटकपक्ष, पूर्वांचलीय लोक परिषद आणि आसाम जातीयतावादी दल, यानी एकमेकावर आरोप केले होते की त्याना CIA चा पैसा येतो. तेव्हा 'आसु'च्या नेतृत्वान त्याना बजावल होत की, याचा अर्थ कोणाला तरी तो येत असावा ते कोण ते सांगा आणि तो पैसा दूर ठेवा. आंदोलनाच स्वरूप अस राष्ट्रवादी ठेवायला आसाममधल जनमत, ज्याची भारतीयत्वाची जाणीव ठिसूळ नाही आणि आसाम बाहेरच्याही काही शक्तींची मदत झाली. उदाहरणार्थ इतर प्रातातून आदोलनाला वेळोवेळी नुसत शब्दात का होईना लाभलेलं समर्थन, बगालमधून आसाममध्ये गेलेली काही सद्भाव-प्रतिनिधी मडळे वगैरे एम. व्ही. कामतानी आसामला भेट दिली तेव्हा आदोलनाचं कौतुक केलंच पण भारताच्या राष्ट्रीयत्वाची प्रकर्षाने जाणीव करून देत सागितल की आसाम, भारतासाठी एक लढा लढतोय. हेच काम कुलदीप नायर, आचार्य दादा धर्माधिकारी यानी केले. अरुण शौरी तर या युवकाचे विश्वासू मार्गदर्शक बनले होते. आसाम गणपरिषदेची स्थापना ज्या समेलनात झाली त्याच अध्यक्षपद शौरीनी भूषविलं होतं. अशा सर्व पार्श्वभूमीमुळे आसाम गणपरिषद हा पक्ष भौगोलिक अर्थान प्रादेशिक असला तरी त्याचा अर्थ आणि सदर्भ राष्ट्रीय आहे.

अर्थात सगळच कधी सोन नसत आणि कोणतीच घटना परिपूर्ण वरदान असत नाही. पण इतिहासाच्या पानावर आज जाणवणारे हे ठळक रग. आज अधुक, अस्पष्ट वाटणारे रग, प्रवाह उद्या अचानक प्रवाही, बलवान होतीलही; हे आज सागता येत नाही. म्हणून म्हटल 'पुढील भाग पुढील अकी' तूर्त AGP च सरकार आणि 'आसाम करारा'ची कार्यवाही हे प्रवेश सुरू होतील. Power corrupts हा सिद्धात या नव्या युवक नेत्याच्या बाबत खोटा ठरावा अशी ही प्रार्थना करायला हवी. एका यशानंतर एक अध्याय पूर्ण होऊन आता अज्ञात भविष्याचं पान उलटल जाईल तेव्हा आदोलनाच्या अगदी प्रारभी पुन्हा पुन्हा उच्चारल जाणारं एक वाक्य लक्षात ठेवायला हवे ते वाक्य होतं. 'Problem of Assam is problem of India.' कोणत्याही प्राताची समस्या ही भारताची समस्या आहे. पजाबची समस्या ही भारताचीच समस्या होती. गुजरातमधलं राखीव जागाविरोधी आदोलन ही भारताची समस्या होती. प्रादेशिक समस्याना असलेल्या राष्ट्रीय सदर्भाच मान ठेवल तर प्रादेशिकतावादाचा फ्रँकेन्स्टाईन पैदा होणार नाही. आसाममध्ये मध्यवर्ती समस्या काय होती? Crisis of Identity. अस्मितेचा प्रश्न होता तो. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय म्हणून आमची अस्मिता कोणती, राष्ट्रीय जीवनाच गमक कोणत हा Crisis of Identity शिल्लक आहेच. या अर्थान आसामची समस्या ही भारताची समस्या आहे हे खर. आता आसामच्या यशाच रूपातर भारताच्या यशात होण बाकी आहे. म्हणजे Crisis of Identity सुटण आणि राष्ट्रीय अस्मितेचा रसरशीत आविष्कार घडण. इतिहासाच्या पानांवर उद्या याविषयीची अक्षरं उमटायची आहेत.

□

# महाराष्ट्रातील दुष्काळ हटविण्यासाठी उपाययोजना.

प्रा. एस्. एम्. देसरडा, औरंगाबाद

●

(१) दुष्काळ हा आता महाराष्ट्रात नित्याची बाब बनला असून परिस्थिती उग्र झाली की शासन टंचाई निवारण्याच्या काही उपाय-योजना जारी करते. १९५२–५३ नंतर १९७१–७३ ही अवस्था राज्यात अत्यंत खडतर स्वरूपाची दुष्काळी वर्षे ओढवली. आता वर्षानुवर्षे पीक बुडण्याचे, पिण्याचे पाणी व वैरण यांचे प्रश्न आ वासून उभे आहेत. असे असताना दुष्काळ निर्मूलनाच्या मूलगामी योजना का राबविल्या जात नाहीत ? हा रोखठोक सवाल आहे.

(२) खरे तर, ब्रिटिश अमदानीतील १८८० ते १९४५ या काल-खंडातील पाच 'फॅमिन कमिशने' आणि मुंबई इलाख्यातील दुष्काळ व सिंचनविषयक चौकशी समित्या यांनी यासंबंधी बरीच इत्यंभूत माहिती दिली असून वेले यांच्या १९०९ च्या अहवालात 'प्रोटेक्टिव्ह इरिगेशन' प्रकल्पाचा सविस्तर आराखडा सुचविला आहे.

(३) १९ व्या शतकात भारतात २५ व दक्षिणेत (महाराष्ट्रात) बरेच मोठे दुष्काळ पडले. मानमोडी व खडीचे साल या विषयी जुनी मंडळी चर्चा करीत असत ! इंग्रज राज्यकर्त्यांनाही याचा गंभीरपणे विचार करावा लागला. त्यातूनच दुष्काळ निवारण-निर्मूलनार्थ आधी रेल्वे आणि नंतर सिंचन विकासाच्या मोठ्या प्रकल्पांची कामे करण्यात आली.

(४) स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मात्र संरक्षणात्मक सिंचनाऐवजी अधिक उत्पादक पद्धतीच्या सिंचन योजनांना प्राधान्य मिळाले. बर्वे सिंचन आयोगाने यावरच भर दिला. त्यामुळे दुष्काळावर मात करण्यासाठी सिंचन योजनांचा विचार न करता समृद्धीची काही बेटे निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित झाले व ऊस हे मुख्य पीक मानून पाटबंधारे प्रकल्प आखले गेले.

(५) सुरुवातीसच एका आम मात्र बव्हंशी चुकीच्या धारणेचे निराकरण करणे इष्ट होईल. अलीकडे असा समज बळावला आहे की, पर्जन्यमान उत्तरोत्तर कमी होत असून ऋतूचक्रात अफाट बदल झाल्यामुळे वारंवार दुष्काळ ओढवतो. हे उघड आहे की १०–१२ वर्षांच्या काळात काही भागात पर्जन्यमानात फार मोठे उढउतार झालेले दिसतात. मात्र मौसम–विज्ञानाचा विचार करता पाच–दहा वर्षांतील असे बदल म्हणजे निसर्गचक्र वा ऋतूचक्र पालटणे नव्हे !

वास्तविक गेल्या १०–१५ वर्षांत सरासरीच्या ६० ते ७५ टक्के पाऊस पडल्यामुळे अनेकदा दुष्काळ ओढवला आहे तर काही वर्षे सरासरीच्या दिडपट–दुप्पट पाऊस पडला आहे. उदाहरणार्थ–१९८३ मध्ये मराठवाड्यातील निम्म्या तालुक्यात सरासरीच्या दुप्पट पाव-साची नोंद झाली. अंबेजोगाईत १०० इंच पाऊस तर बिलोलीत १२० इंच !

ही वस्तुस्थिती उल्लेखिण्याचे कारण असे की दुष्काळ हा दैवी कोप वा नैसर्गिक आपत्ती मानून समाज व विशेषतः शासन तरी काय करणार, अशी असहाय्यतेची भावना अकारण बळकट झाली आहे. तसे पाहता निसर्ग व मानवाच्या द्वंद्वातूनच विविध शोध लागले, समाजाचा विकास झाला. विज्ञान–तंत्रज्ञानाने प्रचंड झेप घेतली. मनुष्य निसर्गाच्या गती नियमांचे पालन करतो ते त्याला हतबल होऊन शरणागती पत्करून नव्हे, तर गरजेनुसार त्याला काबूत आणून गरजेप्रमाणे आकळून ! हेच तर मानवी प्रगतीचे मर्म व इतिहासाचे सूत्र आहे.

(६) विज्ञान आज एवढे पुढे गेले आहे की, ढगांना आकृष्ट करून पाऊस पाडणे शक्य आहे. पावसाचे खंडित स्वरूप, आणि ऐन पीकवाढीसाठी निकडीच्या कालात दडी मारून हुलकावणी देण्याच्या स्थितीला काबूत आणण्यासाठी हा प्रभावी उपाय ठरावा.

(७) उष्ण कटिबंधातील कोरडवाहू शेतीचे तंत्र आज इतपत प्रगत झाले आहे की १० ते १५ इंच पावसावर आणि त्यातही ४०–५० दिवसांची उघडीप झाली असता चांगले पीक घेणे शक्य आहे. भू आणि जल संवर्धनाच्या सुधारित पद्धती, मशागतीच्या व पेरणीच्या अवजारांत सुधारणा, पेरणीच्या वेळापत्रकात बदल, पीकरचनेत बदल संमिश्र पिके व अगदीच उथळ जमिनीत आणि अनिश्चिततेच्या क्षेत्रात पशुपालन व वनवाशेतीवर भर. इस्त्रायलचे उदाहरण तर बहुश्रुत आहेच. त्याचप्रमाणे व्हिएतनाम, चीन व अन्य देशातही कमीतकमी

पाऊस व योग्य प्रकारे साठविलेले पाणी यावर उत्तमपैकी शेती केली जाते. भारततही हैद्राबादला ICRISAT आणि 'अखिल भारतीय कोरडवाहू शेती सुधार प्रकल्पात,' तसेच सोलापूर येथील जिरायत शेती-सुधार कार्यक्रमातून हे ठामपणे सिद्ध झाले आहे. बाजरी, ज्वारी तूर, करडी इ. पिकांचा यात समावेश आहे.

(८) अगदी ऊसासारख्या पिकालाही ठिबक ( ड्रिप ) पद्धतीने पाणी देऊन सध्याच्या सरासरीच्या दुप्पट तिप्पट उत्पादन करता येईल. हवाईतील ही पद्धती राहुरी येथे यशस्वीपणे राबविली गेली. म्हणजे आज भुईदांड व कालव्यातून लोंढा पद्धतीने जेवढे पाणी दिले जाते व वाया जाते त्यावर किमान चोपट क्षेत्र जोपासले जाईल. फळ–बागायतीसाठी तर ह्या पद्धतीचो सर्वोत्तम म्हणून शिफारस केली आहे.

त्याचप्रमाणे तुषार अगर फवारा ( स्प्रिंकल् ) पद्धतीनेही पाण्याची बरीच बचत होते. खेरीज सेंद्रिय सत्वाचा व रासायनिक खतांचा वापरही अधिक परिणामकारक होतो.

## नाथसागर ... मीठसागर होईल !

(९) आवर्जून लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे आज ज्याप्रकारे पाटाच्या पाण्याचा वापर होतो त्यातून जमीन उफाळण्याचे, क्षारयुक्त म्हणजे चिबड होण्याचे प्रमाण सारखे वाढत आहे. प. महाराष्ट्राच्या अनेक धरणांच्या लाभक्षेत्रात याचे दुष्परिणाम स्पष्ट झाले असून ऊसाचा उतारा ( टनेज ) उत्तरोत्तर कमी होत आहे. मराठवाड्यातील पूर्णा आणि जायकवाडीच्या लाभक्षेत्रात तर ही समस्या फारच भेडसावणारी असून उपलब्ध पाण्याच्या अत्यल्प वापराचे ते एक महत्त्वाचे कारण आहे. व्यवस्थित चर काढून माफक प्रमाणात फेर पालटाने पाणी दिल्याखेरीज ही समस्या, सुटणार नाही. अन्यथा नाथसागर हा मीठसागर होईल. जायकवाडी वरदान ठरण्याऐवजी शाप ठरेल !

(१०) उत्तर व पूर्वेकडील राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रात उपलब्ध जलसंपत्ती कमी आहे, हे खरे. त्याशिवाय ह्या राज्याचा बराच भाग पर्जन्य छायेच्या टापूत मोडतो. तथापि पर्जन्यमानाच्या दृष्टीने ४३ टक्के लागवडक्षेत्र मध्यम व हमखास पावसाचे असून त्यात ३० ते ४५ इंच पाऊस पडतो. २१ टक्के क्षेत्र अधिक पावसाचे असून त्यात ४५ इंचांहून जास्त व त्यातही किनारपट्टीवर १०० इंचांहून जास्त पर्जन्यमान आहे. उरलेले ३६ टक्के क्षेत्र मात्र अवर्षण प्रवण असेच आहे.

विभागवार विचार करता खानदेश व नाशिकचा ४० टक्के (उत्तर महाराष्ट्र) व प. महाराष्ट्राचा ७० टक्के भाग अवर्षणग्रस्त आहे. तर मराठवाड्यात असे क्षेत्र १८ टक्के आहे. कोकण आणि विदर्भाचा पूर्व भाग हे उच्चतम पावसाचे विभाग आहेत तर मराठवाड्याचा पूर्व भाग (परभणी–नांदेड हे जिल्हे) आणि उर्वरित विदर्भ (वऱ्हाड) हे हमखास पर्जन्याचे विभाग आहेत. औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद या जिल्ह्यांतील १९ आणि नाशिक, धुळे, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, नगर आणि जळगाव या जिल्ह्यांतील ६८ असे एकूण ८७ तालुके सुखटणकर समितीने टंचाईग्रस्त ठरविले आहेत.

(११) महाराष्ट्र राज्याची वापरण्यायोग्य भूपृष्ठीय जलसंपत्ती २६०० टी. एम्. सी. एवढी आहे. त्यापैकी जून १९८५ पर्यंत पूर्ण झालेल्या पाटबंधारे प्रकल्पांद्वारे ५५० टी. एम्. सी. पाणी अडविले गेले. (त्याचा पुरेपूर वापर होत नाही.) सध्या ज्यांचे काम चालू



आहे अशा योजनांतून आणखी ८५० टी. एम्. सी. पाण्याच्या योजना अद्यापी हाती घ्यावयाच्या आहेत. त्यापैकी कोकणात सर्वाधिक म्हणज ५७५ टी एम् सी., गोदावरीच्या खोऱ्यात ४६५ तर कृष्णा खोऱ्यात ७० टी एम. सी. पाणी आहे. खेरीज तापी खोऱ्यातील १०० टी. एम् सी. पाण्याचा निवाडा व्हायचा आहे.

सहज आकलनासाठी लागवडक्षेत्राच्या आणि टक्केवारीच्या भाषेत सागायचे तर ६२ लक्ष हेक्टर जमिनीस भूपृष्ठीय पाण्याने सिंचित केले जाऊ शकते. तात्पर्य, लागवडक्षेत्राच्या ३० टक्के क्षेत्र सिंचित होईल. बर्वे अहवालानुसार हे ५२ लक्ष हेक्टर अगर २६ टक्के होते. जागतिक बँकेच्या शिफारशीत सुधारानुसार (लाईनिंग इ) ते १० लक्ष हेक्टर अगर सुमारे पाच टक्क्यांनी वाढते.

भूपृष्ठाखालील पाण्याच्या सुधारित अनुमानानुसार विहिरीद्वारा १५ टक्के क्षेत्र ओलीत होईल. ज्याचा तपशील पुढे दिला आहे. म्हणजे एकदरीत ४५ टक्के लागवडक्षेत्रास सिंचन सुविधेची हमी मिळू शकते. अर्थात हेही सध्याचे निकष व पद्धती यानुसार.

प्रचलित पद्धतीऐवजी दाडेकर–देडस्कर–देशमुख (घरीडी) समितीने सुचविलेले आठमाही पाणी पुरवठयाचे तत्त्व स्वीकारल्यास आणि हेक्टरी एक लक्ष घनफूट या हिशेबाने पाणी दिल्यास सिंचनाखालील क्षेत्र चौपट होईल. थोडक्यात, लाभक्षेत्र (कमाड एरिया) खूप विस्तृत होईल. खरीप हगामात १५ इच आणि रवी हगामात २४ इंच पाणी देऊन हे भागेल. त्यात प्रत्येक शेतकऱ्याचा चवथा हिस्सा क्षेत्रास खरीपात व चवथा हिस्सा क्षेत्रास रवीत पाण्याची हमी मिळेल. आज मितीला ऊसास १६० ते १८० इच पाणी दिले जाते, ते तात्काळ थाबविले पाहिजे. पाण्याचे सर्वदूर आणि न्याय्य वाटप होण्यासाठी याखेरीज अन्य मार्ग नाही.

## सिंचनक्षेत्र दुप्पट करता येईल

(१२) सांप्रत कृष्णा व भीमा याच्या खोऱ्यातील धरणातून सरासरी ६० इंच पाण्याची मात्रा (डोस) दिली जाते, त्याऐवजी वर दर्शविल्याप्रमाणे पाण्याचा वापर केल्यास केवळ भीमेच्या खोऱ्यात सध्याच्या आराखड्यानुसार जे महत्तम ७.५ लक्ष हेक्टर सिंचन होईल ते २० लक्ष हेक्टरपर्यंत वाढेल. त्या धर्तीवर कृष्णेच्या खोऱ्यात लिफ्ट केल्यास सातारा जिल्ह्यातील खटाव, कोरेगाव आणि सागली जिल्ह्यातील खानापूर, जत, मिरज, व तासगाव या दुष्काळी तालुक्यास सिंचनाचा लाभ मिळेल. ताकारी योजनेचे खरे महत्त्व यात आहे. कृष्णा करारानुसार केवळ इ. स. २००० पर्यंत राज्याच्या वाट्याच्या पाण्याचा वापर करण्याचा कोलदाडा म्हणून नव्हे. वसतदादानी याबाबत जागरूकता जरूर दर्शविली. मात्र त्यानी केवळ स्थानिक पुढाऱ्याची भूमिका न निभावता राज्याच्या व सबंध कोरडवाहू शेतकऱ्याच्या व्यापक हिताची जाण ठेवून सिंचनाच्या नियोजनात मूलगामी बदल घडवून आणले असते तर त्याची कामगिरी आठवणीत राहिली असती सध्याच्या स्वार्थी राजकीय रेटारेटीत ही अपेक्षा करणे गैर ठरेल !

विशेष भर देऊन सागण्याची बाब म्हणजे कृष्णा–कोयना–अग्रणी –येरला याच्या पाण्याचा समूह (वाटरग्रीड) केला आणि योग्य त्या ठिकाणी लिफ्ट केले तर तर अधिक जास्त, विस्तृत क्षेत्रावर पाणी पसरविले जाऊ शकते. त्यामुळे कृष्णा खोऱ्यातील सिंचनक्षेत्र दुप्पट म्हणजे ९ लक्ष हेक्टर होईल. भीमा, तापी आणि वैनगगा वगळून गोदावरी खोऱ्याचा विचार केल्यास आज ती सिंचनक्षमता २२ लक्ष हेक्टर धरली जाते ती ५६ लक्ष हेक्टर होईल. तात्पर्य सिंचनास आज जाणवणाऱ्या मर्यादा ओलाडून तशीच मोठी उपलब्धी शक्य आहे. महाराष्ट्राच्या शेतीचा कायापालट करण्याचा हाच एक शाश्वत मार्ग आहे.

(१३) आता आपण सिंचननिर्मिती, पाण्याचा वापर व आगामी सिंचन–विकास समस्या याकडे वळू या.

जून १९८१ अखेर मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पाद्वारे २२७० लक्ष हेक्टर सिंचननिर्मिती झाली. त्यात ६ व्या योजनेत १३४० कोटी रु खर्च होऊन ५.५ लक्ष हेक्टर क्षेत्र येते. बर्वे आयोगाच्या शिफारशीनुसार १३०० कोटीची तरतूद होऊन १९८० पर्यंत तमाम सभाव्य धरणयोजना पूर्ण व्हावयास पाहिजे होत्या. आज मितीला मूळ आराखड्यातील केवळ तिसरा हिस्सा सिंचन योजनाचे काम झाले आहे.

जुन्या योजनेत पाटबधारे प्रकल्पासाठी १३०० कोटीची तरतूद केली असून त्यात ४५ लक्ष हेक्टर सिंचन निर्मितीचे उद्दिष्ट आहे. याचा अर्थ वाढता खर्च आणि घटती तरतूद लक्षात घेता आणखी २५ वर्षे उर्वरित पाटबधारे प्रकल्प पूर्ण होतील याची खात्री नाही.

तिसऱ्या योजनेतील जायकवाडी, उजनी यासारखे प्रकल्प पाचपट खर्च होऊनही अद्यापी रेंगाळत आहेत. ज्या कृष्णा कराराची टागती तलवार आहे– इ. स. २०००– अगदी त्या योजनाही पूर्ण करण्यासाठी २००० कोटी रुपयाची तरतूद येत्या १५ वर्षांत करावी लागेल, असे पाटबधारे मत्र्यानी तेलगू–गगेच्या सदर्भातील गदारोळाचे निराकरण करताना सागितले. एकदरीत किंमतीने किमान १० हजार कोटीची तरतूद करावी लागेल. हा सर्व पैसा कसा उपलब्ध होईल हा मुख्य प्रश्न आहे पुरेशा निधीअभावी हे प्रकल्प असेच रखडत राहिले तर दुष्काळ दूर कसा करता येईल ?

आज अनेक मोठ्या धरणांत 'डेड स्टोरेज'चे प्रमाण ३० ते ४० टक्के आहे. त्यासाठी आठमाही पाणीपद्धती आणि कालवे व जलाशये यातून २०० फुटापर्यंत लिफ्ट करून पाणी वापरणे हाच उपाय आहे. अर्थात त्यामुळे पाटबंधारे प्रकल्पांचा खर्च सध्याच्या दुप्पट–तिप्पट होईल. आजच मोठ्या धरणाचा दर हेक्टरी सिंचनखर्च २५ ते ३० हजार पडतो. उर्ध्व पेनगगा प्रकल्पात तो ३५ हजारापर्यंत वाढला आहे हे खरे की यात लाभक्षेत्रातील जमीन सपाटीकरण, चाऱ्या इ. कामे अतर्भूत आहेत. त्याखेरीज पाण्याचा वापर होऊ शकत नाही

येथे आणखी एका बाबीचा उल्लेख करण अनाठायी होऊ नये ती म्हणजे जागतिक बँकेने लाईनिंगची जी शिफारस घातली, तिची जरुरी नाही, असे काही सिंचन अभियत्याचे मत आहे. कारण एवीतेवी सपूर्ण क्षमतेएवढे पाणी वापरास ८–१० वर्षे लागतात. तोवर जमिनीत वाहते तसे पाणी मुरू देणे अधिक उपयुक्त. कर्ज घ्यायचे तर ह्या अटी स्वीकारण्याखेरीज गत्यंतर नाही. तोबऱ्याबरोबर लगाम येतोच !

(१४) भारतातील दारिद्र्य व दुष्काळ निर्मूलनासाठी गुतवणुक-


क्षम आधिक्य (सरप्लस) सातत्याने वाढण्याची नितांत जरुरी असताना स्थिती नेमकी उलटी आहे आणि जे काय आधिक्य आज निर्माण होते त्याची विल्हेवाट प्रशासकीय, अनुत्पादक खर्चासाठी तसेच ऐतखाऊ वर्गाचे चोचले पुरविणाऱ्या भपकेबाज वस्तू बनविण्यासाठी लागते !

धरण योजनाची गती धीमी असणे, कामे १०–२० वर्षे रेंगाळणे ही एक बाजू तर दुसरीकडे महत्प्रयासानी उपलब्ध झालेल्या पाण्याचा वापर निम्म्यापेक्षा कमी! असे निरीक्षण आहे की, धरण पूर्ण होण्यास किमान दहा वर्षे लागतात आणि पाणी वापरण्यास आणखी अकरा वर्षे! म्हणजे २१ वर्षांच्या गुंतवणुकीपासून ना पाणीपट्टीचे उत्पन्न मिळते ना उत्पादनात भर पडते. जायकवाडी, पूर्णा, भीमा इ. धरणास पाण्याचा वापर ३० ते ४० टक्के एवढा कमी होतो प्रचलित पिके आणि जमीन मालकी व वहिनी पद्धतीमुळे पाणी वापरण्यास अनेक अडसर आहेत. बागायती शेतीसाठी लागणारी गुंतवणूक करण्याची व जोखीम पत्करण्याची कुवत प्रत्यक्ष राबणाऱ्या लहान व मध्यम शेतकऱ्याची नसते तर बडया शेतकऱ्याला उत्पन्न मिळविण्याचे सावकारी, खरेदी-विक्री स्थावर व जंगम मालमत्तेत गुंतवणूक व उलाढाल हे मार्ग खुले आहेत. उत्पादनापेक्षा दलाली, खरेदी-विक्री आणि तत्सम प्रकारानी सहज व अधिक पैसा मिळविण्याचे मार्ग मोकळे आहेत तोवर ही परिस्थिती पालटणे कदापि शक्य नाही. आपल्या अर्थव्यवस्थेचे आज हे सर्वात मोठे दुखणे आहे आणि समाजातील तमाम विधायक, कष्टप्रद आणि उभारणीच्या उपक्रमाला छेद देणारे आहे. सरळमार्गी जीवन आणि राष्ट्र उभारणीसाठी आवश्यक मूल्य सकल्पना त्यामुळे मोडीत निघाल्या आहेत. खेरीज धान्य व अन्य शेतमाल उत्पादनाची किमान पातळी लक्षात घेता शासनाला दारिद्र्य व दुष्काळाची फारशी फिकीर वाटत नाही. भूकबळी होऊन उद्रेक भडकण्याइतपत परिस्थिती वाईट नाही व ती काबूत ठेवण्याच्या अनेक हिकमती केल्या आहेत मात्र यामुळे देशाच्या शेती–उत्पादनात प्रदेशवार, पिकवार, शेतकरी गटवार भयानक स्वरूपाचा असमतोल उभा ठाकला आहे. भला मोठा शेतकरी समुदाय उत्पादन-चक्राबाहेर फेकला गेला असून त्यातून वेगळ्या तऱ्हेने प्रश्न उद्भवले आहेत याची पुरेशी जाण धोरण ठरविणाऱ्या वर्तुळात आढळत नाही.

(१५) रोजगार हमी-योजना फार मोठा गाजावाजा होत असला तरी उपलब्ध धनशक्तीचा वापर करून कायमस्वरूपी उत्पादकीय मत्ता निर्मितीच्या दृष्टीने तिची अमलबजावणी होतच नाही. ब्रिटिशानी दुष्काळ निवारण–संहितेत योजिल्याप्रमाणेच केवळ आपत्कालीन, भूतदयावादी निर्वाहाचे साधन म्हणूनच ही कामे घेतली जातात.

अन्यथा गेल्या १३ वर्षात १०५० कोटी रु. खर्चून कागदोपत्री दर्शविलेल्या १५२ कोटी मनुष्य दिवसकामात केवढी प्रचंड मत्ता निर्माण व्हावयास पाहिजे होती? मराठवाडा विभागात रोजगार हमी योजनेत गेल्या पाच वर्षात १५० कोटी रु. खर्ची पडले असून अदमासे २२ कोटी मनुष्य दिवस रोजगार पुरविला गेला

येथे एक बाब स्पष्टपणे बजावली पाहिजे की, पंचक्रोशीत अगर स्थानिक स्वरूपाचे काम याला फारसा अर्थ नाही. त्यातून छोटेमोठे पुढारी व अधिकारी याना मलिदा लाटण्यास जास्त वाव असतो. मात्र फारच कमी उत्पादक कामे त्यातून साकार होतात. खरे तर




लाखो मजूर दरवर्षी शेकडो मैल राज्यातील साखर कारखान्यातच नव्हे तर परप्रातात–थेट राजस्थान कॅनालपर्यंत कामासाठी जातात. असे असताना केवळ स्थानिक कामाचा अट्टाहास कशासाठी ? कोरडवाहू शेतीचे हगामी स्वरूप लक्षात घेता व शेतमजूराच्या वाढत्या संख्येचा विचार करता लाखो मजुराना शेतीच्या सामान्य राहाटीपासून विलग करून प्रकल्प उभारणीचे कामही समाविष्ट केले पाहिजे. गेल्या पाच वर्षातील रोजगार हमी योजनेवरील मजुराची हजेरी पाहिली तर ती किमान पाच लाखावर टिकून आहे. निदान एवढ्या आकाराची 'प्रकल्पसेना' तरी सघटित केली पाहिजे त्यातूनच श्रमाचा सामूहिक आविष्कार दृढमूल होऊन नवनिर्मिती होईल.

महाराष्ट्रात केवळ शेतमजुराची सख्या ७० लक्ष असून मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यात ग्रामीण लोकसख्येच्या ३० ते ५० टक्के लोक निव्वळ शेतमजूर आहेत. ज्याची स्वत च्या शेतीवर गुजराण होत नाही अशा बहुसख्य कोरडवाहू व छोटया शेतकऱ्याची सख्याही जवळपास तेवढीच आहे. त्याचे भवितव्य ओलिताची सोय होण्यावरच सर्वस्वी अवलबून आहे. बागायती शेतीत निदान जिरायतीच्या दुप्पट अधिक मनुष्य व बैलबळ लागते.

सबब रोजगार हमी योजनेला भ्रष्टाचार व लागेबाध्याचे कुरण बनवून आपल्या कष्टकऱ्याना षढ, पगू व लाचार न बनविता सामाजिक सघटनाचे प्रभावी हत्यार बनविणे ही आजची काळाची निकड आहे. एवढेच नव्हे तर रोजगार हमी योजना ही श्रमगुलामगिरी झुगारून 'विकासाचे सैनिक' व स्वावलबनाचे नियते बनण्याची उर्मी निर्माण करणारे साधन झाली पाहिजे.

(१६) पाटबधारे प्रकल्पावर उत्पादकीयदृष्ट्या श्रमशक्तीला कारणी लावणं क्रमप्राप्त आहे. भूपृष्ठावरील पाण्याबरोबरच भूगर्भातील पाण्याचाही विनियोग केला पाहिजे. त्याविषयी आज नाना शंका कुशंका व्यक्त केल्या जात असून तज्ज्ञ व जाणकारामध्येही बराच मतभेद व गोंधळ दिसतो. तथापी १९७२ नंतर भूजलासंबधी शास्त्रीय पद्धतीने नेमका आढावा घेऊन विकास करण्यासाठी 'भूजलसर्वेक्षण यत्रणे' ची निर्मिती झाली असून तिने आतापर्यंत सपूर्ण राज्याचे तीनदा सर्वेक्षण गेले आहे. पाणी खूप खोल गेले, गायब झाले या

सर्वसाधारण हाकाटीला हे अंदाज छेद देणारे आहेत.

सदर सर्वेक्षणातील अनुमानानुसार महाराष्ट्रातील वार्षिक भूजल पुनर्भरण साडेतीन हजार कोटी घन मीटर्स असून आज चालू असलेल्या १० लक्ष विहिरीद्वारा ७५० कोटी घनमीटर्स एवढा उपसा केला जातो म्हणजे शिल्लक साठ्यावर १८ लक्ष नवीन विहिरी खोदण्यास वाव आहे. मराठवाड्यात साडे तीन लक्ष विहिरी सकल्पित आहेत. राज्याच्या १४८१ पाणलोट क्षेत्रांपैकी केवळ ७७ पाणलोट क्षेत्रात ६० टक्क्यापेक्षा अधिक भूजल वापरले जाते. तर अन्यत्र वापर २५ ते ३० टक्के आहे. प्रत्येक पाणलोट क्षेत्रातील भूजल साठ्याचा तपशील या सर्वेक्षण यंत्रणेने दिला आहे. जोवर विविध भौगोलिक रचनेतील निदान १० टक्के पाणलोट क्षेत्रांना पूर्ण विकास होत नाही तोपर्यंत या अनुमानाविषयी (अतिशयोक्त वाटत असले तरी) शंका व्यक्त करणे रास्तच नाही. शास्त्रीय अंदाज हे काही पाणाड्याचे पायाळूच आडाखे नव्हेत ! यासाठी द्रुतगतीने १० टक्के पाणलोट क्षेत्रविकासाचे काम छेडून पडताळा घेणे हाच मार्ग आहे.

या संदर्भात काही अनुषंगिक बाबींचा निर्देश करणे युक्त होईल. मराठवाड्यात गेल्या १३ वर्षांत पिण्याच्या पाण्यासाठी २० हजार विंधन विहिरी खोदल्या असून त्यातील ७३ टक्के यशस्वी गणल्या जातात. (याचा अर्थ २५० लोकांना एक याप्रमाणे २६ लक्ष लोकांची पिण्याच्या पाण्याची सोय याद्वारे झाली. त्याचा दरडोई खर्च १०० रु. पडतो. जो निश्चितच आरोग्य व रोगराईवर एवढ्या खर्चाची बचत करू शकतो तात्पर्य या स्वरूपाच्या गुंतवणुकीचे अनेक पदर आहेत.) अर्थात यापैकी अनेक हापसे आज बंद आहेत. उपसण्याचा सोयीचा व दुरुस्तीचा अभाव, त्याचप्रमाणे योग्य पातळीपर्यंत बोअर गेले नाहीत, एक तर तेवढे खोल जाण्यासाठी लागणारे बोअर–मशीन नव्हते आणि दुसरे म्हणजे पाणी लागले की भागले अशी भूमिका, ही त्याची कारणे असू शकतात.

थोडक्यात महाराष्ट्रात उपलब्ध जलसाठा भरीव स्वरूपाचा आहे. अर्थात या भूजलसाठ्याचा विनियोग करण्याची ताकद सर्वसामान्य शेतकऱ्यात नाही. केवळ कर्जपुरवठा करूनही याला फार गती येणार नाही. त्यासाठी सार्वजनिक यंत्रणेमार्फत विहिरी खोदण्याचा कार्यक्रम तात्काळ राबविला पाहिजे. यासाठी प्रथम पाणी ही सामाजिक संपत्ती मानून त्याच्या वापराचे नियमन कायद्याने ठरविले पाहिजे. प्रत्येक शेतकऱ्याच्या एका पिकास व उन्हाळ्यात एका एकरास ओलिताची हमी याद्वारे देता येईल.

(१७) मागील एक अनुभव येथे ध्यानी घेण्याजोगा आहे १९७२–७३ च्या दुष्काळात शासनाने ६० हजार सार्वजनिक विहिरींचे काम हाती घेतले त्यातील २० हजार मराठवाड्यात होत्या. मात्र ९६ टक्के विहिरी अपूर्ण राहिल्या. एक तर त्या पाण्याच्या पातळीपर्यंत खोदल्या गेल्या नाहीत. दुसरे बांधकाम न झाल्यामुळे पुढे त्यांची पडझड झाली. एवढे महत्त्वपूर्ण व योग्य दिशेचे काम वाया गेले. ज्या तुरळक ठिकाणी बांधकाम झाले व पाणी उपसण्यासाठी पंप बसविले गेले तेथे पाण्याचा वापर चांगल्या प्रकारे होऊ लागला.

(१८) शेतीक्षेत्रातील एतद्विषयक कामाचे मुख्य सूत्र आहे ते भू आणि जलसंवर्धन आणि विकास दुष्काळ निवारणाचा हा गाभा आहे. या दृष्टीने शेतवार, शिवारवार आणि पाणलोट क्षेत्रवार सर्वंकष स्वरूपाची कामे हाती घेतली पाहिजेत.

अगदी कमी व अनिश्चित पर्जन्यमानाच्या टापूतही जो काही पाऊस पडतो तो सर्व वाहून जातो. उभ्या पिकाला व ओल साठविण्यासाठी फारच कमी उपयोगी पडतो. खेरीज बांधबंदिस्ती व पाणी अडविण्याच्या योग्य सोई नसल्यामुळे जमिनीची मोठ्या प्रमाणावर धूप होते. आपण एका सर्वसाधारण शिवाराचा विचार केल्यास असे दिसते की २० इंच पाऊस पडणाऱ्या १००० हेक्टरच्या शिवारात २० कोटी घनफूट पाणी पडते. त्यापैकी ४ कोटी घनफूट पाणी निव्वळ वाहून जाते. एक एम. सी. एम. टी. म्हणजे १० लाख घनफूट पाण्यात सुधारित पद्धतीनुसार २५ एकर पिकाला पाणी देता येते. म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक शिवारात किमान २५० हेक्टर जमीन ओलिताखाली आणता येईल. शेतकरी, गावतळी, नालाबंदिस्ती या पद्धतीने खरीप व रब्बी पिकास संरक्षणात्मक एखाद–दुसरे पाणी देता येईल. पुरंदर तालुक्यात आणि औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील काही खेड्यात नालाबंदिस्ती व बंधारे बांधून पाणी अडविल्यामुळे परिसरातील विहिरींना मुबलक पाणी मिळते हे सिद्ध झाले आहे. मागे शासनाने 'पाणी अडवा आणि जिरवा' ही घोषणा केली ती योग्य असली तरी कागदावरच अडली असून हितसंबंधी मंडळी पदोपदी तिला जोखीत आहे. एका बाजूस पाणी नाही, पाणी नाही ही ओरड तर दुसरीकडे एवढे पाणी निव्वळ वाया जाते. आबाळीमुळे आमच्या जमिनीचे भाडेच फुटले त्यात ओल साठणार तरी कशी ? तेव्हा निसर्गाची अवकृपा की शेती व्यवस्थेला आलेली अवकळा हे दुष्काळाचे कारण आहे ?

मागील दुष्काळात मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर बांधबंदिस्ती व पाझर तलावाची कामे झाली पण त्याची पुरेशी दक्षता न घेतल्यामुळे लाभ पदरी पडू शकले नाहीत.

१९७२–७३ च्या दुष्काळात १ कोटी रुपयात ५० लक्ष मनुष्यदिवस काम होत होते त्यावेळी सरासरीने २० ते २५ लक्ष व जास्तीत जास्त ५५ लक्ष मजूर तीन वर्षे कामासाठी उपलब्ध असता किती मोठी उत्पादक कामे व्हावयाला पाहिजे होती ? चीनने अशी कामे कशा प्रकारे करवून घेतली याचा तपशील आर. के. पाटील, कृष्णाप्पा व मोहिते यांच्या समितीने चीनची पाहणी करून दिला आहे.

सारांश, प्रत्येक शेतीतील पाणी व माती शेतात, शिवारातील पाणी व माती शिवारात, पाणलोट क्षेत्रातील पाण्याचा कमाल वापर हे मुख्य सूत्र अवलंब करून भू आणि जलसंवर्धन करणे ह्याखेरीज तरणोपाय नाही.

## श्रमाचे सहकारीकरण

१९. उपरिनिर्दिष्ट बाबींची कार्यवाही करण्यासाठी अडचण तंत्रज्ञान अगर साधनसामुग्रीची कमतरता ही नसून यासाठी लागणाऱ्या सामूहिक प्रयत्न व संघटनाची आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे जमीन व पाण्याचा वापर व्यक्तिगत पातळीवर खाजगी नफ्यातोट्याचा विचार करून केला जातो व त्यामुळे स्थायी स्वरूपाच्या आणि समाजहिताच्या दृष्टीने अत्यावश्यक बाबींकडे संपूर्ण दुर्लक्ष होते. दुष्काळ वारंवार ओढवण्याचे खरे कारण हे आहे. केवळ पाऊस थोडाफार कमीजास्त अगर मागे-पुढे होण्याने दुष्काळ पडत नाही तर शेतीव्यवस्थेमध्ये पिढ्या न पिढ्या चालू असलेल्या दुर्दशेमुळे त्याची झळ लगेच पोहोचते. शेती व शेतकऱ्यात अवर्षण पेलण्याची ताकदच पार खलास झाली आहे.

'हरितक्रांती'च्या सपाट्यात जो महागडा व उत्पादनसाधनांचा बेछूट वापर करणारा भांडवलप्रचुर शेती विकास–मार्ग अवलंब केला आहे त्यातून अनेक नवे प्रश्न उभे राहिले आहेत. शेतीविकास म्हणजे प्रचंड यंत्र-तंत्र व अमेरिकन पद्धतीचे आधुनिकीकरण ह्या धोरणामुळे गुंतागुंत वाढत आहे. रासायनिक व अभियांत्रिकी आदाने व अती ऊर्जा वापरावर आधारित शेतीचा भांडवली मार्ग आज जागतिक पातळीवरच गोत्यात आला आहे आणि आपण एवढ्या उशिरा त्या

मार्गाने वाटचाल करणे हे कितपत बरोबर आहे ?

भू आणि जलसंवर्धनाचे सांकलिक कार्यक्रम राबविणे, वनीकरण व जंगल विकास आणि पाणलोट क्षेत्रवार श्रमशक्ती मुख्य साधन मानून विकास करण्यासाठी जमीन, श्रम आणि कसवणुकीच्या साधनांचे सहकारीकरण केल्याखेरीज कुठलीच योजना यशस्वी होणे शक्य नाही. श्रमाचा व साधनांचा सहकारी आविष्कार करण्यात आज अनेक कायद्याचे व हितसंबंधाचे अडथळे आहेत ते दूर करून स्थायी, त्यागी व निष्ठावंत कार्यकर्त्यांचा या कामाला वाहून घेणारा संच निर्माण झाल्याखेरीज परिस्थिती मूलत: बदलणार नाही. टंचाई निवारणाची आचारसंहिता, युद्धपातळीवरून परिस्थिती हाताळण्याच्या घोषणा, तगाई, चाराकाम, पाण्यासाठी तात्पुरत्या योजना अकार्यक्षमतेने अंमलात आल्या तरी रचनात्मक परिवर्तनाला पर्याय होऊ शकत नाही, हा या सर्वेक्षणाचा मतितार्थ आहे.

२०. १९७२ पासून शासनाने टंचाई निवारणासाठी व पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासाठी एक हजार कोटी रु. चा खर्च केला. मात्र त्यातून तात्पुरता दिलासा देण्यापलीकडे फारसे साध्य झाले नाही. आज महाराष्ट्राच्या शेतीत एक भयानक स्वरूपाची कुंठित अवस्था निर्माण झाली आहे. नियोजनमंडळासाठी डॉ. अलग व डॉ. भल्ला यांनी केलेल्या अभ्यासात हे दर्शविले की १९६० ते ७५ च्या काळात २६ पैकी २३ जिल्ह्यांचा विकासवेग उणे होता. औद्योगिकदृष्ट्या सर्वात आघाडीवर असलेल्या राज्याच्या शेतीची एवढी पिछेहाट होणे खरोखरीच चिंतेची बाब आहे.

१९७२–७३ या वर्षाच्या शेती-उत्पादनात ६७० कोटी रु.ची घट झाली. गेल्या १५ वर्षांत महाराष्ट्राचे शेती-उत्पादनात किमान ३००० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. चालू वर्षी हे ८०० कोटीच्या घरात आहे. खेरीज जनावरांची व माणसांची झालेली आबाळ विचारायला नको. लाखो शेतकरी–शेतमजूर कुटुंबे देशोधडीला लागली आहेत. कर्जबाजारीकरण आणि अनिश्चितता यांच्या गर्तेत खोलवर रुजलेला शेतकरीवर्ग हवालदील बनला असून सर्वसाधारण पाऊस पडला, निसर्गाची भरपूर मेहरनजर असली तरी भरघोस पिके घेऊ शकत नाही, अशीच आजची परिस्थिती आहे. वर्षानुवर्षे मानवी अकर्तृत्वामुळे ओढवणाऱ्या दुष्काळाचा हा संचित परिणाम आहे.कोरडवाहू शेतीत हेक्टरी उत्पादन ५००० पेक्षा कमी आहे.एरवी ही १–३ लोकसंख्या दुष्काळसदृश परिस्थितीत हलाखीचे जीवन जगत असते. उपोषण, आबाळ, रोगराई, दैन्यावस्था इत्यादींच्या तावडीतून निम्या लोकसंख्येची सुटका करण्याचा हा यक्ष प्रश्न आहे. निदान दुष्काळात तरी शासनाला याची दखल घ्यावी लागते, हेही कमी नव्हे !

सबब, हा गुंता सोडविण्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्थेची आमूलाग्र पुनर्रचना आवश्यक आहे. सामाजिक न्यायाचा मुद्दा बाजूला ठेवला तरी साधन-सामुग्रीचा शास्त्रीय वापर होण्यासाठी, असंतोष फार उफाळू नये म्हणून काही उपाययोजना केल्या जातात. मात्र त्याद्वारे खालपासून वरपर्यंत एक भ्रष्टाचाराची साखळी निर्माण झाली आहे. रोजगार हमी योजना, दारिद्र्य निर्मूलनासंबंधीचे कार्यक्रम, निराधार योजना, अल्पभूधारक भूमिहीन दलित यांच्या मदतीचे विविध कार्यक्रम या सर्वांतून ग्रामीण समाजात एक भयानक स्वरूपाची हितसंबंधियांची प्रभावळ उभी राहिली आहे. वांडगूळ पोषणाच्या या सर्व खटपटी आहेत. वरच्या थरातील चैन, चोचले, बनवाबनवी, कामचोरपणा याची लागण समाजातील कष्टकरी वर्गाला होत आहे. दुष्काळी परिस्थिती दैववाद याच्या जोडीला असंतोष काबूत ठेवण्यासाठी आणि जनतेला झुलवीत ठेवण्यासाठी शासनाच्या बहुविध सवंग योजना व कार्यक्रम यांमुळे पराकोटीची वेवंद परिस्थिती उदभवली आहे. जी समाजाला घातक आहे. आजचे भागते नंतर पाहू. जे थोडे




फार प्रामाणिक कार्यकर्ते आहेत तेही यापुढे हतबल झाले असून यात फरफटत जातात. मलमपट्टी व वेळकाढूपणाचे हे उपाय समाजाला सुधारण्याऐवजी किडविणारे अभ्रष्ट व लाचार बनविणारे आहेत. यापासून बोध घेऊन क्रांती केली नाही तर सत्य शतकाची भाषा निरर्थक ठरेल.

तथापि, जमेची बाब जाणवते ती ही की, शेतकरी–शेतमजूर, आदिवासी, दलित स्त्रिया यांच्या ठायी प्रचंड लोकशाही जागृती अनुभवास येते आहे. महाराष्ट्रात ठिकठिकाणी नेटाने हे समूह जो संघर्ष करीत आहेत, तंटे उभारित आहेत त्यातून आशेला काही जागा आहे. अर्थात, हे सर्व जिकीरीने, जिद्दीने व पाय रोवून करण्याचे अवघड काम आहे. याला २० व्या नाही तर २१ व्या शतकातील संगणकातूनही उत्तरे मिळणार नाहीत !

२१. सुदैवाने अत्यंत अनुकूल बाब म्हणजे दुष्काळ निर्मूलनासाठी आवश्यक तो नैसर्गिक साधने, भांडवली व ३ कोटी टन धान्यसाठा, तंत्रज्ञान, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि मुबलक श्रमशक्ती उपलब्ध आहे. मात्र अडसर आहे तो प्रचलीत आर्थिक धोरणाचा आणि राज्यकर्त्या वर्गाच्या संकुचित स्वार्थ व हितसंबंधाचा. भांडवली विकासाची सद्दी संपल्याचा हा स्पष्ट पुरावा आहे. ही कोंडी फोडण्यासाठी जनजागृती होऊन जिरायत शेतकऱ्यांचे मजबूत संघटन होणे आवश्यक आहे. □

# स्वतःला कसे छळावे ?



लेखक : कि. मो. फडके, एम. ए., एफ. आय. आर. इ. टी. (न्यूयॉर्क), डायरेक्टर, फडके सेंटर, मुंबई

## पाच : कामाबद्दल तिरस्कार

**विश्वास** : (सुहास्य वदनाने) प्रथम हे पेढे घ्या.

**मी** : (कुतूहलमिश्रित आनंदाने) कशाबद्दल पेढे देतो आहेस ?

**विश्वास** : मी दोन दिवसांपूर्वीच एका तात्पुरत्या नोकरीवर रुजू झालो

**मी** : (कपाळाला हात लावून) गधड्या, हे काय करून बसलास ! अरे, निदान नोकरीवर प्रत्यक्ष रुजू होण्यापूर्वी माझा सल्ला का नाही घेतलास ?

**विश्वास** : (दचकून जाऊन) ... म्हणजे मी नोकरी करणे चूक आहे काय ?

**मी** : अगदी तसेच काही म्हणता येणार नाही. कारण पोट जाळण्यासाठी काहीतरी उद्योग करावा लागणे क्षम्य मानता येईल. पण माझा सल्ला न घेताच तू नोकरीवर रुजूही झालास, हे काही मला आवडलेले नाही.

**विश्वास** : ( हातातील पेढे टेबलावर ठेवून) माफ करा...पण मी तुम्हाला असे आश्वासन देतो की, मी जरी नोकरी पत्करली असली तरी त्यामुळे 'फडके सेंटर' मध्ये शिकावयास येण्याच्या बाबतीत माझ्याकडून कोणतीही कसूर होणार नाही.

**मी** : प्रश्न तो नाही. तू माझ्याकडे येत राहशीलही. पण तू बेसावधपणे नोकरीला लागलेला असल्यामुळे मी तुला जे काही शिकवीन त्यावर पाणी पडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

**विश्वास** : छे ! छे ! अहो ती नोकरी म्हणजे साधे हिशेब–ठिशेब ठेवण्याची कारकुनाची किरकोळ नोकरी आहे. त्यामुळे मी तुमच्याकडून जी संजीवनी विद्या शिकत आहे, त्यावर कसला अनिष्ट परिणाम होणार आहे ?

**मी** : हे तुझे वक्तव्य अज्ञानमूलक आहे. अरे दिवट्या, तुझे उद्दिष्ट सफल करण्याच्या कामात निष्क्रियतेसारखा मित्र नाही आणि कृतिशीलतेसारखा दुसरा शत्रू नाही, हा मूलभूत सिद्धान्त तू विसरलास की काय ?

**विश्वास** : (भीतभीत) नाही ... मी तो सिद्धान्त अजिबात विसरलेलो नाही. परंतु जगण्यासाठी काहीतरी कामधंदा करावा लागणे क्रमप्राप्त आहे, हे तुम्हीही मान्य करताच ना ?

**मी** : होय ! एक आपद्धर्म म्हणून मी तो अनाचार मान्य करतो, हे खरे आहे.

**विश्वास** : ( डोळे विस्फारून ) काय ? कामधंदा करणे म्हणजे अनाचार ? आणि आपद्धर्म म्हणून त्याला नाइलाजाने मान्यता? तुमचे सगळेच कसे तिरपागडे असते बुवा !

**मी** : (दिलखुलास हसून) असा गोंधळून जाऊ नकोस. माझ्या या मुलखावेगळ्या अभ्यासक्रमातील मख्खी तुला जर एकदा कळली, तर माझे बोलणे तिरपागडे नसून अत्यंत सुसंगत व तर्कशुद्ध आहे, याची तुला प्रचीती येईल.

**विश्वास** : ... तुमच्या अभ्यासक्रमातील मख्खी म्हणजे माणसाला उसंत न देता, येणकेन प्रकारांनी त्याला स्वतःला छळून घेण्याच्या कामात व्यग्र ठेवणे, असे म्हणता येईल का ?

**मी** : ( मानेची संमतीदर्शक हालचाल करून) तसे म्हणता येईल. आणि ही मख्खी एकदा तुझ्या मनावर बिंबली की, तू आपद्धर्म म्हणून काही कामधंदा पत्करलास, तरी तो करताना स्वतःच्या ध्येयवादाविरुद्ध वर्तन करणार नाहीस.

**विश्वास** : (गोंधळून जाऊन) पण मी हिशेब ठिशेब ठेवण्याचे काम करून माझ्या ध्येयवादाविरुद्ध वर्तन कसे काय करू शकेन?

**मी** : (सचिंत सुरात) ही साधी गोष्टही तुला समजत नाही ! म्हणूनच मी म्हणालो की तू निदान नोकरीवर रुजू होण्यापूर्वी

विवेकनिष्ठ मानसोपचारतज्ज्ञ आपल्याकडे आलेल्या व्यक्तीवर उपचार करताना ज्या शेकडो तंत्रांचा अवलंब करतो त्यापैकी एक म्हणजे विरोधाभास (Paradox). विरोधाभासाचा आश्रय घेऊन सुप्रसिद्ध लेखक श्री. डॅन ग्रीनबर्ग यांनी तर एक पुस्तकच लिहिले आहे. त्या पुस्तकाचे नाव आहे How to make yourself miserable. सामान्य वाचकाला आपल्या मानसिक आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने हे पुस्तक उपयुक्त आहे.

'स्वतःला कसे छळावे' ही लेखमाला लिहिताना लेखक श्री. फडके यांना डॅन ग्रीनबर्ग यांच्या पुस्तकाने स्फूर्ती मिळत गेली पण यातील लिखाण मात्र त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाचे आहे. या लेखमालेचे मुख्य सूत्र विरोधाभास (Paradox) हे आहे आणि मानसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन करणे हे याचे उद्दिष्ट आहे.

मागील अंकात या लेखमालेचे पहिले चार भाग दिले होते. या अंकी पाचवा व सहावा लेखांक.

---

माझा सल्ला घ्यावयास पाहिजे होतास.

**विश्वास :** ( चाचरत चाचरत ) मला काही समजेनासे झाले आहे ... पण अजूनही तुम्ही मला योग्य तो सल्ला अवश्य द्या. मी नोकरी धरल्याला दोनच दिवस झाले आहेत. आणि मला ही नोकरी सहा महिन्यांकरिताच मिळाली आहे.

**मी** (सतप्त सुरात) म्हणे दोनच दिवस झाले आहेत ! अरे, तू दोन दिवसात असे वर्तन केले असशील की माझ्याकडे येऊन जे चार धडे तू शिकला होतास त्यांचा बट्ट्याबोळ झाला असेल.

**विश्वास** छे ! छे ! तसे काहीही झालेले नाही...

**मी :** कोणाला थाप मारतोस ? तुझ्या गुरूला ? साग पाहू तू नोकरीतील पहिले दोन दिवस कसे काय घालविलेस ?

**विश्वास :** ( अडखळत अडखळत ) ... म्हणजे तसे काही विशेष झाले नाही. ही माझ्या आयुष्यातील पहिलीच नोकरी आहे. आणि माझे काम माझ्या वरिष्ठाना पसत पडले, तर कदाचित सहा महिने झाल्यानंतरही मला ते या नोकरीत कायम करून घेण्याची शक्यता आहे, हे ओळखून मी पहिल्यापासूनच माझे सर्व वर्तन चोख ठेवण्याचे ठरवून...

**मी :** ( वेडावून दाखवून ) वर्तन चोख ठेवण्याचे ठरवून स्वत च्या पायावर धोडा मारून घेतला, असेच ना ?

**विश्वास :** ( स्तभित होऊन ) नाही... म्हणजे मी तसे कोणतेच वावगे वर्तन केले नाही. दोनही दिवस सकाळी कचेरीच्या वेळेपूर्वी पधरा मिनिटे मी कचेरीत हजर राहिलो आणि मला माझ्या वरिष्ठानी जे काही काम सागितले ते नीट समजावून घेऊन प्रामाणिकपणे ते काम करण्याचा प्रयत्न केला.

**मी :** वारे शहाण्या ! म्हणजे गेले दोन दिवस तू स्वत.ला छळण्याचे काम बंदच ठेवले होतेस, असे दिसते आणि तरी तू माझ्यासमोर तोड वर करून म्हणतोस की, तू वावगे असे कोणतेच वर्तन केले नाहीस ?

**विश्वास :** (रडवेला होऊन) पण नोकरी करावयाची म्हटली, की किमान या गोष्टी तरी मी करावयास नको का ?

**मी :** ( आवाज चढवून ) किमान या गोष्टी तरी तू करावयास नको होत्यास ! आणि नोकरीवर रुजू होण्यापूर्वीच तू माझा सल्ला घेतला असतास, तर मी तुला पहिल्या दिवसापासून तुझे वर्तन तुझ्या जीवितध्येयाशी सुसंगत कसे ठेवावे, हे खुलासेवार शिकविले असते.

**विश्वास :** ......म्हणजे मी नोकरीच्या पहिल्या दिवशी नेमके काय करावयास हवे होते, असे तुम्ही मला सांगितले असतेत ?

**मी :** नोकरीच्या पहिल्याच दिवशी निदान एक तास तरी उशिरा जावे, असे मी माझ्या सर्व शिष्याना बजावून ठेवीन असतो पण तू मुळी मला सधीच दिली नाहीस. सरळ आपला नोकरीवर रुजू झालास !

**विश्वास :** (भयभीत होऊन) नोकरीच्या पहिल्याच दिवशी एक तास उशिरा जावे ? म्हणजे पहिल्यास दिवशी आपले वरिष्ठ अधिकारी आपली अगदी बिनपाण्याने करतील की !

**मी .** (निग्रही सुरात) अचूक ओळखलेस ! पण त्यामुळे तुला स्वतःला छळणे सोपे जाईल की कठीण ?

**विश्वास :** अर्थातच सोपे जाईल ! कारण मग मी स्वत.ला शिव्याशाप देऊन अगदी अस्वस्थ होऊन जाईन

**मी :** मग असे करणे तुझ्या जीवितध्येयाशी सुसगत आहे की नाही ?

**विश्वास :** ( गोंधळून जाऊन ) सुसगत आहे... पण त्यामुळे ..

**मी :** (मख्ख चेहऱ्याने) त्यामुळे तुला पहिल्या दिवसापासूनच तुझ्या वरिष्ठाना चागले वळण लावता येईल.

**विश्वास :** ( आश्चर्यचकित मुद्रेने ) मी

माझ्या वरिष्ठांना वळण लावावे ?

**मी** . नाही तर ते काम कोण करणार ? तू पहिल्या दिवसापासून मुळी अशाच बेफिकीरपणे वर्तन करावयास हवेस की, तुझ्याकडून वक्तशीरपणाची अथवा कार्यक्षमतेची अपेक्षा करणे व्यर्थ आहे, हे तुझ्या वरिष्ठांना कळावयास काही फार दिवस लागणार नाहीत.

**विश्वास :** पण त्यानी मला तंबी दिली तर ? तर मी काय नोकरी गेली तरी बेहत्तर, पण उशिरा येणे सोडणार नाही, अशी प्रतिज्ञा करावी ?

**मी** (हसत हसत) छे ! छे ! गोष्टी कधी इतक्या थराला जाऊन देऊ नयेत वरिष्ठानी तंबी दिली, की तू त्याच्या दासाचा दास असल्यासारखे, नखशिखात लाचारीने माफी मागून मोकळे झाले पाहिजेस.

**विश्वास** . (अस्वस्थ होऊन) पण त्यामुळे माझा स्वाभिमान दुखावला जाईल, त्याचे काय ?... मला तरी निदान तसे करणे अशक्य आहे

**मी** · (धीरोदात्त सुरात) अशक्य ते शक्य करून दाखविण्यासाठीच तर मी हा सेटर चालवीत आहे. अरे, लाचारीने क्षमायाचना केल्यामुळे तुझा किती मोठा फायदा होईल हे जर तू सतत डोळ्यासमोर ठेवलेस, तर तुला क्षमा मागण्यात काहीच अशक्य वाटणार नाही.

**विश्वास** . क्षमायाचना करण्यामुळे असे कोणते मोठे फायदे माझ्या वाट्याला येतील?

**मी** . एक म्हणजे गोष्टी फार ताणल्या जाणार नाहीत व तुझी नोकरी शाबूत राहील. शिवाय, तू अगदी सकाळीच लाचार होऊन क्षमा मागितलीस की तुझ्या स्वाभिमानाला एक जबरदस्त तडा जाईल. त्यामुळे नतर दिवसभर कचेरीत काय करावे, असा प्रश्नच उदभणार नाही.

**विश्वास :** म्हणजे ? नतर मी दिवसभर कचेरीत काय करावे असे तुमचे म्हणणे आहे?

**मी :** (छद्मी हास्य करून) एवढी साधी गोष्ट तुला अजून समजत नाही ? अरे वेड्या, सकाळीच तुझ्या अहकाराला इतकी मोठी जखम झाली की, उरलेला दिवस ती जखम कुरवाळीत बसून, ती सुजवून, तिच्यात आत्मवंचनेचा खमंग मसाला भरून, तुला स्वत.ला दिवसभर छळत, पीडत बसता येणार नाही काय ?

**विश्वास :** छान ! आणि मग माझे काम कोण करणार ?

**मी :** (निगरगट्ट मुद्रेने) ते काम तूच करणार ! पण तू जेव्हा तुझ्या अहकाराच्या चिघळलेल्या दुखण्यामुळे बेजार झालेला असशील, तेव्हा तुझे वरिष्ठ तुला जे काही काम सागतील ते काम ..

**विश्वास :** ते काम मला नीट समजणारसुद्धा नाही !

**मी :** बरोबर ! आणि जे काम तुला मुळी समजलेच नसेल, ते तू करू लागल्यावर...

**विश्वास :** त्या कामात माझ्या हातून असख्य चुका होणे अपरिहार्य होऊन बसेल !

**मी** आणि त्यामुळे तुझे वरिष्ठ अधिकारी सध्याकाळी तुला .

**विश्वास :** अर्थात धारेवर धरतील.

**मी :** म्हणजे सोन्याहूनही पिवळे ! कारण सध्याकाळी कचेरीतून घरी जाताना तू वरिष्ठाना व स्वत ला शिव्याशाप देऊन स्वत चा जीव बेजार करून टाकशील.

**विश्वास :** (साशक सुरात) तुम्ही म्हणता ते खरे आहे...पण माझ्या कचेरीतील काम इतके सोपे आहे, की त्यात चुका होणे कठीण आहे

**मी :** (गंभीर चेहऱ्याने) मग तर तुला खूपच सावधगिरी बाळगली पाहिजे !

**विश्वास :** (नि श्वास टाकून) साध्या बेरजा–वजाबाक्या करताना कसली सावधगिरी बाळगायची कपाळ !

**मी :** (कीव करण्याच्या आविर्भावाने) तुला दूरदृष्टीच नाही रे !

**विश्वास :** याचा दूरदृष्टीशी काय सबंध ?

**मी :** (खुर्चीत एकदम ताठ बसून) आता मी काय सागतो ते काळजीपूर्वक समजावून घेण्याचा प्रयत्न कर कोणत्याही कचेरीत वरिष्ठ अधिकारी प्रथम नेमकी हीच खेळी खेळत असतात. म्हणजे ते तुझ्यासारख्या नवशिक्या, उत्साही तरुणाला प्रथम अगदी सोपे काम देतात. नवशिक्या उमेदवाराला ते सोपे काम उत्तम प्रकारे करता येऊ लागले, की वरिष्ठ अधिकारी त्याची प्रशंसा करतात व मग त्याला थोडे अधिक व जबाबदारीचे, अवघड काम करावयास सागतात.

**विश्वास :** कालच मला माझे वरिष्ठ अधिकारी म्हणत होते की, एक आठवड्यानतर ते मला अधिक जबाबदारीचे काम देणार आहेत.

**मी :** पाहिलेस ना ? सर्व कचेऱ्यामधील वरिष्ठ अधिकारी हा दुष्ट डाव कसे मोठ्या मोहक व प्रेमळ भाषेत खेळतात ! पण तो डाव आहे, हे तुझ्यासारख्या अडाणी तरुणाना मुळी समजतच नाही

**विश्वास :** ( भाबडा चेहरा करून ) त्यात कसला डाव ?

**मी** · (कीव करण्याच्या सुरात) अरेरे ! तू केवळ दोन दिवसातच तुझ्या वरिष्ठाच्या डावाला बळी पडला आहेस !

**विश्वास :** (घाबरून जाऊन) मी . मी बळी पडलो आहे ?

**मी :** नाही तर काय ? तुला केवळ एक आठवड्यानतर थोडे जबाबदारीचे काम करावयास मिळणार आहे, हे तू मला मोठ्या फुशारकीने सागत आहेस !

**विश्वास :** (कावराबावरा होऊन) ... जबाबदारीचे काम करण्यात काही वाईट आहे काय ?

**मी :** (सतापून जाऊन) माझ्या अभ्यासक्रमातील पाचवा धडा चालू असताना तू मला हा बाळबोध प्रश्न विचारतोस ? एक आठवड्यानतर थोडे जबाबदारीचे काम, काही दिवसानी आणखी थोडे जबाबदारीचे काम, त्यानतर आणखी काही दिवसानी आणखी थोडे जबाबदारीचे काम, अशा रीतीने तुझी कशी दुर्दशा होईल याचा तू काही विचार केला आहेस ?

**विश्वास :** खरोखर मी असा काही विचारच केलेला नाही

**मी :** (दटावणीच्या सुरात) अशा रीतीने न जाणो तुला तुझ्या कामात चक्क रुची वाटू लागेल, तू नवी नवी कौशल्ये संपादन करू लागशील; अंगावर जबाबदारीची कामे घेऊन ती पूर्ण करून दाखविण्याच्या आत्मघातकी सवयीमुळे तुझ्या मनात नको त्या इच्छा, आकाक्षाच नव्हे, तर अगदी ईर्षा उत्पन्न होतील नरकाचा रस्ता म्हणतात, तो हाच !

**विश्वास :** (शरण आल्याच्या आविर्भावाने) मी कबूल करतो की मी इतका सखोल व दूरगामी विचार गेल्या दोन दिव-

सात कधीच केला नव्हता.

**मी** · (समजावण्याच्या आविर्भावाने) एकदम तसा विचार तू कसा काय करणार? याविषयी तुला मुळी कोणी योग्य प्रकारे मार्गदर्शनच केलेले नव्हते. म्हणून तर मला राहून राहून वाटते आहे की, तू नोकरीवर रुजू होण्यापूर्वी माझ्याकडे यावयास हवे होतेस.

**विश्वास** : (खजील होऊन) ब्रह्मघोटाळा झाला आहे खरा ! पण आता येथून पुढे तरी मी कोणत्या प्रकारे वागावे म्हणजे माझ्या मनात मोठ्या जबाबदारीचे काम करण्याबद्दल आवड निर्माण होणार नाही, ते मला सांगून ठेवाल तर मी सावध राहीन.

**मी** (गुपित सांगितल्याच्या आविर्भावाने) तुझ्या मनात एखाद्या जबाबदारीच्या कामाबद्दल आवड उत्पन्न होता कामा नये, हे तर श्रेयस्कर आहेच, पण त्याहूनही श्रेयस्कर म्हणजे तुला कोणत्याही कामाबद्दल तिटकारा वाटू लागला पाहिजे !

**विश्वास** . (डोळ्यात वेगळीच चमक दाखवून) ही किमया मला साधली, तर मी स्वतःला नानाप्रकारे छळून घेऊ शकेन, हे मला सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट दिसत आहे.

**मी** : समजा तुला ही किमया साधली, तर त्यामुळे तुझे कोणते फायदे होतील ?

**विश्वास** . पहिली गोष्ट म्हणजे कोणत्याही कामाबद्दल मला तिरस्कार वाटू लागला की, ते काम करण्यात माझे लक्षच लागणार नाही आणि त्यामुळे ते काम करण्यातील माझे कौशल्य वाढून, त्या कामात मी तरबेज वगैरे होण्याचे संकट निर्माण होणार नाही.

**मी** : (उत्तेजित होऊन) शाबास ! तुझे आणखी कोणते फायदे होतील ?

**विश्वास** · (उत्साहित होऊन) ज्या कामाबद्दल मला तिरस्कार वाटेल, त्या कामात मी चांगल्या रीतीने व सातत्याने यशस्वी होणे जवळजवळ अशक्यच होईल. साहजिकच मला कधी यशाचा कैफ वगैरे चढणार नाही आणि यशप्राप्तीमुळे माझ्या मनात नव्या नव्या महत्त्वाकांक्षा अंकुरण्याचा प्रश्नच निकालात निघेल !

**मी** : (समाधान होऊन) तुझी बहकलेली विचारसरणी परत सुरळीत मार्गावर आली आहे, असे म्हणावयास हरकत नाही. पण या सर्व फायद्यामुळे तू तुझ्या जीवनाचे अंतिम ध्येय गाठण्यासाठी कशी झपाट्याने वाटचाल करू लागशील, ते फक्त आता तुला समजले पाहिजे.

**विश्वास** · (सचिंत मुद्रेने) तेच काम जरा अवघड दिसते आहे.

**मी** · (हसत हसत) ते काम तुला अवघड वाटते आहे.. कारण तुला मुळी दूरदृष्टीच नाही.

**विश्वास** · (हताश होऊन) येथेही दूरदृष्टीच्या अभावानेच मला गारद केले आहे तर !

**मी** : नाही तर काय ? हे बघ, तू कोणतीही जबाबदारी अंगावर घेतली नाहीस, कोणत्याही कामात रस घेतला नाहीस, कोणत्याही कामात फारसे यश मिळविले नाहीस व कधी कोणत्याही महत्त्वाकांक्षेच्या आहारी गेला नाहीस तर काय होईल ?

**विश्वास** तर...मग जरी मला एखादी कायमची नोकरी मिळाली, तरी मी त्या नोकरीत कधी बढती वगैरे मिळवू शकणार नाही. केवळ दीर्घकाळ सेवेत राहण्यामुळे मला जी काही बढती मिळेल, तेवढीच कटकट मला सोसावी लागेल.

**मी** आणि तुझ्या बरोबरीच्या सहकाऱ्यांची काय स्थिती होईल ? कारण ते काही माझ्याकडे हा अभ्यासक्रम शिकायला येत नाहीत

**विश्वास** (थोडा विचार करून) त्यांच्यापैकी अनेकांना वरिष्ठांची शाबासकी मिळेल, कधी विशेष बढती मिळेल तर कधी विशेष पगारवाढ मिळेल...किंवा आणखीही काही गोष्टी त्यांना मिळत राहतील.

**मी** . (शांतपणे) उत्तम !

**विश्वास** : (रागीट आवाजात) काय उत्तम ? माझ्या इतर सहकाऱ्यांचा उत्कर्ष ?

**मी** . अर्थात ! त्यामुळे तर तू त्यांचा हेवा व मत्सर करून, त्यांच्याविरुद्ध तुझ्या मनात अस्वस्थ भावनांचे वादळे उठवून देऊन स्वतःला दिवसभर (व कधी कधी रात्रभरसुद्धा) छळून घेऊ शकशील

**विश्वास** : अस्सं ! म्हणजे त्यांचा उत्कर्ष माझ्या पथ्यावर पडेल तर !

**मी** · नाही तर तू दिवसभर कचेरीत काय करणार ?

**विश्वास** : मला तुमचा हा अफलातून सल्ला खरोखरच दोन दिवसापूर्वी मिळावयास हवा होता. हरकत नाही. झाले ते झाले ! पण आता मला फक्त एकच प्रश्न विचारावयाचा आहे.

**मी** : (प्रोत्साहन देण्याच्या आविर्भावाने) विचारून टाक ! काही मनात ठेऊ नकोस. तू उद्या कामावर जाशील तेव्हा अगदी स्वच्छ मनाने व ठाम उद्दिष्टाने जा.

**विश्वास** कोणत्याही कामाबद्दल स्वत च्या मनात तिरस्कार कसा उत्पन्न करावा ?

**मी** : (निगरगट्टपणे) कोणतेही काम हे आपल्या स्वस्थ बसण्याच्या जन्मसिद्ध हक्कावर आक्रमण आहे, हा दृष्टिकोन मनात सदैव बाळगलास, की काम फत्ते होईल.

**विश्वास** : (खूष होऊन) नमस्ते ! उद्यापासून माझे नोकरीवरील जीवन आमूलाग्र बदलून दाखवीन तरच नावाचा विश्वास !

## सहा : नवे तंत्र — विमनस्कता

**विश्वास** : मला वाटते, आपण नव्या धड्याला सुरवात करण्यापूर्वी, मी तुम्हाला गेल्या आठवड्यातील माझ्या प्रगतीचा वृत्तांत द्यावा, हे बरे

**मी** : छान ! तुझ्या प्रगतीचा आढावा घेतला की आपल्याला पुढच्या धड्याचा अभ्यास अधिक डोळसपणे करता येईल. तेव्हा सांग पाहू तू गेल्या आठवड्यात स्वतःला छळून घेण्याच्या बाबतीत कितपत यशस्वी झालास.

**विश्वास** : गेल्या आठवड्यात मी माझे लक्ष मुख्यत· माझ्या कचेरीतील वर्तनावर केंद्रित केले आणि माणसाने कोणतेही काम हे आपल्या स्वस्थ बसण्याच्या जन्मसिद्ध हक्कावर आक्रमण आहे असे पक्के ध्यानात ठेवावे, या तुमच्या अमोघ मंत्रामुळे मी अनेक विकट प्रसंगातून सुखरूप बचावलो.

**मी** : (कुतूहल वाटून) म्हणजे नक्की काय झाले ?

**विश्वास** : म्हणजे एक नाही अनेक गोष्टी घडल्या ! अगदी थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे मी कामावर एकही दिवस वेळेवर गेलो नाही, कोणत्याही कामात रस घेतला



नाही. बहुतेक कामे करण्याचे टाळले आणि अगदी साधी कामेही अशा चातुर्याने बिघडवून ठेवली की, माझ्या वरिष्ठांनी माझी चांगली खरडपट्टी काढावी...

**मी :** ( उत्तेजित होऊन ) आणि त्यांनी तुझी कानउघाडणी केल्यावर तू मनातल्या मनात स्वतःला व त्यांना शिव्याशाप देऊन, संतप्त होऊन किंवा स्वतःची कीव करीत बसून स्वतःला भरपूर छळून घेतलेस ना ?

**विश्वास** : ( हताश सुरात ) नाही... तेथेच तर माझे दुर्दैव आडवे आले !

**मी :** ( सचिंत होऊन ) म्हणजे काय झाले ?

**विश्वास** : ( खेदपूर्ण सुरात ) म्हणजे त्याचे असे आहे की माझे वरिष्ठ अधिकारी हे इतके सौजन्यशील व प्रेमळ गृहस्थ आहेत, की त्यांनी माझ्या सर्व अपराधांकडे काना-डोळा केला. मला काही गोष्टी नीट समजावून दिल्या व काही कामे परत करण्यास सांगितले. परंतु त्यांनी ना त्यांचा आवाज चढविला, ना माझी खरडपट्टी काढली !

**मी** : ( संशयी मुद्रेने ) परंतु तू त्यांच्याकडेही मारक्या म्हशीच्या नजरेने पाहण्यास विसरला नाहीस ना?

**विश्वास :** ( दुःखीकष्टी होऊन ) अजिबात नाही. पण ते फारच गरीब व साधे गृहस्थ आहेत. त्यामुळे माझ्या मारक्या म्हशीसारख्या नजरेचा त्यांच्यावर काही परिणाम झाला नाही आणि त्यामुळे माझा स्वतःला छळण्याचा मार्गच बंद झाला.

**मी** : ( चिंतातुर होऊन ) मग तू काय केलेस ?

**विश्वास** : ( खजिल होऊन ) मी काय करणार ? मी कामाबद्दल बेफिकीर होतो आणि माझे पापभिरू वृत्तीचे वरिष्ठ अधिकारी माझी हजेरी घेत नव्हते. त्यामुळे मला भरपूर वेळ मिळाला आणि तो इतका दीर्घ वेळ काही मी स्वतःला छळून घेण्याच्या कामासाठी उपयोगात आणू शकलो नाही, हे मी खेदाने कबूल करतो.

**मी** : ( खूष होऊन ) झाले ते जरी थोडे अनपेक्षित होते, तरी ते चांगलेच झाले !

**विश्वास** : (गोंधळून जाऊन) भरपूर वेळ असूनही मी स्वतःला छळून घेऊ शकलो नाही, हे चांगले झाले असे कसे म्हणता येईल ? मला वाटते झाल्या प्रकारामुळे माझ्या ध्येयपूर्तीत मोठी अडचण निर्माण झाली आहे.

**मी** : ( हसत हसत ) ती अडचण म्हणजे एक इष्टापत्तीच आहे ! कारण त्यामुळे तुला आजचा धडा अधिक परिणामकारकपणे समजावून घेता येईल.

**विश्वास** : ( उत्सुकतापूर्ण सुरात ) म्हणजे ? आजचा विषय आहे तरी काय ?

**मी** : ( गंभीर सुरात ) तुझ्या वरिष्ठांसारख्या कितीही नतद्रष्ट माणसांनी तुझ्या मार्गात असे लक्षावधी काटे पसरले किंवा बाह्य परिस्थिती तुझ्या ध्येयसिद्धीच्या दृष्टीने कितीही प्रतिकूल असली, तरी स्वतःला कसे छळून काढावे हे आज मी तुला शिकविणार आहे.

**विश्वास** :( प्रफुल्लित होऊन ) काय म्हणता ? माझ्या वरिष्ठांसारख्या दुष्टात्म्यांनी किंवा बाह्य परिस्थितीने मला धोका दिल्यामुळे मला भरपूर वेळ मिळाला, तरी स्वतःला दुःखीकष्टी करून घेऊन स्वतःला छळू शकेन ?

**मी :** अवश्य ! अरे अज्ञ बालका, माणूस एकदा दुःख निर्माण करण्याची कला शिकला, की तो स्वर्गातील नंदनवनातसुद्धा भूतलावरील स्मशानात बसल्यासारखा बसू शकेल.

**विश्वास** : ( निराश होऊन ) मग तुम्ही मला ही कला प्रथमच का नाही शिकवलीत?

**मी** : ( शांत सुरात ) तसे करून कसे चालेल ? या अभ्यासक्रमातील प्रत्येक धडा एका विशिष्ट क्रमानेच शिकवावा लागतो. उदाहरणार्थ, तुला भरपूर वेळ मोकळा मिळाला तर स्वतःच्या मनात बावनकशी चिंतांची वादळे निर्माण करून स्वतःला कसे अस्वस्थ करून सोडावे, हे मी तुला तिसऱ्या धड्यात शिकविले होते ना ?

**विश्वास** : (अपराधी चेहऱ्याने) होय. आणि गेल्या आठवड्यात मी कचेरीत जेव्हा अनेक तास माझ्या जन्मसिद्ध हक्कानुसार स्वस्थ बसून होतो, तेव्हा मी माझ्या मनात असंख्य बावनकशी चिंतांचे वादळ उठवून देण्याचा प्रयत्न करूनही पाहिला...

**मी :** पण तुझा तो प्रयत्न कितपत यशस्वी झाला ?

**विश्वास :** ( चाचरत चाचरत ) काही तास मी स्वतःला चिंतांच्या वादळात ढकलून दिले होते... पण तरीही बराच वेळ शिल्लक राहिला...

**मी :** (हसत हसत) म्हणूनच आजचा धडा तुला पूर्वी शिकवून फायदा नव्हता. स्वतःच्या मनात बावनकशी चिंता उत्पन्न करण्यामुळे जेव्हा माझ्या शिष्याचे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य होत नाही, तेव्हा पुढील धडा शिकण्यासाठी त्याची मनःस्थिती परिपक्व झाली आहे, असे मी समजतो.

**विश्वास :** ( उत्कंठित सुरात ) म्हणजे स्वतःच्या मनात चिंतेचे काहूर माजविण्याचे आणखी काही मार्ग आज तुम्ही मला शिकविणार आहात काय ?

**मी :** छे ! छे ! आजच्या धड्यात मी तुला स्वतःच्या मनात आणखी एक छळवादी भावना निर्माण करण्याचे तंत्र शिकविणार आहे. ती भावना म्हणजे विमनस्कता किंवा विषण्णता !

**विश्वास :** (उमज पडल्यासारखा चेहरा करून) म्हणजे स्वर्गातील नंदनवनात असूनही भूतलावरील स्मशानात असल्यासारखे कसे बसावे, याची पूर्वतयारी ना ?

**मी :** अचूक हेरलेस! कोणत्याही ठिकाणी कितीही वेळ जर तुला तुझ्या मनात विषण्णता निर्माण करावयाची असेल, तर त्यासाठी तू फक्त एक दृष्टिकोन नीट समजावून घेऊन तो तुझ्या मनोभूमीत पेरून, कष्टाने जोपासला पाहिजेस.

**विश्वास :** आता तुम्ही सांगाल तो दृष्टिकोन स्वीकारण्यास मी सज्ज आहे.

**मी :** ( निग्रही सुरात ) तो दृष्टिकोन म्हणजे अखेर सर्व रस्ते म्हणजे मसणवाटाच असतात, ही मर्मभेदी अंतदृष्टी !

**विश्वास :** ( अवाक होऊन ) म्हणजे तुम्हाला नक्की काय म्हणावयाचे आहे ?

**मी :** ( हुकूम दिल्याच्या आविर्भावाने ) याचा अर्थ असा की, झालेली अथवा होणारी कोणतीही गोष्ट क्लेशदायक कशी आहे हे जर तुझ्या चटकन् लक्षात येऊ लागले तर तुला कोणत्याही परिस्थितीत स्वतःला कितीही वेळ विमनस्क करून घेता येईल.

**विश्वास :** (साशंक मुद्रेने) परंतु प्रत्येक वेळी हे कसे काय करावे ?

**मी :** (छद्मी हास्य करून) त्यात काय अवघड आहे ? मला सांग, तुझे आई-वडील जिवंत आहेत काय ?

**विश्वास :** (कावराबावरा होऊन) जिवंत आहेत... पण...पण तुम्ही 'एकदम हा प्रश्न का विचारीत आहात ?

**मी :** ( दटावणीच्या आवाजात ) असा बोबडी वळल्यासारखा काय करतोस ? मी विचारतो त्या प्रश्नाची स्पष्ट उत्तरे दे. आणि लक्षात ठेव, मला वायफळ बडबड खपत नाही.

**विश्वास :** (कोरड्या ओठावरून जीभ फिरवून) ठीक आहे. विचारा प्रश्न.

**मी :** (सशयी चेहऱ्याने) तुझे आई-वडील जिवंत आहेत, ही गोष्ट तुला क्लेशदायक वाटते की नाही ?

**विश्वास :** ( हातरुमालाने कपाळावरचा घाम पुसून) माझे आई-वडील जिवंत आहेत, ही गोष्ट मला क्लेशदायक आहे असे कसे म्हणता येईल ?

**मी :** (भेदक नजरेने) खोटारड्या! तुझे व तुझ्या आई-वडिलांचे कधी खटके उडत नाहीत ?

**विश्वास :** ( भयभीत होऊन )...म्हणजे कधीकधी तसे होते ..

**मी :** मग ते खटके क्लेशदायक नसतात तर काय आनंददायक असतात ?

**विश्वास :** (चाचरत चाचरत) पण... मला वाटते.

**मी :** (हुकूम सोडल्याच्या आविर्भावाने) तुला वाटते ते चुकीचे वाटते, म्हणूनच तू माझ्याकडे शिकावयास येत आहेस, हे नीट लक्षात ठेव आता मला सांग की, तुझ्या आई-वडिलांमुळे कोणकोणत्या बाबतीत तुझे जीवन नीरस, खुरटलेले व बंदिस्त झाले आहे ?

**विश्वास :** (घाबरून जाऊन) त्याचे असे आहे...

**मी :** (मख्ख चेहऱ्याने) त्याचे असे आहे की, तू भ्याड आहेस ! आई-वडिलांमुळे तुला अनेक जाच सहन करावे लागतात हे खरे असूनही, तू तसे उघडपणे माझ्यापाशी कबूल करावयास धजत नाहीस.

**विश्वास :** ( थोडासा विचार करून ) तुम्ही म्हणता ते अगदीच काही खोटे नाही. माझ्या मनात कित्येकदा असा विचार येतो की, मी जर महाविद्यालयीन शिक्षणासाठी घर सोडून दुसऱ्या शहरात जाऊन एखाद्या वसतिगृहात राहिलो असतो, तर कदाचित अधिक मोकळेपणाने व आनंदाने जीवन जगलो असतो.

**मी :** (धीर देण्याच्या आविर्भावाने)... एकदम तुला असे कसे काय वाटते ?

**विश्वास :** एकदम नाही...पण मी वसतिगृहात राहणाऱ्या माझ्या काही मित्रांचे जीवन पाहतो, तेव्हा मला वाटते की, ते नशीबवान आहेत...

**मी :** म्हणजे याचा सरळ अर्थ असा की, ते त्यांच्या आई–वडिलांच्या जाचातून मोकळे झालेले असल्यामुळे, तुझ्याहून नशीबवान आहेत.

**विश्वास :** ( अडखळत अडखळत ) ... तुमचे म्हणणे बरोबर आहे . पण...

**मी :** पणबीण काही नाही ! वस्तुस्थिती अशी आहे की, तुझे आई–वडील जिवंत असणे खरे म्हणजे तुला क्लेशदायक वाटत असते.

**विश्वास :** ...अहो पण...माझ्या त्या मित्रांचे आई–वडील जिवंतच आहेत. ते मित्र त्यांच्या आई–वडिलांपासून फक्त दूर राहतात, इतकेच !

**मी :** (कुत्सित सुरात) ...यावरून तर माझ्या विधानाला पुष्टीच मिळते.

**विश्वास :** ( साशंक मुद्रेने ) ती कशी काय ?

**मी :** तुझे ते मित्र आपापल्या आईवडिलांपासून दूर राहत असल्यामुळे त्यांच्या कटकटी तूर्त टळलेल्या आहेत, हे खरे पण त्यांचे क्लेश काही कायमचे नाहीसे झालेले नाहीत. कारण आज ना उद्या ते सर्वजण आपापले शिक्षण संपवून परत आपापल्या घरी गेले, की त्यांच्या गळ्याभोवती पारतंत्र्याचे पाश परत आवळले जातीलच.

**विश्वास :** (कमालीचा अस्वस्थ होऊन) ...अहो पण त्या वेळी माझे मित्र वयाने अधिक मोठेही झाले असतील.

**मी :** (निष्ठुर सुरात) होय ! तुझे मित्र त्या वेळी वयाने अधिक मोठे झाले असतील आणि म्हणूनच त्यांना आईवडिलांच्या हुकमतीखाली राहणे अधिकच जाचकारक वाटेल. अरे दीडशहाण्या, माणूस जसजसा वयाने मोठा होतो, तसतसे त्याला स्वातंत्र्य अधिक हवे असते की कमी हवे असते ?

**विश्वास :** ( गोंधळून जाऊन )...अर्थात मोठेपणी माणसाला जास्त स्वातंत्र्य हवेसे वाटणार.

**मी** : (छद्मीपणाने हसून) शिवाय एक गोष्ट विसरू नको. ज्या मित्रानी काही वर्षे वसतिगृहात राहिल्यामुळे स्वातत्र्याचा अनुभव घेतला असेल, त्याना परत घरी जाऊन आईवडिलांबरोबर राहणे म्हणजे शुद्ध बदिवासच वाटेल.

**विश्वास** : (भयभीत होऊन) म्हणजे मग तुमचे म्हणणे तरी काय आहे ?

**मी** : माझे म्हणणे असे आहे की, तुला ज्या दोन गोष्टी आता मनापासून पटल्या आहेत, त्यावरून माणसाचे आईवडील जिवत असणे ही अत्यत क्लेशदायक परिस्थिती असते, या माझ्या मूळ सिद्धान्ताला दुजोराच मिळतो.

**विश्वास** : (थरथरत्या ओठानी) कोणत्या दोन गोष्टी मला पटल्या आहेत ?

**मी** . पहिली गोष्ट म्हणजे तुझे तुझ्या आईवडिलाशी खटके उडत असतात व ते खटके तुला क्लेशदायक ठरत असल्यामुळे कधीकधी तू तुझ्या वसतिगृहात राहून स्वातत्र्य उपभोगणाऱ्या मित्राचा हेवा करीत असतोस.

**विश्वास** : (चाचरत चाचरत) ...हो... तुम्ही म्हणता ते खरे आहे...

**मी** : आणि दुसरी गोष्ट म्हणजे एकदा स्वातत्र्याची चटक लागलेल्या तुझ्या मित्राना आता परत आपापल्या आईवडिलाच्या बदिवासात जाऊन राहणे फारच क्लेशदायक होईल.

**विश्वास** . होय ! कारण त्याना परत बंधने सहन करणे कठीण जाईल.

**मी** : मग या दोन्ही गोष्टीवरून असे सिद्धच होते की, माणसाचे आईवडील जिवत असेपर्यंत त्याच्या दुर्दैवाचे दशावतारच काय पण सहस्रावतार सपत नसतात !

**विश्वास** : (केविलवाण्या सुरात) ...पण ...तुमचे हे सर्व बोलणे ऐकून .

**मी** : माझे हे बोलणे ऐकून या घटकेला तुझ्या मनात कोणती भावना निर्माण झाली आहे ?

**विश्वास** : (रडवेला होऊन) मला वाटते मी फारच विमनस्क किंवा विषण्ण झालो आहे

**मी** (आनंदाने टाळ्या वाजवून) म्हणजे माझे उद्दिष्ट साध्य झाले आहे.

**विश्वास** : ( आश्चर्यचकित होऊन) काय म्हणता ?

**मी** : झालेली अथवा होणारी कोणतीही गोष्ट क्लेशदायक कशी असते, हे तुला झटकन कळू लागले तर तू स्वत.ला कोणत्याही परिस्थितीत कसा चटकन विषण्ण करून घेऊ शकशील, हा आजच्या धड्याचा विषय आहे. आणि म्हणून मी तुला या येथेच विषण्णतेचा अनुभव घेण्यास शिकविले.

**विश्वास** (बावचळून जाऊन) ...परतु मी खरोखर कोणत्याही घटनेकडे यादृष्टीने पाहून स्वत ला विषण्णतेच्या खाईत ढकलून, छळून घेऊ शकेन काय ?

**मी** : ( प्रोत्साहन देण्याचा अविर्भाव करून ) अलबत ! पाहू तुला हे काम कसे काय जमते आता मला साग की, तुझे ते मित्र आपापल्या आईवडिलापासून दूर वसतिगृहात राहतात ही गोष्ट त्याना क्लेशदायक कशी ठरत असेल ?

**विश्वास** : (थोडा विचार करून) त्याना घरच्या चागल्या जेवणास मुकावे लागते. शिवाय, घरामध्ये जितके जिव्हाळ्याचे वातावरण असते, तितके जिव्हाळ्याचे वातावरण बहुधा वसतिगृहात नसेल.

**मी** : योग्य मार्गावरून जात आहेस बोल पुढे.

**विश्वास** . त्याना कधी कधी अतिशय एकाकीपणा जाणवत असेल आणि अशा वेळी जर ते घरच्या मडळीची आठवण काढून, कोणाच्या पत्राची वाट पाहत असतील व त्यांना हवे तेव्हा पत्र येत नसेल, तेव्हा ते फारच वैफल्यग्रस्त होत असतील...

**मी** · (खूष होऊन) ठीक आहे. आता तुझ्या दृष्टिकोनात फक्त थोडी सुधारणा झाली पाहिजे.

**विश्वास** : (काकुळतीच्या सुरात) आता आणखी कोणती सुधारणा ?

**मी** : झालेली किंवा होणारी कोणतीही गोष्ट क्लेशदायकच असते, एवढाच दृष्टिकोन तुझ्या मनात स्थिर होऊन भागणार नाही. यापुढे जाऊन तू तुझ्या मनात असा दृष्टिकोन दृढमूल केला पाहिजेस की, 'झालेली किंवा होणारी कोणतीही गोष्ट भविष्यकाळातही नेहमी क्लेशदायकच असणार, आणि अशा क्लेशदायक गोष्टीत कधी कोणतीही सुधारणा होणे शक्य नाही.

**विश्वास** . (गाढ शात प्राप्त झाल्याचा आविर्भाव करून) अस्स ! म्हणजे भविष्यकाळातही मला विषण्णतेच्या वादळातून बाहेर पडण्याची शक्यताच शिल्लक राहता कामा नये, असेच तुम्हाला सुचवायचे आहे ना ?

**मी** : (आनदी मुद्रेनें) मला नेमके तेच सुचवायचे आहे. आता तुला हा मुद्दा कितपत समजला आहे ते पडताळून पाहण्यासाठी मी तुझी चाचणी घेतो. तयार राहा. मी तुला एक प्रश्न विचारणार आहे. अखेर सर्व रस्ते म्हणजे मसणवाटाच असतात, हे सूत्र लक्षात ठेवलेस तर तू माझ्या प्रश्नाला योग्य उत्तर सहज देशील.

**विश्वास** . (गभीर मुद्रेने) मी तयार आहे. घ्या माझी परीक्षा.

**मी** : आज वसतिगृहात राहणाऱ्या तुझ्या मित्राबद्दल कोणते विचार तुझ्या मनात घोळवून तू स्वतःला नेहमी विषण्णतेच्या दरीत लोटून देऊ शकशील ?

**विश्वास** ( थोडा विचार करून ) 'अरेरे ! काय बिचाऱ्याचे नशीब ! लहान वयात अनिर्बंध स्वातत्र्याची चटक लागल्यामुळे त्यांना आता पुढील आयुष्यात आई–वडिलाच्या किंवा कोणत्याही घरात सुखाने राहता येणारच नाही. कारण त्या वारा प्यायलेल्या वासरांना आता कोणतेही वेसण कधी सुसह्य होणार नाही आणि त्यांना काम–धद्यानिमित्त आपापल्या आईवडिलाच्या घरापासून दूरच्या ठिकाणी राहवे लागले, तरी त्याना सुखात राहता येणे शक्यच नाही.

**मी** : का बरे ? आईवडिलाच्या पाशातून सुटून ते दूरच्या ठिकाणी राहू लागले, तर ते सुखात का नाही राहू शकणार ?

**विश्वास** : छे ! छे ! ते वेगळे राहतील, तर कदाचित आईवडिलाच्या कचाट्यातून त्याची सुटका होईल. पण काय उपयोग ? बिचारे बहकलेले तरुण ! अहो एकदा समाजात राहावयाचे म्हटले की माणसाने काही निर्बंध, शिष्टाचार, नीतिनियम, सकेत इत्यादीचे पालन करावयास नको का ? पण त्या बहकलेल्या तरुणानी आजवर उपभोगल्या स्वैर जीवनक्रमामुळे त्याची बिचाऱ्याची अशी केविलवाणी स्थिती झालेली आहे की, समाजात राहून आपल्या वर्तनाला शिस्त लावणे त्याना आता केवळ अशक्य होईल. बिचारे तरुण ! आणि ज्यात ते राहतील तो बिचारा कमनशिबी समाज !...

**मी** (खूष होऊन) सुदर ! किती तीव्र बुद्धीचा शिष्य आहेस तू ! आता फक्त शेवटची परीक्षा. मी सागतो ती एक सुप्रसिद्ध काव्यपक्ती तू पूर्ण करून दाखव.

**विश्वास** . ( उत्तेजित होऊन ) तुम्ही सागाल ती काव्यपक्ती पूर्ण करण्याचा मी जरूर प्रयत्न करीन

**मी** : ( रोखलेल्या नजरेने ) 'रात्रीच्या गर्भात उद्याचा .

**विश्वास** (विषण्ण मुद्रेने) दिसे अध पात!'

**मी** : उत्तम ! आता केव्हाही विषण्णतेच्या झंझावातात उडी मारून तुला स्वत ला छळून घेण्यात कोणतीही अडचण येणार नाही !

( अपूर्ण )

## पुस्तके

# प्राणिकथा – नवी वाट

**र**णजित देसाई यांच्या ‘ मोरपंखी सावल्या ’ या प्राणिकथा त्यांच्या नावलौकिकाला साजेसा दिमाखात वाचकांच्या भेटीला आलेल्या आहेत. प्राण्यांची दुनिया म्हटली की, व्यंकटेश माडगूळकर, भानू शिरधनकर मारूती चितमपल्ली ही नावे चटकन् आठवतात. पुनः नव्याने, त्यांच्या लेखनाइतकाच आनंद या ‘ मोरपंखी सावल्या ’ देतात. माणसाचं अस्तित्व नसलेल्या जंगलातलं चैतन्यपूर्ण, रसरशीत विश्व मोठ्या उत्कटतेने, मार्मिक रसिकतेने लेखकाने अनुभवलंय. या प्रकारच्या लेखनाला आवश्यक असलेली चाकोरीबाहेरील रसिकता, सूक्ष्म निरीक्षणशक्ती, विलक्षण कुतूहल हे सारं लेखकाजवळ पुरेपूर आहे, याचा प्रत्यय पानापानावर येतो. अनुभवलेलं सारं, शब्दांच्या शिल्पातून साकार करण्यासाठी आवश्यक तो लेखणीचा वरदहस्त रणजीत देसाईंवर आहेच मग हे लिखाण वाचकांना न आवडलं तरच नवल !

रानातल्या वसंत ऋतुच्या आगमनाचा सोहळा अनुभवणारी इवली खारटुली, माकडांना वाटणारं वाघाच कुतूहल पहिल्या दोन कथांमध्ये छान रंगवलंय्. त्याचप्रमाणे नदी, खडकाळी यांच्यावर चेतनागुणोक्तीने, कल्पनांचा, भावनांचा सुंदर साज चढवला आहे. खूप पाऊस पडल्यावर प्रमत्त यौवनेचं रूप धारण केलेली नदी काही काळाने स्वतःच्या मर्यादा जाणते. तिचा अहंकार सरतो, गुलाबी नजरेला निळा गहिरेपणा लाभतो, ती ‘ वाहिनी ’ बनते. आपण म्हणजे सागराची मर्यादा असं मानणाऱ्या खडकाळीचा, सागराच्या लाटा पार धुव्वा उडवतात आणि खूप उशिरा जाणीव होते की, खडकाळी सागराची मर्यादा केव्हाच नव्हती. सागर हाच खडकाळीची मर्यादा होता. ‘ निर्णय ’ या कथेत गरुडाचं जगणं कसं असतं याचं सुंदर चित्रण केलं आहे. या प्राणिकथांतून ‘ माणूस ’ या प्राण्याच्या हाती बरीच जीवनसत्ये येतात. एक वेगळी संपन्न दृष्टी मिळते. चराचर सृष्टीशी संवाद साधल्याचा आनंद मिळतो आणि या कथांची उंची आपोआपच जाणवते. या कथा म्हणजे नुसती निसर्गचित्रणे नव्हेत, सिद्धहस्त लेखकाच्या शैलीचा नुसता मनोरम विलास नव्हे तर रसिकमनाला शीतलता देणाऱ्या आणि अंतःचक्षूंना सत्य–शिव–सुंदराचं तेज दाखवणाऱ्या या ‘ मोरपंखी सावल्या ’ आहेत.

माणसाच्या तडाख्यातून सुटण्याची मृगाची धडपड, सावरीच तृप्त समाधान छान चितारलय्. ‘ जाग ’ ही कथा तशी ठराविक साच्यातील आहे. रानात पहाट कशी फुटते याचं वर्णन यात आलं आहे. ‘ कीड ’ ही कथा व्यंकटेश माडगूळकरांच्या ‘ लढत ’ कथेची आठवण करून देते. मोठ्या गव्याच्या हाकेतील आर्त व्याकुळता मनाला चटका लावते मात्र ‘ कीड ’ हे शीर्षक तितकसं बरोबर वाटत नाही. ‘ अंधारातून उजेडाकडे ’ मध्ये शिकाऱ्याच्या टॉर्चच्या प्रकाशगोलात कोवळं लुसलुशीत गवत खाणारा ससा आपसूक त्याच्या गोळीला कसा बळी पडतो याचं साधंसं पण परिणामकारक चित्रण आहे. ‘ सुख, ‘ नजर ’, ‘ पर्णहीन ’, ‘ सुटका ’, ‘ मृगजळ ’ याही सगळ्या सुरेख कथा आहेत. जंगलातल्या निसर्गाची विविध रूपं, तिथल्या प्राणिणीवनातल्या घडामोडी, समर्थपणे साकार करणाऱ्या या कथा वाचकांना सुखावतात.

रविमुकुल यांचं मुखपृष्ठ आणि वासंती मुझुमदार व रवींद्र मेस्त्री यांची रेखाटणे यांचा आवर्जून उल्लेख केलाच पाहिजे इतकी ती सुरेख आहेत. वाचनाच्या आनंदाचा जणू भागच झालेली ही चित्रे कथांच्या रसास्वादाची गोडी वाढवतात. या चित्रांशिवाय पुस्तक अपुरंच राहिलं असतं.

श्री. रणजित देसाईंनी चोखाळलेली ही नवी वाट त्यांना अधिकाधिक यशाकडे नेईल यात मुळीच शंका नाही.

– मेधा सिधये

मोरपंखी सावल्या
रणजित देसाई
अजब पुस्तकालय, कोल्हापूर
पृष्ठे : ९६, मूल्य : २५ रुपये

# आठवणीत राहणारं ‘ खुणेचं पान ’

**ख**रं म्हणजे ‘ खुणेचं पान ’ पूर्वी कधी उलटल्याचं स्मरत नाही. डोळ्याखालून हे शब्द अनेकदा गेलेले, सरावाचे झालेले आहेत असंही नाही. तशी ही कवयित्री नवी नाही पण नव्याने प्रकाशात आलेली आहे. कोणत्याही अर्थाने ती मान्यवर, एखाद्या क्षेत्रात यशाचे शिखर गाठलेली, मोठेपणाचे वलय असलेली व्यक्ती नाही. १९२६ सालपासून कविता करत असलो तरी त्या कवितांना पूर्वप्रसिद्धीचे भाग्य लाभलेले नाही. कवितांइतकेच कवयित्रीचे व्यक्तिमत्त्वही अव्यक्त व अपरिचित राहिलेले आहे. अक्षर ओळख असली तरी मनकर्णिकाबाई शाळेची पायरीदेखील चढलेल्या नाहीत. रांचीसारख्या अमराठी मुलुखात एका सामान्य, मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेल्या या बाईंच्या मनाला आधुनिक विचारांनी कधी स्पर्शही केलेला नाही. कोणत्याही राजकीय, सामाजिक, वाङ्मयीन चळवळीशी दूरान्वयानेदेखील त्यांचा संबंध आलेला नाही. किंबहुना अस्वस्थ करणारं, संवेदनांना जागृती आणणारं वातावरण त्यांच्याभोवती नाहीच ! भक्कम चौकटीत सुरक्षित जगत असताना मनकर्णिकाबाईंना कवितेच्या वेडानं झपाटून टाकलं आहे आणि ते वेड आजतागायत टिकून आहे.

बाह्यतः लौकिक आयुष्य ‘ शहाणपणा ’नं जगत असताना कवयित्रीच्या मनाचा गाभारा मात्र शारदेच्या साक्षात्कारानं उजळून टाकला आहे. मायास्वरूपी, मर्त्य जगाला अमरत्व प्राप्त करून देणारी, अमूर्ताला

मूर्तरूप बहाल करणारी, दिव्य, चैतन्यदायी शारदा कवयित्रीच्या भावविश्वात सर्वोच्च आसनावर विराजमान झालेली आहे ती सम्राज्ञी, माऊली, देवता–सर्व काही आहे. तिच्या दरबारात नजराणा अर्पण करण्यासाठी ज्येष्ठ–श्रेष्ठ मानकऱ्यांची जणू अहमहमिका लागली आहे. रमणीय नक्षत्रांच्या फुलांनी सालंकृत पूजा बांधताना तिचे एकनिष्ठ भक्त कीर्तनात दंग झाले आहेत. अशी 'धुंदीची मधुर धून' आळवण्याचे भाग्य कवयित्रीला निरंतर लाभलेले नाही तिची जागा शारदेच्या प्रसादात नसून पायरीवर आहे. झोपडीची तिला सवय आहे. या स्थानाबद्दल तिची तक्रार नाही कारण अंगाखांद्यावर कितीही अपूर्व लेणी आधीच मिरवत असली तरी आपली चार–दोन ताजी, टवटवीत फुले शारदा कौतुकाने माळेल अशी तिला खात्री आहे.' परि क्षणभरी...

धन्य व्हावा माझा परिसर ('शारदेस मागणी' पृ. ३३) एवढीच तिची माफक अपेक्षा आहे. साचलेल्या भावनांचा भार शारदेच्या चरणी अर्पून तिच मन आता मोकळं, हलकफुलक झालं आहे. स्वतःच्या कवित्वशक्तीची ओळख व तिची जपणूक करण्याची आवश्यकता मनकर्णिकाबाईंना आतून पटलेली आहे इतकेच नव्हे तर त्याचे मोल त्यांनी पुरते जाणलेले आहे.

म्हणूनच जीवन व्यवहारांचा व लौकिक जगाचा विसर पाडणारा, अनमोल दौलतीचा खजिना खुला करणारा निसर्ग त्यांचा जिवाभावाचा सखा झालेला आहे. त्याच्या निर्मल संगतीचं सुख अनुभवताना सर्व 'इच्छा, आशा, तृष्णा' शांत होतात. धरित्रीला तृप्त करणाऱ्या पावसाची अनंत रूप कवयित्रींनं शब्दबद्ध केलेली दिसतात. कधी नीलश्यामल मेघांनी ओथंबून आलेलं आकाश तिला अपार ओढ लावतं ('जलधारा' पृ. ४२) कधी 'मदावलेल्या सरी' ची ठाय लय तिच्या मनात बराच काळ रेंगाळत रहाते ('निनाद' पृ. ४५) तर कधी आसमंत घुमवणाऱ्या पावसाचा द्रुत लयीतील गर्जना करणारा नाद तिला बेभान करून टाकतो. ('संगीत पावसाचे' पृ. ४४) या जलपूजक वृत्तीमुळेच कवयित्री कन्याकुमारीच्या युगानुयुगे चाललेल्या साधनेसमोर नतमस्तक झालेली आहे. 'निवले डोळे, भरली तृप्ती काठोकाठ मनी' ('कन्याकुमारीची तपस्या' पृ. ६५) अशी तिच्या मनाची अवस्था झाली आहे. आणखी एका भावनेमुळे कवयित्रीला निसर्ग हवाहवासा वाटतो.

'स्थिरावले मन, शांततेत क्षण
अंतर्मुख झाले.
अमूर्त दर्शन महेश्वराचे मनोमनी
घडले.'
('निर्भयतेचे संजीवन' पृ. १४)

अशी अनुभूती निसर्गाच्या सान्निध्यात तिला येते. अवीट आनंद देणारी सतांची अमृतवाणी तिला सृष्टीतील प्रत्येक चैतन्यदायी आविष्कारातून ऐकता येते. अज्ञाताचे गूढ उकलताना श्रद्धेची सोबत आहे. या अढळ, अविचल श्रद्धेचा प्रत्यय कवयित्रीच्या प्रेमकवितामधून येतो. (या संग्रहात प्रेमकविता कमी आहेत. प्रियकर–प्रेयसीची जवळिक, या प्रेमातील ताठा, भावनांची आंदोलने येथे अजिबात लक्षणीय ठरत नाहीत.)' अमर्याद विश्वातल्या...

'सांभाळी रे माझा तोल
विसावले तुझ्यावरी
किती उठोत वादळे
वाहू देत झंझावात
तरी राहीन निर्भय
तुझ्या सुख–संगतीत'
('भ्रमले हे चित्र माझे' पृ. ३५)

प्रियकराच्या खांद्यावर मान टाकून ती निश्चित झाली आहे. ती एकनिष्ठ, जन्मभर साथ जपणारी प्रणयिनी आहे. प्रेमाची रीत वेडीखुळी, अबोल असली तरी त्याच्या निर्व्याज, शांत, गंभीर लोचनांकडे पहाताना ती हरवली आहे. त्या प्रशांत वदनाच्या दर्शनाने ती भारावून गेली आहे. या प्रेमाला वासनेचा लसलसता स्पर्शही झालेला नाही. ते 'उदात्त'. (?) आहे. या दृढ धारणेमुळेच कदाचित झोकून देणे किंवा स्वतःला मुक्तपणे उधळून टाकणे जमत नाही तो तिचा पिंड नाही. कवयित्रीच्या समर्पणशील प्रेमाची प्रचिती बऱ्याच कौटुंबिक स्वरूपाच्या कवितामधूनही (अशा कविता या संग्रहात बऱ्याच आहेत.) येते.

प्रापंचिक म्हणता येतील अशा स्वरूपाच्या भावनांचे आविष्कार एका नात्यातून विशेषत्वाने जाणवतात. फुलपाखरासारखा कोमल, चंचल, रोज नित्यनवीन खोड्या करणार, आईची दमछाक करणारा, तिची तारांबळ उडवणारा, बोबड्या बोलांनी व गोजिऱ्या रूपानं ओढ लावणारा सुकुमार बालसम्राट म्हणजे 'प्रेमनगरचा स्वामी' आहे. नीटनेटके घर विसकटून टाकणाऱ्या या चिमण्या बाळावर कवयित्री वात्सल्याचा वर्षाव करते त्याच्या बाळलीला तिने हृदयाच्या तिजोरीत जपून, साठवून ठेवल्या आहेत. त्याच्यासाठी अंगाईगीत गाताना तिचा ऊर भरून येतो. त्याच्या काळ्या कुरळ्या जावळातून हात फिरवताना तिला आनंदनिधान सापडते. पण स्त्रीत्वाचे सार्थक केवळ समर्पणशील प्रेमातून, वात्सल्ययुक्त संगोपनातून होते का ? प्रियकराचा वा पतीचा हात जन्मभर घट्ट धरून ठेवला, कुटुंबासाठी स्वेच्छेने झीज सोसली, मुलाबाळांचे कोडकौतुक व्यवस्थित केले, त्याच्यावर योग्य ते संस्कार केले एकूण दिलेली भूमिका समरसतेने वठवली म्हणजे स्त्रीच्या जीवनाची इतिकर्तव्यता झाली असे मानावयाचे का ? कवयित्रीने तसे मानलेले नाही. रंगमंचावरील स्त्रीचा प्रवेश अधिक अर्थपूर्ण व्हावा म्हणून तिने प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न इतका उल्लेखनीय, स्तुत्य व आजच्या परिस्थितीशी अनुरूप आहे की प्रस्तावनेत त्याचीच दखल आरंभी घेतलेली दिसते.

अन्यायाचे चटके वर्षानुवर्षे बिनतक्रार सोसणाऱ्या आपल्या व्यक्तित्वाचे थडगे बांधणाऱ्या, 'स्वत्व' हा शब्द फक्त स्मृतीत उरलेल्या, परप्रकाशी, परावलंबी स्त्रीच्या दडपलेल्या अस्मितेस जागे करण्याची तीव्र इच्छा कवयित्रीच्या मनात अनेकदा उफाळून आलेली आहे. स्त्री अबला नसून सौदामिनी आहे समानतेच्या फसव्या मृगजळात ती अडकणार नाही. दिवाणखान्याची शोभा होणार नाही. केवळ पतीच्या कर्तृत्वात धन्यता मानणार नाही. स्वतःच्या ध्येयपूर्तीतून ती हरपले श्रेय शोधेल असा विश्वास कवयित्रीला आहे. म्हणून

'तू होऊ नकोस कुणाचे
खेळणे, बाळ गमतीचे
('उमलत्या कळीस' पृ. ५०)

असा सावधगिरीचा इशारा ती देते आणि

'आजवरी बंदिस्त असे जें
मुक्त करी व्यक्तित्व तुझे ते
(दडपलेल्या अस्मितेस पृ. २)

असे ठासून, पुनः पुन्हा तळमळीने सांगते. ( संग्रहातील सर्वात उत्कट कविता या प्रकारच्या आहेत. ) स्त्रीचे हे आत्मशोधन हळूहळू व्यापक होत जाते ते मानवी जीवनालाच प्रश्न टाकते.

कोणत्याही संवेदनाक्षम, विचारी माणसाला पडणारा सनातन प्रश्न येथेही आलेला आहे. ' जीवनाचे ध्येय काय अंती ?' (कशासाठी हाव ?' पृ. ३८) उलटसुलट विचारांचे काहूर कवयित्रीच्या मनात वारंवार उसळते. जगासंबंधी व जीवनासंबंधी प्रश्न उत्पन्न होतात तसे स्वतःसंबंधीचे प्रश्नही पिच्छा पुरवतात. ते तातडीचे व निरुत्तर करणारे असतात. ' मी कोण वसे देहात ?' याचा उलगडा होत नाही हे कळले की

' मन रमे न कोठे माझे औदास्य जीवनी भरले'

( ' मी कोण वसे देहात ' पृ. ५८ )

... रसहीन शिळेपाके झाले बेचव सगळे गजबजल्या जगात वाटे औदास्य भरले '

( ' अर्थशून्य पृ. ३९ )

निराशा अटळ असते. कवयित्री निराश होते पण नैराश्यातून तिला निष्क्रीयता येत नाही. आत्मसंशोधन व पर्यायाने जीवनकलह सतत चालू रहाणार आहे. ' खुणेची पाने ' वाढत जातील, अनेक होतील अशी उमेद देणारी ही कविता आहे.

जुन्या कवयित्रीचा हा ( काही ठिकाणी नवा भासणारा, संमिश्र स्वरूपाचा ) आत्माविष्कार ज्या भाषेतून प्रकट होतो ती अनेकदा संस्कृतनिष्ठ व सांकेतिक वाटते. वीचीवलये, विष्णुप्रिये, प्रमुदित लोचने ( ' मंगलाष्टके ' पृ. २६ ) यादृष्टीने वाचावीत. ) वाग्विलास, कुसुमोद्यान यासारखे शब्द कवितेत सातत्याने येतात. उलट सैगलवरील कविता अत्यंत स्वाभाविक व सहजस्फूर्त उतरली आहे. ' रेफ्रिजरेटर मधील सतेजते'चा स्पर्शही या कवितेला नाही. किंबहुना एकूणच या काव्यात कृत्रिमता कमी आहे. अशा संग्रहाच्या आरंभी शांता शेळके यांची 'विवेचक' प्रस्तावना आहे. पुस्तकाच्या मलपृष्ठावर कवितांची शिफारस करणारा मजकूर आहे आणि याशिवाय थोडे आईविषयी, थोडे तिच्या कवितांविषयी शांता साठे यांनी लिहिले आहे. ते नसते तरी चालले असते. त्यामुळे अपरिहार्यपणे पुनरुक्तीचा आढळ होतो. तसेच हा संग्रह क्रमिक पुस्तक वाटू लागते. म्हणून अखेर स्वतः कवयित्रीच्याच प्रतिमेवर भरवसा ठेवून ' लौकिकाचा वारा न लागो तयास ' असे म्हणावेसे वाटते.

—रेखा इनामदार

खुणेचं पान
मनकर्णिका जोग
नीळकंठ प्रकाशन
कि. चौदा रुपये




कॉंग्रेसच्या शंभर वर्षांच्या प्रवासाचा स्वातंत्र्यपूर्व संघर्ष आणि नंतरच्या सत्तापर्वाचा इतिहास.
कॉंग्रेस घडवणाऱ्या आणि कॉंग्रेसने घडविलेल्या दादाभाई नवरोजी ते राजीव गांधी या सहा पिढ्यांच्या कर्तृत्वाचा आलेख.

॥ बखर कॉंग्रेसची ॥

॥ बखर कॉंग्रेसची ॥

लेखक . शिरीष सहस्रबुध्दे
मूळ किंमत : ९० रु.
शताब्दी निमित्त सवलत किंमत : ६० रु.
पहा आणि सवलतीत घ्या

राजहंस प्रकाशन

● १०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.
● वा. र. गोडे, जोशी वाडी, ४१ भवानी शंकर रोड, दादर, मुंबई-२८
फोन-४२२५४५५,

रंगभूमी

# युवावृत्तीचे जोशपूर्ण दर्शन

# अफलातून

वि. भा. देशपांडे

'अफलातून' हे विक्रम भागवताचे नवे नाटक दिमाखदार पद्धतीने रंगभूमीवर नुकतेच आले आहे. या नाटकाच्या नावापासून आणि जाहिरातीमधून सतत कुतूहल वाढते ठेवलेले होते. ते प्रयोगातही कायम राहिले.

ज्याना पूर्वकल्पना नसेल त्यांना नाटकाचा प्रयोग आरंभित झाल्यावर काही वेळातच कल्पना येते की, या नाटकाचे नाते 'वेस्ट साईड स्टोरी' या चित्रपटाशी जुळणारे आहे. दर्शनी तसे वाटावे अशी परिस्थिती निश्चितच आहे. पण हे नाटक म्हणजे या चित्रपटाची भ्रष्ट नक्कल नव्हे. कालदृष्ट्या विचार केला तर 'वेस्ट साईड' हे मूळचे नाटक १९५७–५८ च्या सुमारास रंगभूमीवर आले. नतर तीन–चार वर्षांच्या अवधीने म्हणजे १९६१ च्या सुमारास चित्रपटाच्या रूपाने ते व्यक्त झाले. रोमियो अँड ज्यूलिएट नाटकाची ही आधुनिक आवृत्ती हा त्याचा महत्त्वपूर्ण गाभा होता. ज्यांना रोमियो ज्यूलिएट नाटक परिचित आहे त्याना हा चित्रपट अधिकतेने कळू शकतो. त्यातले सागितिक वातावरण कथाभागाच्या–आशयाच्या अगाने जाणारे असल्याने तो त्याचा आणखी एक गुणवत्ता विशेष बनतो. मराठी नाटकाचा आधार कोणता आहे हे कळावे आणि प्रयोग पाहताना काही पूर्वसूत्र ध्यानी यावे यासाठी हे सारे सागण्याचा प्रपंच.

मात्र विक्रम भागवतने या चित्रपटाची पूर्णतः नक्कल इथे केली नाही. त्याला ती अभिप्रेतही नाही. त्याने मूळच्या नाटक–चित्रपटाचा स्थूल आराखडा मनासमोर ठेवलेला आहे. आकृतीबंध तोच घेतला आहे, पण आशयाच्या संदर्भात स्वत.ची वेगळी दिशा ठेवण्याचा यत्न आहे. (मूळ लिहिलेली मराठी संहिता मला उपलब्ध होऊ शकली नाही, पण प्रयोगातून जी सहिता समोर आली त्याआधारे सांगणे शक्य आहे.) प्रस्तुत नाटकात नाटककार दोन गोष्टीवर अधिक भर देऊन आहे; त्या म्हणजे ही तरुणपिढी हिंसक होत चालली आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे यातली काही मुले चागल्या घरातली, सस्कारातली असून ती हिंसेकडे, गुडगिरीकडे का वळली आहेत, अशी का वागत आहेत, इत्यादी.

तरुणाच्या दोन 'गँग्स' मधील हा सघर्ष आहे. पैकी एक गँग ही शिक्षणादी कोणत्याही गोष्टीचा विशेष संस्कार नसलेली. त्याना जगण्यासाठी–पोटासाठी दहशतवादी भूमिका घेऊन समाजाकडून आपल्याला हवे ते ओरबाडून घ्यायचे आहे. कोणत्याही नीती–मूल्याचा–जीवनमूल्याचा त्याना विधीनिषेध नाही. असायचे कारण नाही. त्यांची भूमिका त्याच्यापुरती स्वच्छ आहे. ती एक सामाजिक वृत्ती आहे. या उलट दुसरी गँग आहे ती बहुताश मध्यमवर्गीय कुटुबातली किंवा त्या मनोवृत्तीची मुले आहेत. ती काहीशी स्वच्छदी असली तरी गुड नाहीत, हिंसक नाहीत, पण प्रसंगाने त्याना हिंसक बनावे लागते. गुडाचा बीमोड करण्यासाठी तसे व्हावे लागते. अशा दोन तरुणांच्या समूहावर नाटकाचा संघर्ष उभा आहे.

यामध्ये एक प्रेम प्रकरणाचा धागा आहे. विन्या एका गँगचा प्रमुख तर निळूदादा दुसऱ्या गँगचा. निळूदादाची बहीण ही विन्याची प्रेयसी आहे सघर्षाचा हा एक महत्त्वाचा मुद्दा आहेच. शिवाय कॉलेजच्या सदर्भातील काही भानगडी आहेत. पण हा प्रेमाचा धागा कथानकाच्या सदर्भात नाटककाराला समर्थपणाने वापरता आला नाही असे सतत जाणवत होते. प्रयोगात अभिनयाच्या स्तरावर तर तो धागा क्षीणसुद्धा नव्हे, नगण्यच राहिला. (मूळच्या नाटक–चित्रपटात हा भाग प्रभावीपणाने आलेला आहे.)

विक्रम भागवतचे हे नाट्यलेखन अनेकार्थाने विचार करायला लावणारे ठरेल. कारण केवळ दोन गँग्समधली मारामारी इतक्या मर्यादित अर्थाने नाटक उभे राहिलेले नाही; तर एरवी सरळ असणारी ही तरुण मुले हिंसक का बनतात, ती जेव्हा तशी बनू पाहतात तेव्हा त्यांच्या जीवनातल्या काही गोष्टीचे प्रश्न कळत नकळत कसे गुतागुतीचे बनतात, उदा. कॉलेजमधून नाव काढले जाणे, घर सोडावे लागणे, पदवी न मिळणे इत्यादी, अशा दोन भिन्न प्रवृत्तीमधल्या युवकांमध्ये होणारा हिंसाचार मोडून काढण्यामध्ये पोलीसयत्रणा अपरिहार्यपणे उभी राहते. त्या यंत्रणेचा प्रतिनिधी म्हणून येणारा इन्स्पेक्टर या सर्वांना समजावून घेण्याची जी भूमिका घेतो त्याच्या हाती काय येते ? विन्याच्या गँगमधल्या मुलावर स्वत च्या मुलाइतके प्रेम करणारा चाचा जात–धर्म या पलीकडे जाऊन प्रेम करू शकतो, तो का ? असे अनेक प्रश्न यामध्ये निर्माण झालेले आहेत. या प्रश्नाची उत्तरे नाटककाराने विस्ताराने द्यावीत अशी अपेक्षा नाही अशा युवकाच्या प्रश्नाना स्पर्श करणारे, काही प्रमाणात शोध घेणारे नाट्यलेखन मराठीत तरी दुर्मीळच म्हणून या नाटकाचे महत्त्व जरूर आहे.

नाट्यलेखनातील काही शका, अनुत्तरित प्रश्न हे भिन्न स्तरावर राहणारच. तसे राहण्यातच नाटकाचे वेगळेपण असते. पण प्रयोगरूप मात्र वादातीत बाधीव–रेखीव असे आहे. मूळ सहितेतला गाभा नेमकेपणाने जर दिग्दर्शकाला भावला तर तो प्रयोगरूपाने कसा ताकदीने व्यक्त होतो हे या प्रयोगात जाणवले विनय आपटे याची दिग्दर्शक म्हणून असलेली यातली कामगिरी लक्षणीय स्वरूपाची आहे. कारण त्याने नाटकाची जात नेमकी हेरून त्यातल्या पात्राच्या विरचना आणि हालचाली बेतलेल्या आहेत. विशेषतः समूहरूपाने ज्या ज्या वेळी भावना व्यक्त होत होत्या तेव्हा शब्दांच्या–सगीताच्या बरोबरीने शारीरिक हालचालीच्या अनेक आकृतीबंधानी रंगमचीय भाषेत त्या आपल्याशी बोलत आहेत असे जाणवत होते. काम करणाऱ्या कलाकाराकडून त्याने शरीर मेहनत भरपूर करून घेतलीय. एखाद–दुसरा अपवाद सोडला तर या सामूहिक हालचालीना केवळ कवायतीचे स्वरूप आलेले नाही त्याच्या हालचालीच्या आकृतीबधातून समूहाच्या भावनाच्या आविष्काराचे आकार दृगोचर होत जातात. दिग्दर्शकाने समूहाबरोबरच व्यक्तिमनाचे

दुःखही प्रेक्षकांपर्यंत नीटपणाने पोहोचेल अशी काळजी घेतली आहे. त्यामुळे हे नाटक व्यक्ती आणि समूह अशा दोन्ही स्तरांवर एकाच वेळी समांतर तर कधी अलगपणाने जात होते.

संगीत हा या नाटकाचा प्राणभूत भाग आहे. आनंद मोडक यांनी संगीत देताना विषय-आशयाबरोबरच व्यक्ती-समूह यांच्या भावताणांचे हुंकार प्रभावीपणे व्यक्त होतील याची काळजी घेतली आहे. या नाटकातील संगीतात्रावत संहिता आणि ध्वनिमुद्रित फिती समोर ठेवून संगीत-जाणकाराने काहीबाही सांगणे आवश्यक आहे. कारण त्यामध्ये विविध भाववृत्ती, काही कथने, निवेदने, आवाहने आहेत. ती व्यक्त होण्यासाठी वापरलेली वाद्ये आणि त्यांचे परिणाम यावर बोलायला पाहिजे. पण एक मात्र निश्चित, हे संगीत प्रेक्षकांना गुंतवून ठेवते. पण त्याबरोबर हेही खरे की, संगीत आरंभित झाले की, अनेकदा त्यातल्या शब्दांचो स्पष्टता नाहीशी होत होती. त्यातला कर्कशपणा हा युवावृत्तीच्या भावताणाचा निदर्शक असला तरी ती कर्कशता नाटचशब्दांचे स्पष्टपण, श्रवणसुभगता गमावीत असेल तर अनाठायी आहे. (मी पुण्यातला भरत नाटचमधला प्रयोग पाहिला).

नेपथ्य रघुवीर तळाशीलकरांचे होते. दोन स्थलदर्शनाचे नेपथ्य होते. त्यातल्या हॉटेल-मधल्या स्थळाचो रंगमंचोय वास्तवता परिपूर्ण होती. त्याचा वापरही यथायोग्य झाला. पण निळूदादाच्या गँगची जागा झोपडपट्टीत दाखवून भवतालच्या झोपड्या रंगवलेल्या होत्या. झोपड्यांच्या फ्लॅटचे रंगवणे ही सोय स्वीकारावीच लागते. पण त्याचे रंगवणे डोळ्यात अकारण भरत होते. त्या पार्श्वभूमीवर निळूदादाची जागा अधिक ठसठशीत वाटायला हवी, ती वाटत नव्हती.

हे एक समूह नाटच असल्याने अनुभवाच्या पातळीवर समूहाच्या अभिनयाचाच विचार अपेक्षित असतो. तो तर उत्तम होताच. पण जिथे व्यक्तींचा संघर्ष आहे, व्यक्तिभावनांचे दर्शन आहे तिथे चाचा झालेले किशोर भट, विन्या- दिलीप कुलकर्णी, निळूदादा- चंद्रू पारखी, पुंड्या- अतुल परचुरे, इन्स्पेक्टर कुळकर्णी-विनय आपटे यांच्या अभिनयाचा आवर्जून उल्लेख करायला हवा. इन्स्पेक्टरच्या व्यावसायिक एकेरी चित्रणाची रंगभूमीला सवय आहे, पण भावनिक चित्रण अपवादात्मकच आहे. विनयने दोन्ही स्तरावर भाव व्यक्त करून, थोडे गायन-नृत्य करून ती व्यक्तिरेखा अधिक सजीव केली. या चांगल्या उल्लेखाबरोबर एक वाईट उल्लेख अपरिहार्य आहे. तो म्हणजे प्रिया झालेल्या नेत्रा वेदक हिचा. तिला तिची व्यक्तिरेखा कोणत्याच स्तरावर आकळली नाही असे सतत वाटत होते. इतकी महत्त्वाची व्यक्तिरेखा तिने वाया घालवली. प्रसंगी नाटकाची गुणवत्ता काही प्रसंगी उणावत ठेवली. तसे व्हायला नको होते. हा दोष जसा तिचा आहे तसाच दिग्दर्शकाच्या निवडीचाही आहे !

भद्रकालीसारख्या मालवणी नाटकांचे नवेनवे प्रयोग देणाऱ्या संस्थेने (स्वतः मालकांनी बाजूला राहून) तरुण रक्ताला संधी दिली ही अभिनंदनाची गोष्ट आहे. मच्छिन्द्र कांबळींनी युवावर्षाला दिलेले हे उत्तम 'भेट-नाटक' आहे. □

---

चित्रपट

## देखा प्यार तुम्हारा

### कमल हसनचा बहारदार अभिनय

---

**का**ही वर्षापूर्वी 'एक दुजे के लिए' आला आणि हिट झाला. या चित्रपटातही कमल हसन-रती अग्नीहोत्री जोडी मात्र पुन्हा एकत्र दिसली नाही. वीरेंद्र सिंग दिग्दर्शित 'देखा प्यार तुम्हारा 'नं मात्र या दोघांना परत एकत्र आणलं आहे. अर्थात रती अग्निहोत्रीनं चित्रपटसृष्टीतून निवृत्ती स्वीकारल्यानं त्यांचा हा शेवटचाच चित्रपट ठरेल. पण या नर्मविनोदी चित्रपटात दोघानीही आपल्या सहज अभिनयानं धमाल उडवून दिली आहे एवढं खरं.

'देखा प्यार...'ची कथा तशी फार्सिकल वळणानं जाणारी आहे. त्यामुळे गडबड गोंधळ, गैरसमज, त्यातून निर्माण होणारे विनोदी घोटाळे या साऱ्या गोष्टी इथं आहेतच. मात्र साऱ्याबरोबरच अशा प्रकारच्या कथानकाला जो वेग लागतो तो ठेवणंही दिग्दर्शकाला जमलं आहे. त्यामुळेच या चित्रपटाची भट्टी छान जमून गेली आहे.

अन्नू ( रती अग्निहोत्री )ची ओळख एका प्रवासात विशालशी ( कमल हसन ) होते. विशाल एका अॅडव्हर्टायझिंग कंपनीचा मालक असतो. अन्नूच्या वडिलांचा या लग्नाला विरोध मावळून पुढं या दोघांचं लग्न होतं.

लग्नानंतर काही दिवस चांगले जातात; पण विशालच्या व्यवसायामुळे त्याचा रोझी ( कल्पना अय्यर ) या मॉडेलशी सतत संबंध येतो. त्यातून अन्नूला त्याचा संशय यायला लागतो. कुत्री आणि नवरे यांना ताब्यात ठेवणं एकच असं मानणारी तिची मैत्रीण सीमा ( उषा नाईक ) तिला कुत्र्यावरचं एक पुस्तक देते. ते वाचून अन्नू त्याचा विशालवर प्रयोग करू पहाते. पण त्याच्या हातात ते पुस्तक पडल्यामुळे तिचा प्रयत्न



वाया जातो.

दुसरा मार्ग म्हणजे नवऱ्याचा मत्सर जागा करणे. अन्नूला रणजित मलिक या डिरेक्टरीतून शोधलेल्या नावानं सीमा रोज फुलं पाठवायला लागते, फोन करायला लागते हा रणजित कोण आहे या कुतुहलानं विशाल त्याचा पत्ता शोधतो. तो असतो एक पोलिस अधिकारी ( सुरेश ओबेरॉय )

त्याला धडा शिकवण्यासाठी विशाल आपल्या मित्राच्या सहाय्यान ( देवेन वर्मा ) अन्नूच्या नावानं त्याला फुलं पाठवायला लागतो. त्यामुळे त्याची बायको ( मौसमी चटर्जी ) भडकते. शेवटी विशाल त्याचा समाचार घ्यायचा म्हणून अन्नूच्या नावे फोन करून त्याला आपल्या घरी बोलावतो. या सगळ्याशी संबंध नसताना होणाऱ्या त्रासामुळं वैतागलेला रणजित या प्रकरणाचा एकदा सोक्षमोक्ष लागावा म्हणून तिथं जातो. त्याच फोनवरचं बोलण ऐकलेली त्याची बायकोही मागोमाग येते. इकडे हे प्रकरण हाताबाहेर चालल्यामुळे अन्नू आणि सीमा, सीमाच्या नट नवऱ्याला ( शक्तीकपूर ) रणजित मलिक बनवून विशालची समजूत घालण्यासाठी पाठवतात. हे सगळे एकत्र आल्यावर जी काही धमाल उडते ती प्रत्यक्ष पडद्यावरच पहायला हवी.

चित्रपटातले काही प्रसंग खरोखरच छान खुलले आहेत. अन्नूचे वडील विशालला प्रथम भेटतात तो प्रसंग, शेवटचा गोंधळ हे दिग्दर्शकाने छान टिपले आहेत. चित्रपटाची लयही त्यानं चांगली पकडली आहे.

चित्रपटाचं संगीत मात्र खास नाही. लक्ष्मीकांत प्यारेलालनी त्याच्यावर खास मेहनत घेतल्याचं जाणवत नाही एक–दोन गाणी तर अनावश्यकच आहेत. त्यामुळ गाणी किंवा पार्श्वसंगीत काहीच लक्षात रहात नाही.

चित्रपटातली कलाकाराची निवड मात्र एकदम योग्य आहे. प्रत्येकजण त्या त्या भूमिकेत अगदी फिट्ट बसला आहे. प्रथम उल्लेख करावा लागेल कमल हसनचा. विशालच्या भूमिकेत त्यानं अक्षरश: बहार उडवून दिली आहे. त्याचा मुद्राभिनय, लवचिक हालचाली, नृत्यकौशल्य या सगळ्यातून त्यानं या हलक्याफुलक्या भूमिकेत छान रंग भरले आहेत. त्यानं केलेला प्रत्येक प्रसग पहाण्यासारखा उतरला आहे. विशालचा मिस्किलपणा, बायकोच्या संशयामुळ झालेला वैताग, बायकोचा प्रियकर शोधण्याच्या आणि त्याला धडा शिकवण्याच्या नादात त्यान घातलेला गोंधळ हे सगळ प्रत्यक्ष पहाण्यासारखंच. विशेषत मित्राच्या सल्ल्यावरून अमिताभच्या स्टाइलमध्ये तो घरी येऊन ज्या मजा करतो किंवा 'औरत का भरोसा नही' या गाण्याच्या वेळेस तो आणि देवेन वर्मा जो गोंधळ घालतात तो अफलातूनच. खरोखर कमल हसनची 'सागर' नतरची आणखी एक चागली भूमिका हे 'देखा प्यार'च मोठं आकर्षण आहे

रती अग्निहोत्रीन कमल हसनला चागली साथ दिली आहे ती दिसतेही चागली. मराठी चित्रपटनायिका उषा नाईकला हिंदीत प्रथमच मोठी भूमिका मिळाली आहे. तिचा उपयोग तिन चागला करून घेतला आहे. देवेन वर्माही कमल हसनच्या बरोबरीनं आपल्या भूमिकेत रग भरतो शक्तीकपूरही यात नेहमीपेक्षा अगदी वेगळी भूमिका मिळाली आहे. मूर्ख खलनायक म्हणून विनोद निर्माण करण्यापेक्षा या सरळ विनोदी भूमिकेत तो चागला शोभतो.

एकूण खुसखुशीत कथा आणि कमल हसनच्या अभिनयासाठी 'देखा प्यार तुम्हारा' एकदा जरूर पहाण्यासारखा. □

# बादल

## नेहमीच्याच घराण्यातला संघर्ष

जमिनीच्या किंवा अशाच कुठल्या तरी कारणावरून निर्माण झालेलं वैमनस्य, त्यातून दोन घराण्यातली दुश्मनी, धुमसणारं वैर आणि या दोन घराण्यातल्या तरुण–तरुणीच एकमेकावर असलेल प्रेम, त्यातून निर्माण होणारा संघर्ष हे कथासूत्र वर्षानुवर्षं हिंदी चित्रपटातून घोळत आलेलं आहे. पण त्यांचा कटाळा अजून या व्यावसायिकाना आलेला नाही. नवीन काही तरी देण्यापेक्षा दोन–तीन प्रकारच्या त्याच त्या शिळ्या कढीला ऊत आणण हा या मडळीचा आवडता उद्योग. त्यात कालमानाप्रमाणे लोकप्रिय नायक–नायिका दोन चार उडती गाणी हा मसाला टाकला की नवीन 'डिश' म्हणून लोकांना द्यायला हरकत नाही. हाच वर्षानुवर्षाचा फॉर्म्युला मोतीसागर निर्मित आणि आनद दिग्दर्शित 'बादल' मध्येही वापरला गेला आहे.

ठाकूर रघुवीरसिंग ( मदनपुरी ) आणि ठाकूर समशेरसिंग ( शम्मीकपूर ) याचं जुन वैर. रघुवीरसिंगच्या मुलान समशेरसिंगच्या भावाचा खून केलेला असतो. त्यातून हे वैर पुढच्या पिढीतही पोचत रघुवीरसिंगचा नातू बादल ( मिथुन चक्रवर्ती ) आणि समशेरचा पुतण्या किरण ( अरुण गोविल ) एकमेकाना पाण्यात पहात असतात. सघर्षाला धार यावी म्हणून 'मै तेरा खून पी जाऊँगा' अशी एकमेकाना आलटूनपालटून म्हणत असतात.

दरम्यान ट्रॅक्टर खरेदी करायला शहरात गेलेल्या बादलची गाठ शहरात शिकणाऱ्या समशेरसिंगची मुलगी मीनाक्षी ( पूनम ढिल्लन ) हिच्याबरोबर पडते डाकूच्या तावडीतून तो तिला अचाट साहस वगैरे करून वाचवतो ( आता आयत्या वेळेस त्याला एवढी मोठी बस कशी चालवता येते, बसच्या तडाख्यानं घोड्यावरच्या दरोडेखोराना उडवून लावायच कौशल्य त्यानं कुठून मिळवल वगैरे प्रश्न डोक्यात अजिबात न आणणच फायद्याच )

हिंदी चित्रपटाच्या रिवाजाप्रमाणे मग बादल आणि मीनाक्षी एकमेकाच्या प्रेमात पडून एक–दोन गाणी म्हणतात न म्हणतात तोच समशेरसिंगला आणि किरणला याचा सुगावा लागतो. खानदानकी दुश्मनी आड आल्यामुळं ते मीनाक्षीच लग्न किरणच्या मेहुण्याशी विक्रमशी ( शक्तीकपूर ) ठरवतात. हा खलनायक असल्यामुळ अर्थातच सर्व दुर्गुणानी परिपूर्ण असतो.

सिनेमाची अजून बरीच रिळं शिल्लक आहेत हे लक्षात आल्यावर दिग्दर्शकान कथेला एक कलाटणी दिलीय. मीनाक्षीच्या रडारडीला वैतागून असेल पण किरण बादलला भेटायला जातो. बादल प्रेमाचं नाटक करीत नाहीये हे पाहिल्यावर त्याचं हृदयपरिवर्तन होतं. दरम्यान विक्रमही तिथं गुपचूप आलेला असतो. या दोघात समझोता होतोय हे बघून तो बादलवर गोळी झाडतो.

ती किरणला लागते आणि तो मरता.

मग बादलला जन्मठेप, मीनाक्षीचा गैरसमज वगैरे. पण तो शेवटी तुरुंगातून पळून जातो आणि खरा खुनी विक्रमच असल्याचं पुढं बरीच मारामारी, खून, जाळपोळ याच्यानंतर उघड होतं.

कुठल्याही इतर हिंदी चित्रपटात सापडेल असं हे कथानक. त्याच्यात जसं विशेष काही नाही तसंच लेखन, दिग्दर्शन, संगीतातही फारसं उल्लेखनीय काही नाही. यातली कुणाचीच कामगिरी वाईट नाही इतकंच म्हणता येईल.

कलाकारात मिथुननं आपलं काम सफाईदारपणे केलं आहे. त्याच्या अनेक भूमिकांसारखीच नाचणं, गाणं आणि मारामाऱ्या असलेली ही भूमिका त्यानं व्यवस्थित केली आहे. पूनमला फारसा वाव नाही. तिचा चेहराही बऱ्याचदा निस्तेज दिसतो. समशेरसिंग म्हणून शम्मीकपूर व किरण म्हणून अरुण गोविल चांगले शोभतात. मात्र अरुण गोविलनं अनेकदा चेहरा नको तितका रागीट केलाय. इतर भूमिकात मधू कपुर, राजेंद्रनाथ, प्रेमा नारायण, जयश्री टी. वगैरे आहेत.

थोडक्यात तुमच्याकडे भरपूर वेळ असेल, आणि तो घालवण्यासाठी म्हणून डोक्याला त्रास न होणारा, विचार वगैरे करायला न लावणारा चित्रपट तुम्हाला बघायचा असेल तर 'बादल' अगदी आदर्श आहे.

— सीमा कुलकर्णी

---

# भाई भगत–६०

तुमच्या माझ्या ओळखीला साताठ वर्षं झाली. तरीही मला तुमची ओळख वीसबावीस वर्षांपूर्वीच झालेली. कधी भारतमाताला चित्रपट पहायला गेलो की तुम्ही नक्कीच तिथे हजर असायचा.

आणि त्यानंतर फिल्म डिव्हिजनचा माहितीपट किंवा वृत्तपट पहायची वेळ आली की तुम्ही भेटायचाच. खरं तर, तुमच्या पहिल्या भेटीतही तुमच्या–माझ्यात लहानमोठेपणाची दरी पडली नाही. तर आपलेपणाचं नातं आकारलं गेलं.

आज आयुष्याची साठ वर्षे मागे टाकून एक समर्थ आणि प्रभावी निवेदक म्हणून तुम्ही सर्वमान्य आहात. तुमच्या आवाजासाठी जाहिरात कंपनीवाले दारात तिष्ठत उभे आहेत, तरीही तुमच्या आवाजाला गर्वाचा दर्प चढलेला नाही.

तुमच्या निवेदनातील आपलेपणा तुमच्या वागण्यातही आहे. जाहिरात धंद्यातील बड्यांना तुमच्या आवाजाला बडेपणा कळला, उमजला, तर माझ्यासारख्या लहान माणसाला तुमच्या मनातल्या 'माणसा'ने मोहित केलंय.

पैशाच्या जोरावर 'सुखसमृद्धी' विकत घेणारी माणसे माणूसपण विसरतात, तसं तुमच्या सहवासात, बोलण्यात कधीच आढळलं नाही.

आणि तसं आढळलं असतं तर तुम्ही सर्वांचे कधीच झाला नसता.

तुमच्या आयुष्याची वाटचालच 'झपाटलेपणा'तून झाली. तुम्ही झपाटल्यासारखे चित्रपटाकडे वळलात.

'पेंटर' पासून 'दिग्दर्शका' पर्यंतचा प्रवास मेहनतीने केलात. विश्राम बेडेकर, चंद्रशेखर, अमिया चक्रवर्ती, राजा नेने यांच्यासारखे मोठे दिग्दर्शक तुम्ही गुरुस्थानी मानलेत. त्यांना जवळून पहाण्याची संधी तुम्हाला मिळाली. आणि वयाची तिशी उलटण्यापूर्वीच तुम्हाला दिग्दर्शक बनविणारा चित्रपट पडद्यावर आला 'रानपाखरं!'

पण त्यावेळीही तुम्ही स्वतःला अधिक महत्त्व दिलं नाही. 'माझ्या दिग्दर्शक-गुरूंची वैशिष्ट्ये घेऊनच माझ्यातला स्वतंत्र दिग्दर्शक उभा राहिलाय' या वाक्यातील प्रामाणिक 'विनय' आताच्या काळात विरळाच! दुसऱ्याला कमी लेखून आपला मोठेपणा ठसविण्याच्या या काळात तुम्ही याच तुमच्या स्वभावामुळे वेगळे वाटता.

'रानपाखरं'ने तुमच्यावर प्रेम करणारं एक माणूस दिलं. कुंदावहिनींशी लग्न झाल्यावर तुम्हाला 'रक्ता'च्या माणसातलं 'माणूसपण' कळलं.

आणि तिथूनच झपाटलेपणाचा दुसरा अध्याय सुरू झाला.

घर सोडावं लागलं, मित्रांच्या दारी



**मैत्रीचं रिंगण ... खूपच मोठे**
**राजापासून रंकापर्यंत**
**साहित्यिकांपासून गायकांपर्यंत**

राहावं लागलं. लॉजवर रात्री काढाव्या लागल्या, झोपड्यांना लाजवतील अशा खोल्यातून संसार थाटावा लागला.

'रानपाखरं'च्या दिग्दर्शकाला कामासाठी–पोटासाठी जीवतोड धावाधाव करावी लागली.

वीस–पंचवीस रुपयांसाठी तुम्ही चित्रपट-नाटकाची परीक्षणं लिहायला सुरुवात केली. कुंदा वहिनींनी नाटक–सिनेमातून काम करून संसाराचा गाडा ओढला होता.

चित्रपट धंद्यातील अस्थिरतेने तुम्हाला सरकारी नोकरीच्या दारात नेऊन उभं केलं.

१९६२ साली १२८ उमेदवारातून मराठी निवेदक म्हणून तुमची निवड झाली.

आणि आयुष्याला स्थैर्य मिळण्याची चिन्हे दिसू लागली. आवाजाला असणाऱ्या किमतीने तुम्हाला पैसा मिळू लागला. पण तुमच्या मनातला 'सिनेमावाला' गप्प रहायला तयार नव्हता. श्री. ना. पेंडसेंच्या 'यशोदा'ला तुम्ही पडद्यावर आणलेत. त्या जिद्दीपोटी पुन्हा एकदा 'कंगाल'पणा नशिबी आला. पण तुमचा तुमच्या आवाजावर विश्वास होता, नि त्या आवाजानेच तुम्हाला तारलंय.

आज अंधेरीच्या तुमच्या घरी आलेल्या कुणालाही 'सधन'तेचं दर्शन घडतं; पण त्यामागची मेहनत, धडपड दिसायला 'भाई भगत' अगदी जवळून पहायला हवेत.

तुमच्या आयुष्यातल्या धडपडीला स्वस्थ-

तेची किनार लाभलीय.

तुमच्या घरात बसल्यानंतर परकेपणाची जाणीव कधीच होत नाही.

आणि तुमच्यावरोबर बोलताना वडिलकीची भीती कधीही वाटत नाही.

वयात जवळ जवळ २२–२३ वर्षांचा फरक आहे. पण तुम्ही मला वडील बंधूसारखे भासता ते याचमुळे !

तुमच्यामागून निवेदनाची कामे करणारी अनेक माणसे आज आहेत. त्यांच्या आवाजाबद्दल, उच्चाराबद्दल, निवेदनाबद्दल अधिकारवाणीने टीका करण्याचा हक्क तुम्ही कधीच बजावत नाही. ही सगळी मडळी तुम्हाला तुमच्या घरातील वाटतात. त्याना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी तुम्ही नेहमीच तयार असता. 'ही मडळी पुढे आली तर आपला घदा बुडेल' ही भीती तुम्ही कधीच बाळगली नाही. त्याऐवजी कुणाच्या आवाजात, लिखाणात वेगळेपण आढळल तर त्याला योग्य ठिकाणी पोहोचण्यासाठी तुम्ही अगदी मनापासून प्रयत्न करता.

तुमच्या मैत्रीचं रिंगण खूप खूप मोठ आहे.

राजापासून रकापर्यंत, साहित्यिकापासून गायकापर्यंत, नाटककारापासून–कलाकारांपर्यंत सारे सारेच तुमचे मित्र !

तुम्ही सगळ्यानाच समान पातळीवरून पहाता पण काही निवेदक एकलव्यासारखे तुम्हाला गुरू मानून बसलेत.

आणि तुम्ही ! त्या दिवशी तुम्ही तुमच्या 'गुरू'बद्दल बोललात आणि माझ्या मनात अधिक 'मोठे' झालात.

वयाने लहान असलेले इंग्रजी–निवेदक प्रताप शर्मा याना तुम्ही गुरुस्थान दिलंय. ..

कधी अस्वस्थता दाटून आली की मला तुमची आठवण येते. वाट वाकडी करून तुमच्याकडे येतो, मनसोक्त गप्पा मारतो आणि मुक्त मुक्त होऊन घरी परततो.

आयुष्याच्या प्रवासात 'आपली' अशी वाटणारी माणसं खूपच कमी सापडतात. अशा माणसांपैकी तुम्ही एक !

केवळ माझेच नाही तर माझ्यासारख्या अनेकाचे तुम्ही 'भाई' ! जगात शत्रू तयार करणं सोपं आहे. पण मित्र जमविणं कठीण असतं आणि तुम्हाला मित्र जमवणच सोप वाटतय.

'रविवार हा माझ्या मित्राचा दिवस... त्या दिवशी मी माझ दार उघड ठेवून मित्राची वाट पहात बसतो.' असं म्हणताना तुमच्या चेहऱ्यावर खोटेपणाची रेषा नसते.

गतआयुष्याचा चलत चित्रपट डोळ्यासमोरून सरकवून, तुम्ही शेवटच्या तात्पर्याप्रत पोहोचता, कळवळून म्हणता,

'मला रक्ताचे नातेवाईक नाहीत, मित्र हेच माझे खरे नातलग आहेत.'

आयुष्यभर मनाने चित्रपटात असलेल्या तुमच्या नेहमीच्या वागण्यात नि बोलण्यात नाटकीपणा कधीच अवतरला नाही

तुमच्या वागण्या–जगण्याची निश्चित अशी एक पद्धत आहे पण तुम्ही कुणावरही स्वत चे विचार लादत नाही. मी सागतो तसे जगा नि वागा ही हुकूमशाही वयाच्या साठाव्या वर्षीही तुमच्याकडे नाही.

कुणाबद्दल वाईट बोलणे नाही, कुणाविषयी टीका करणे नाही यामुळेच तुम्ही तुमचं 'वेगळेपण' सिद्ध केलय

नऊ जानेवारीला तुम्ही साठावी पायरी ओलांडणार आहात. पचवीस वर्षांची नोकरी संपविणार आहात. पण आवाजाच्या दुनियेतील तुमचं सम्राटपद संपविण कधीच शक्य नाही...

तुमचा 'ओळखीचा' आवाज ऐकण्याची आम्हाला इतकी सवय झालीय की तो ऐकण्यासाठी आम्ही तुमच्या दारापर्यंत धावत येऊ

आणि मला तरी खात्री आहे 'भाई भगत' नावाच्या 'माणसा'च घर आमच्यासाठी कायमच उघड असेल.

'माणसा'ची वाट पहाणाऱ्या भाईंचं पुढच आयुष्य समाधानात जाणार हा विश्वास मलाच नाही तर तुमच्या अनेक मित्रांना आहे.

एक गोष्ट खरी की भाई, तुमच्यासारखा विश्वमित्र या जमान्यात तरी सापडणं कठीण आहे.

बस ! यापुढं आणखी काय लिहू...?

—प्रकाश विनायक कामत

ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्याच्या त्यागमय
जीवनाची कहाणी

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर याचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# बाई

## प्रभावी लघुपट

**श्री.** सुमित्रा भावे याची पटकथा आणि दिग्दर्शन असलेला 'बाई' हा लघुचित्रपट पाहिला आणि लघुपट या माध्यमाची ताकद प्रत्ययाला आली. केवळ अर्धा तासाचा हा लघुचित्रपट.

लघुचित्रपट म्हटला की साधारणपणे तो माहितीपर किंवा प्रचारी, सरधोपट माडणीचा असे आपण गृहित धरतो. वेळेच्या मर्यादेमुळे हे स्वाभाविक वाटते आणि असतेही. श्रीमती भावे यांच्या लघुपटाने मात्र या मर्यादा ओलांडल्या आहेत.

चालू जमान्यातील स्त्री-मुक्ती चळवळीशी संबद्ध असा विषयच 'बाई' या लघुपटाचा विषय आहे. मनात आणल्यास 'स्त्री' किती धीटपणे, दुसऱ्या कोणाचा आधार न घेता, उलट भोवतालच्यांना आधार देत खंबीरपणे स्वत.ची वाटचाल करू शकते हे या लघुपटात दाखविले आहे.

सुरवातीला दलित समाजातली ही बाई अगदी चारचौधींसारखी आहे. दारूड्या नवऱ्याला सहन करीत, घरासाठी कष्ट उपसत, मुलाना साभाळत, रोजगार करीत तिचा दिवस जातो. फक्त तिचे एक वैशिष्ट आहे. ती मुलीला कामाला न लावता शाळेत घालते. गर्भवती असताना तान्हे मूल आजारी असले तरी मुलीची शाळा बुडू नये म्हणून मुलाला मुलीवर न सोपवता स्वत.बरोबर कामावर घेऊन जाते. वेळेवर डॉक्टरकडे न जाऊ शकल्यामुळे तान्ह्या मुलाचा मृत्यू होतो. येथे ती बदलते. दारू झोकून आलेल्या नवऱ्याला पहार दाखवते. तो काढता पाय घेतो. बाळंतपणाच्या वेळी नवऱ्याची परवानगी न घेताच सततिनियमनासाठी शस्त्रक्रिया करून घेते. महिलांच्या उद्योग केंद्रात जाते. स्वत च्या पायावर उभी रहाते. पैसे बँकेत ठेवते. नवऱ्याचे अस्तित्व घरात आहे. पण त्रास नाही. ती थोडाफार कायदा जाणून घेते. भोवतालच्या लोकाना आपल्या परीने मदत करते. मुलगी दहावीला अनुत्तीर्ण होते तेव्हा ती मुलीवर उसळते. पण तुझी अक्कल चुलीपुरती अस बहिणीला बोलणाऱ्या मुलाचाही तिला राग येतो. ती मुलीला पुन्हा परीक्षेला बसायला बजावते.

अर्ध्या तासात एका दलित 'स्त्री'च्या जीवनातला महत्त्वपूर्ण काळ आपल्याला दिसतो. तिचे अगतिक प्रवाहपतित जिणे, तिला जाग येणे, जाग आल्यावर ठाम निर्णय घेऊन तिचे उभे रहाणे या तिच्या जीवनातल्या तीन अवस्था आपल्याला दिसतात. यात कोठे फारसा ढोबळपणा नाही. भडकपणा तर नाहीच नाही. समंजसपणे परिस्थितीला सामोरे जाणाऱ्या नायिकेला सर्वगुणसपन्न ठरीव ठशाची पराक्रमी 'हिरॉइन' केलेले नाही. झगडताना ती अगदी वास्तव वाटते. परिस्थितीने कोंडी झालेली ती इतक्या बधीरपणे तरीही ठामपणे, एकही शब्द न बोलता नवऱ्याला पहार दाखवून बाहेर काढते ती तिची कृती अपरिहार्य वाटते. भडक, अतिरेकी वाटू शकत नाही. परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडली असताना ती फारशी बोलत नाही. त्या भोवऱ्यातून बाहेर पडल्यावरच ती बोलू लागते.

कष्टकरी, अशिक्षित माणसे एकंदरीत फार कमी बोलतात. बोलण्यासाठी त्यांच्याजवळ वेळ नसतो. मताचे स्वास्थ्यही नसते. ठराविक वेळातच काम करणारी, नियमित पैसा मिळविणारी शिक्षित पाढरपेशी माणसे त्यामानाने खूपच बोलतात. दिग्दर्शिकेचे वास्तवतेचे हे सूक्ष्म भान प्रसंगाप्रसगातून दिसते. पोते शिवत असताना 'ती' मधे मधे मुलाकडे नुसती पहाते. एक शब्द उच्चारीत नाही बायकानी विचारलेल्या प्रश्नाना एखाद्या शब्दातच किंवा फक्त मान हलवून उत्तर देते मुलाचा मृत्यू होतो. त्याला कवटाळून ती रुग्णालयाच्या दाराशी नुसती बसून रहाते. जसजशी निर्णय घेते, विचार करू लागते तसतशी हळूहळू ती बोलू लागते. मुलाना वाढवताना हसू लागते. शेवटी ठामपणे मुलीच्या पाठीशी उभी रहाताना तर बरीच बोलते. अशा अनेक कारणामुळे लघुपट वास्तव होतो प्रभावी वाटतो मुलगी अनुत्तीर्ण झाल्यावर कोणत्याही साध्यासुध्या बाईसारखी ती भडकते. नवऱ्याने डागलेल्या कोणत्या तरी बाईला मदत करीयला ती गेली असताना, मुलीचे अनुत्तीर्ण होणे तिला कळते. तेव्हा त्या बाईशी बोलणे तसेच सोडून ती धावत स्वतःच्या घरी येते. ती जर तर त्या डागलेल्या बाईला सगळ्या कायद्याच्या गोष्टी सांगून मग निघाली असती तर ती त्या वसतीतली सर्वसामान्य स्त्री वाटली नसती. कोणी तरी पुढारी वाटली असती. असे मोह लेखक, दिग्दर्शकांना अनेकदा होतात. ते येथे टाळले गेले आहेत. कोणत्याही सर्वसामान्य आईसारखी ती मुलीला फडाफडा बोलते. 'मी तुमच्यासाठी एवढे कष्ट उपसते. ते तुम्ही टी. व्ही. बघायला का—' वगैरे. बहिणीला बोलणाऱ्या मुलाचाही बापाच्या वळणावर गेलास म्हणून उद्धार करते. मुलगी अनुत्तीर्ण झाली तरी तिला पुन्हा परीक्षेची संधी देण्याचा तिचा निर्णय मात्र तिचा विकास, तिची स्त्री—पुरुष समानतेची नकळत जाणीव दाखवतो. वसतीतल्या दोन बायकांच्या सवादात तिच्याविषयीची अनुकूल—प्रतिकूल दोन्ही मते फार सहजपणे दाखविली आहेत.

लघुपटातला एक प्रसग फारच खटकतो. आजारी मुलाला दवाखान्यात घेऊन गेलेली ती मुलाच्या मृत्यूमुळे विदीर्ण होते. घरी लवकर परत येतच नाही. त्यावेळी तिचा नवरा, शेजारी, मुले अशा तऱ्हेने बसली आहेत की जसा काही छोट्या मुलाचा मृत्यू सगळ्यांना माहितीच आहे. त्याचे चेहरे चिंताग्रस्त न दिसता मर्तिकासाठी जमल्यासारखे वाटतात. सुरुवातीला यल्लमा देवीचे पार्श्वसंगीत आहे तेही लघुपटाच्या विषयाशी सुसगत वाटत नाही. कारण यल्लमा देवीचा सबध देवदासीशी आहे. महिलांचे उद्योग केंद्र वगैरे ठिकाणी तिचा प्रवेश कसा होतो हे एखाद्या प्रसंगातून सूचित होण्याची आवश्यकता भासते.

लघुपटातील सर्वच कलाकारानी आपापल्या भूमिका सुजाण भानाने केल्या आहेत. लक्षात राहते अर्थातच श्रीमती मुन्शीसकर याची मुख्य भूमिका. श्री देवू देवधर यांचे छायाचित्रण प्रभावी. झोपड्याची वसती, रस्ता, पोती शिवण्याची जागा, सर्व दृश्ये, प्रसग, स्थाने अगदी जिवत वाटतात.

सुजाण पटकथा—लेखन, योग्य दिग्दर्शन, समर्थ छायाचित्रण यामुळे प्रभावी झालेला 'बाई' हा लघुपट आहे.

—विनया खडपेकर

मुक्काम ठाणे

# विज्ञान संमेलन

मराठी विज्ञान परिषद दरवर्षी नेमाने —साहित्य समेलनाप्रमाणेच— कुठे ना कुठे विज्ञान समेलन भरवते. गेल्या वर्षी नागपुरला ते होते. यावर्षी ठाण्याला! दर एक वर्षाआड संमेलन खेड्यात भरवण्याचा त्यांचा पायंडा आहे. पण यंदा तो मोडला. (तसा दोन वर्षांपूर्वीही मोडला होता.) दिवसेंदिवस समेलन भरवणे कठीण होत चालल आहे. नवीन कार्यकर्ते तयार होत नाहीत. पूर्वीचे कार्यकर्ते एका मागोमाग एक परिषदेपासून दूर जात आहेत. कोल्हापूर–नागपूर या ठिकाणी तर उत्साहाचा एवढा अभाव होता की हे संमेलन स्थानिक लोकांच्या गळयात मारलय की काय असं वाटायचं.

या पार्श्वभूमीवर ठाण्याच्या संमेलनात (दि. २१,२२,२३ डिसेंबरला) उत्साह भरपूर होता. राज्यपाल कोना प्रभाकर राव याच्या हस्ते उद्घाटन, जिल्हाधिकारी श्रीमती शकरन् यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन, ठाण्याचे प्रशासक श्री. गोविंद स्वरूप हे स्वागताध्यक्ष त्यामुळे उद्घाटन सोहळा अगदी 'सरकारी' थाटात पार पडला. समेलन म्हटले की परिसंवाद ठेवलाच पाहिजे, असा नियम आहे की काय कोण जाणे. कोल्हापूर व नागपूर (मधला उदगीरचा अपवाद) येथले परिसवाद म्हणजे व्यासपीठावर १२ वक्ते व श्रोत्यामध्ये अकराजणं. त्यामुळे ठाण्यातही तीन–तीन परिसंवाद पाहून मी हबकलोच होतो. पण पहिल्याच वैद्यकीय परिसंवादाने गोड धक्का दिला. डॉ. गुरुनाथ परळकर, डॉ. चंद्रशेखर काळे, डॉ. टकले, डॉ. मुरली कामत, डॉ. जोशी आदी तज्ज्ञ डॉक्टर मंडळीनी आपापला वैद्यकीय विषय सामान्य श्रोत्यांसाठी चित्रपट, रंगीत पारदर्शिका इ.च्या साहाय्याने अत्यत सुलभ करून सांगितला. भरगच्च भरलेल्या हॉलमुळे कार्यक्रम रंगल्याची पावती मिळाली.

दुसऱ्या दिवशी प्रदूषण या नेहमीच्या विषयावर परिसंवाद होता प्रदूषणावर इतके लिहिले गेले आहे, व इतक्या वेळा त्याच्यावर कार्यक्रम झाले तरी त्या विषयात अजून ही सागण्यासारखे भरपूर असतेच. गेल्या वर्षीच्या भोपाळच्या दुर्घटनेमुळे प्रदूषणाला आणखी निराळे परिमाण लाभले आहे. प्रदूषणाविषयी धोकादायक रासायनिक कारखान्यातले कामगारसुद्धा बेफिकीर रहातात. लोकाची सोडा, पण स्वत चीसुद्धा ते काळजी करीत नाहीत. त्याच्यापर्यंत हे प्रदूषणाचे धोके जायला पाहिजे आहेत.

दुपारी महिला उद्योजकाशी बातचीत या नावाखाली सयोजकानी विज्ञान परिषदेतला स्त्री–मुक्तीचा कार्यक्रम उरकून घेतला. यात कोणाची सोय होती अन् कुणाची हौस ते त्यांनाच माहीत. सकाळच्या प्रदूषणाच्या परिसवादाच प्रतिबिंब सध्याकाळच्या खुल्या अधिवेशनात देखील पडले. जे काही ठराव एकमताने, फारशी चर्चा न होता पसार झाले त्यातला भोपाळच्या दुर्घटनेच्या निमित्ताने झालेला ठराव महत्त्वाचा होता. धोकादायक रसायनाच्या कारखान्याबाहेर त्या रसायनांपासून असलेल्या धोक्याचे व त्यावरील उपायांचे वर्णन असणारा फलक लावण्याची शिफारस त्या ठरावात होती. दुसऱ्या एका ठरावान्वये दिवाळीतील मोठा आवाज करणारे ॲटमबॉंबसारखे फटाके याच्या निर्मिती व विक्रीवर बदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे.

या विज्ञान समेलनाच्या ठरावाची एक गंमत असते. ते ठराव बहुधा शासनाला उद्देशून केलेले असतात. अमूकवर बदी घालावी, तमूकवर नियत्रण ठेवावे, अस करावं, तसं करू नये इ समेलन संपल्यावर सर्व सबधित खात्याकडे ते ठराव पाठवले जातात. आणि त्या त्या खात्यातील अधिकारी आणि मत्री या ठरावाना केराची टोपली दाखवतात. गेल्या वीस समेलनातल्या जवळ जवळ सगळ्या ठरावाचा हाच शेवट आहे. सरकार साहित्य समेलनातल्या ठरावानासुद्धा किमत देत नाही, तर विज्ञान समेलनाला कुठलं देणार?

ठाण्यातलं समेलन हे विसावं होतं. या वीस समेलनानतर मराठी विज्ञान परिषदेचे फलित काय असा प्रश्न निर्माण होतो. परिषदेला मुख्य उद्देश लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार हा आहे. पण ते कितपत साध्य, सध्याच्या कार्यपद्धतीने होतय् याचा विचार करण्याची वेळ आली आहे. खुल्या अधिवेशनात ठिकठिकाणचे कार्यक्रमाविषयीचे अहवाल वाचले गेले. सर्व कार्यक्रमात ठराविक साचा होता. वैज्ञानिक विषयावर एखादे भाषण, कोणातरी वैज्ञानिकाचा जन्मदिन पाळणे (म्हणजे पुन्हा भाषणं ठोकणे) एखादा वैज्ञानिक चित्रपट, मुलांसाठी निबंधस्पर्धा आखणे इ असे कार्यक्रम केल्याने आपण काहीतरी 'वैज्ञानिक' करतो आहोत असा त्या कार्यकर्त्यांचा गोड गैरसमज होतो. परिषदेला सुद्धा आपली शाखा (विभाग) काहीतरी करते आहे, (मुख्य म्हणजे ती जिवत आहे) यात समाधान मिळते. अनेक विभाग तर बंदच पडले आहेत. विशेषतः ज्या ठिकाणी समेलन भरते, ते विभाग पूर्णपणे थडच होतात. खिरोदा आणि चिंचणी ही ठळक उदाहरणे आहेत. परिषदेतले चैतन्यच हरपते आहे.

या वर्षीच्या ठाणे समेलनाचे एक वैशिष्ट्य म्हणजे परिषदेच्या निमित्ताने ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांचे भरलेले शिबिर. या शिबिरात प्रत्येकानी आपआपले अनुभव कथन केले. वैज्ञानिक कार्यक्रम आणि परिषदेचे उद्दिष्ट याची सागड घातली जाते आहे की, यासबधी विचार होईल. अशी अपेक्षा जरी पूर्ण झाली नाही, तरी असेच शिबिर पुन्हा पुन्हा सवडीने घेतल्यास निदान आत्मपरीक्षणास सुरुवात होऊन नक्की कोठे चुकते आहे, याचा विचार करण्यास सुरुवात होईल, हेही नसे थोडके.

या शिबिरात वृत्तपत्राचे प्रतिनिधी म्हणून म. टा. चे श्री. दिनकर गांगल बोलले. 'वृत्तपत्रासारखी प्रसार माध्यमे ही बांधिलकी म्हणून विज्ञान प्रसार करीत नाहीत तर लोकाची मागणी असते म्हणून ती ती विज्ञान सदरे आम्ही चालवतो. म टा. मध्ये विज्ञान पुरवणी व मनोरजन पुरवणी सारख्याच हेतूने चालविली जाते.' अशा प्रकारची स्पष्ट वक्तव्ये करून वृत्तपत्राच्या मर्यादा स्पष्ट केल्या. म्हणजे लोकामध्ये मागणी निर्माण करण्याच काम परिषदेसारख्या संस्थानाच करावे लागणार. रेडिओसारखे माध्यम मोठ्या शहरापासून दूरच्या भागात अतिशय चागले कार्य करते. शहरात दूरदर्शनमुळे रेडिओचे महत्त्व कमी झाले.

याची अपराधी खत मुंबई आकाशवाणीच्या विज्ञान कार्यक्रमाचे संयोजक श्री. जयंत एरंडे यांनी बोलून दाखवली. पण त्याचबरोबर छोट्या छोट्या रेडिओ केंद्रांचे जाळे पसरल्यास या माध्यमाचा खरा उपयोग होईल, हे आपले मतही बोलून दाखवले या शिबिरातले श्रोते अनुभवी कार्यकर्ते असल्याने, अगदी थोडक्यात परंतु नेमक बोललं पाहिजे ही जाण फार थोड्या वक्त्यांना होती. ही या शिबिरातली उणीव.

मात्र या संमेलनातले आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे समेलनाध्यक्ष श्री. डॉ. प्र. ग. पाटणकर यांचे अध्यक्षीय भाषण. दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे हे अध्यक्षीय भाषण एखाद्या गंभीर वैज्ञानिक विषयावर अभ्यासपूर्ण असे होते. श्री पाटणकर हे वाहतूकतज्ज्ञ असल्याने त्यांचा विषय होता 'भारत २००१ वाहतूक समस्या आणि ऊर्जा' भारतामध्ये शहरात वाहनांची गर्दी होऊन वाहतूक समस्या निर्माण झाली आहे, तर खेड्यात रस्तेच नसल्याने वाहतूक ही समस्या आहे. या दोन्हींचा व एकंदर वाहतुकीचा ऊर्जेशीही घनिष्ट संबंध असल्याने या समेलनाच्या निमित्ताने विषय पूर्णपणे समयोचित होता.

वाहतूक ही समस्या सध्या एवढ्या गंभीर अवस्थेला पोचली आहे, की ती कधी राम म्हणेल याचा भरवसा नाही. नेहमी वाहतुकीची समस्या हाताळण्यासाठी स्थापत्यशास्त्रज्ञ किंवा पोलीस यांची नेमणूक होते. पण या दोघांकडेही वाहतूकविषयीचे विशेष ज्ञान नाही. त्यासाठी वाहतूकशास्त्र या विषयात गती असणारा विशेषज्ञच हवा आहे. भारतात हा विषय अगदी नवा आहे, त्यामुळे त्यातले जे काही अगदी थोडे हाताच्या बोटांवर मोजण्यासारखे विशेषज्ञ आहेत, त्यात डॉ. प्र. ग. पाटणकर यांचा समावेश होतो. पुण्याच्या सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट याचे संचालक म्हणून काम करत आहेत. वाहतूक समस्येवर त्यांनी अनेक प्रबंध लिहिले आहेत. अनेक आंतरराष्ट्रीय सन्मानसुद्धा त्यांच्या वाटेला आले आहेत. वाहतूक विषयावर त्यांनी अनेक छोटीमोठी मराठी व इंग्रजीतून पुस्तकेही प्रकाशित केली आहेत.

मराठी विज्ञान परिषदेच्या या समेलनाचे दुसरे एक वैशिष्ट्य म्हणजे हे संमेलन त्यांनी मराठी विज्ञान महासंघ या दुसऱ्या संस्थेच्या सहभागाने भरविले. म. वि. महासंघ ही संस्था मराठी विज्ञान परिषदेच्याच काही असंतुष्ट व बंडखोर कार्यकर्त्यांनी काढली. महाराष्ट्राला दुहीचा शाप आहे, तो अगदी या छोट्या छोट्या संस्थांमधूनसुद्धा दिसतो. 'संस्था मोडू पण वाकणार नाही.' असा या कार्यकर्त्यांचा बाणा! गेली सात-आठ वर्षे वेगळी चूल मांडल्यावर दोन्ही बाजूकडील शहाणी माणसं एकत्र आली आणि त्यातून एकत्रित समेलन भरवण्याचं ठरलं! हीच समेलनाची प्रक्रिया पुढेदेखील चालू राहिली, तर पुन्हा एकच संस्था कदाचित तयार होईलही; पण दोन्ही बाजूंनी आपापले अहंकार गुंडाळून ठेवले पाहिजेत. ते होणं अगदी सोपं नव्हे!

**—विश्राम राजहंस**

---

## विकास कार्यात हातभार

२४ डिसेंबर, १९८५

□ आपल्या दिनांक १२–१०–८५ च्या अंकात 'महाराष्ट्र राज्य लॉटरी - सर्वसामान्यांचे काय?' या शीर्षकाखाली श्री. श्री आ माडके, यांचे नावे प्रसिद्ध झालेल्या मजकुराचा खुलासा सोबत पाठवित आहे.

राज्याच्या विकास योजनांसाठी लागणारा पैसा ज्या अनेक माध्यमांद्वारे उभा करण्यात येतो त्यामध्ये राज्य लॉटरीचाही समावेश आहे. दिनांक १२ एप्रिल १९६९ रोजी महाराष्ट्र लॉटरीची पहिली सोडत काढण्यात आली.

एप्रिल १९६९ ते मार्च १९८५ पर्यंतच्या १६ वर्षांच्या कालावधीत राज्य लॉटरीची रु. २०४१० कोटीची तिकीट विक्री झाली. यापैकी रु. ९६१८ कोटी जनतेला बक्षिसाच्या रूपाने देण्यात आले, रु. २९५४ कोटी एजंटांना कमिशन व बोनस रूपाने देण्यात आले, लॉटरीची तिकीट छपाई प्रसिद्धी आणि सेवक वर्गाचा खर्च यासाठी रु ११७० कोटी खर्च झाले आणि रु ६६६८ कोटी राज्याच्या विकास निधीत जमा करण्यात आले. महाराष्ट्राची ६ वी पंचवार्षिक योजना (१९८०–८५) ही रु. ६१७५ कोटींची होती त्यापैकी या पाच वर्षात लॉटरीच्याद्वारे २९४५ कोटी रुपये मिळाले तर १९८४–८५ या एका आर्थिक वर्षात शासनाला रु ६४५ कोटी निरनिराळ्या प्रकारच्या विकास कार्यासाठी लॉटरीने उपलब्ध केले.

लॉटरीचे एजंट, विक्रेते इत्यादी मिळून सुमारे १५,००० लोक या व्यवसायात गुतले असून अनेक अंध, अपंग, बेसहारा लोक महाराष्ट्र राज्य लॉटरीची तिकिटे विकून स्वावलंबनाने जगत आहेत.


**प्र दे. शांडिल्य**
उपसंचालक (जनसंपर्क व वृत्त)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई

## ओ भोपाळसंबंधी...

भोपाळ स्मृतिदिनाच्या निमित्ताने पुण्यात झालेल्या विविध कार्यक्रमांच्या अनुषंगाने 'पुणे वार्ता' या सदरात मी 'ओ भोपाळ!' म्हणून एक स्फुट दि. १४ डिसें ८५ च्या 'माणूस' अंकात लिहिले या स्फुटात लोकजागृतीचे काम तळमळीने करणाऱ्या कार्यकर्त्यांची चेष्टा झाली असे सुलभा ब्रह्मे व कुमुद पोरे या दोघींनी लिहिलेल्या व दि ४ जाने ८६ च्या 'माणूस' अंकात प्रसिद्ध झालेल्या संयुक्त पत्रात म्हटले आहे हा मजकूर पुन्हा वाचून पाहता यात कुठल्याही स्वरूपाची कार्यकर्त्यांची चेष्टा झाली आहे, असे मला वाटत नाही. भोपाळसारख्या गंभीर समस्येबद्दल जनमानसातील अनास्था दिसावी आणि चळवळ अधिक व्यापक व्हावी ही अपेक्षा धरूनच हा मजकूर लिहिला होता

**—मनोहर सोनवणे**

**बोनस दरात वाढ... आपली आयुर्विमा पॉलिसी आता अधिक लाभदायक!**




महामंडळाच्या मालमत्तेच्या द्वैवार्षिक विमागणितीय मूल्यमापनानुसार दि. ३१ मार्च १९८५ रोजी चालू असलेले सर्व लाभसहित विमे खालीलप्रमाणे बोनस मिळण्यास पात्र ठरतील :

| हयातीचा विमा : | मुदतीचा विमा : |
|---|---|
| **रु. ५५.००** | **रु. ४४.००** |
| दर १०००/- रु. विमा रकमेवर प्रति वर्ष... | दर १०००/- रु. विमा रकमेवर प्रति वर्ष... |

आयुर्विमा इतका आकर्षक व लाभदायक पूर्वी कधीही नव्हता.

विमा उतरवा आणि निश्चिंत व्हा.

**जनतेच्या सेवेत आयुर्विमा**
**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया**

RADEUS/LIC/9/85

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28

## प्रकाशित होत आहे

गर फरदौस बर रुए जमी अस्त......
जमिनीवरचा स्वर्ग येथेच आहे
असे बेगुमान मगरूरीने सांगणारा लाल किल्ला

देशातील सर्वात गरीब माणसाला विसराल
तर ते पाप ठरेल
हे सांगणारा गांधीजींचा राजघाट.

असे विरोधाभास बरोबर घेऊन राजधानी दिल्ली
दरक्षणी वाटचाल करते.
तुम्ही आम्ही गोंधळून जावे अशा
विस्मयजनक घटना
म्हणून दरक्षणी या दिल्लीत घडत राहतात.

दिल्लीच्या धमन्यातून फक्त राजकारण वाहते
आणि श्वासातून बाहेर पडत असतात
साऱ्या भारतावर राज्य करायचे
राजकारण्यांचे मनसुबे.
हे मनसुबे मनात बाळगून
येथे दरक्षणी
नवे फासे फेकले जातात.

अशा या दिल्लीत
गेल्या दशकात घडलेल्या तीन प्रमुख घटना.
– शरद जोशींचे आव्हान
– अप्पूचा अलिशान एशियाड
– नादिरशाहने शरमेने मान खाली घालावी अशी
३१ ऑक्टोबरची कतले आम
या घटनांचा जवळून पण तटस्थपणे
घेतलेला शब्दवेध

# बखर राजधानीची

लेखक : **डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर**

वेगळ्या
विषयांवरची
राजहंसची
दोन
दर्जेदार
प्रकाशने

१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०
फोन : ४४ ३४ ५९

वा. र. गोडे,
४१ भवानी शंकर
रोड, जोशी वाडी.
चितळे पथ कॉर्नर,
दादर
मुंबई : ४०० ०२८
फोन : ४२२ ५४५५

## प्रकाशित झाले

' अय्या केळी ऽ ऽ ' म्हणून
लाजत लाजत हाका मारणारा फेरीवाला
' तुला क्वार्टर पोळी वाढू का हाफ् ? ' म्हणून
मुलाच्या अन्नात इंग्लिश कालवणारी आई
' मेथीच्या सहा जुड्या पटकन् निवडाव्यात
असं सांगणारी झटपट पाककृती
" शालिमार ऽ सही मार . . . "
हे जाहिरातीमधलं महान काव्य
" सुरूसुरूसुरूसुरू . . . तुझं माझं प्रेम सुरू "
. . . एका लोकप्रिय गाण्यातली ओळ
-- झुळकेला काहीच वर्ज्य नाही !
बघता बघता ती सर्वांना स्पर्शून जाईल !
अगदी तुम्हालाही.
-- क्षणात येऊन, चुकवून,
उल्हसित करून जाणारी झुळूक
कोणाचं वस्त्रहरण करणार नाही,
कोणाला भोवंडूनही टाकणार नाही.
सहज जाता जाता
छानपैकी गुदगुल्या मात्र करून जाईल.

मराठी ललित लेखनात
महत्त्वाची भर घालणारं पुस्तक

# झुळूक

लेखिका : **मंगला गोडबोले**

किंमत : **रुपये पंचवीस**